# भैरव

## हितगुज



मराठा विद्या प्रसारक समाजाचे

**कला व वाणिज्य महाविद्यालय**

वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक.

Scanned with CamScanner

# भैरव २०१७-१८

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## आद्य संस्थापक व स्फूर्तिस्थान




कर्मवीर रावसाहेब थोरात



कर्मवीर काकासाहेब वाघ



कर्मवीर भाऊसाहेब हिरे



कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे



कर्मवीर गणपत दादा मोरे



कर्मवीर डी.आर.भोसले



कर्मवीर ॲड.बाबुराव ठाकरे



कर्मवीर ॲड.विठ्ठलराव हांडे



कर्मवीर डॉ.वसंतराव पवार

Scanned with CamScanner

भैरव २०१७-१८

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

# कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी



डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे
अध्यक्ष



श्री. माणिकराव माधवराव बोरस्ते
सभापती



श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार
सरचिटणीस



श्री. राघो काशिराम आहिरे
उपसभापती



डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले
चिटणीस

Scanned with CamScanner

# भैरव २०१७-१८

## मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

# कार्यकारी मंडळाचे सदस्य


श्री. भाऊसाहेब लक्ष्मण खातळे
इगतपुरी


श्री. अशोक राजाराम पवार
कळवण व सुरगाणा


श्री. उत्तम गणपत भालेराव
चांदवड


श्री. दत्तात्रय रामचंद्र पाटील
दिंडोरी व पेठ


श्री. नामदेव नभाजी महाले
नाशिक


श्री. प्रल्हाद दादा गडाख
निफाड


श्री. दिलीप रघुनाथ पाटील
नांदगांव


डॉ. प्रशांत उदाराम देवरे
सटाणा


डॉ. जयंत त्र्यंबकराव पवार
मालेगांव


श्री. रायभान गंगाधर काळे
येवला


श्री. हेमंत विठ्ठल वाजे
सिन्नर


डॉ. विश्राम मालजी निकम
देवळा


श्री. सचिन पंडीतराव पिंगळे
नाशिक ग्रामीण

## सेवक सदस्य


प्रा. नानासाहेब त्र्यंबक दाते
सेवक सदस्य


श्री. गुलाबराव मुरलीधर भामरे
सेवक सदस्य


श्रीमती नंदा अशोक सोनवणे
सेवक सदस्य

Scanned with CamScanner

कृतीशील युवा नेतृत्व..... !



प्राचार्य मा. श्री. अमोल लक्ष्मण भगत

Scanned with CamScanner

# भैरव

२०१७-१८




ग्रामदैवत - भैरवनाथ महाराज व जोगेश्वरी माता मंदीर

Scanned with CamScanner

# संपादक मंडळ



मा. प्राचार्य - ए. एल. भगत

अध्यक्ष : संपादक मंडळ



प्रा. एस. डी. फुगट

प्रमुख संपादक



प्रा. श्रीमती. के. एल. शिंदे

सदस्य : संपादक मंडळ



ग्रंथपाल : श्री. एस. एस. लोखंडे

सदस्य : संपादक मंडळ

Scanned with CamScanner



सावित्रीबाई पुणे विद्यापीठाचे
कुलगुरू मा. डॉ. नितीन करमळकर
यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करतांना
शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष
ॲड. पोपटराव पवार समवेत केटीएचएम
महाविद्यालयाचे प्राचार्य
मा. डॉ. व्ही. बी. गायकवाड,
प्राचार्य श्री. ए. एल. भगत व मान्यवर

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छता हीच सेवा
या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
सा. फु. विद्यापीठाचे कुलगुरू
मा. डॉ. नितीन करमळकर व
प्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड
व इतर मान्यवर





महाविद्यालयास भेट देतांना
म.वि.प्र. समाज संस्थेच्या नवनिर्वाचित
सरचिटणीस मा. श्रीमती निलीमाताई पवार
समवेत चिटणीस मा. डॉ. सुनिल ढिकले
व संस्थेचे पदाधिकारी

Scanned with CamScanner

# भैरव २०१७-१८



डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेमध्ये संभाजी राजे या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना. डॉ. नरेंद्र पाटील समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत




डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेमध्ये जाणता राजा-यशवंतराव चव्हाण या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना. ॲड. मयुर जाधव समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत




डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेमध्ये सावित्री तू होती म्हणूनच... या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना. डॉ. प्रतिभा जाधव समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत

Scanned with CamScanner



डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेमध्ये
डॉ. प्रतिभा जाधव यांचा सत्कार करतांना
प्रा. श्रीमती के. एल. शिंदे
समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत व
केंद्र कार्यवाह प्रा. एस. डी. फुगट



राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत
महाविद्यालयाच्या प्रांगणात
वृक्षारोपण करतांना प्राचार्य श्री. ए. एल. भगत
समवेत रा.से.यो.चे प्रमुख
प्रा. डी. एच. भगुरे,
प्रा. एन. डी. वडघुले व विद्यार्थी



म. वि. प्र. समाज संस्थेचे
सरचिटणीस स्व. डॉ. वसंतरावजी पवार
यांच्या प्रतिमेचे पुजन करतांना
महाविद्यालयाचे उपप्राचार्य
प्रा. एन.डी. वडघुले व शिक्षकवृंद

Scanned with CamScanner

॥ बहुजन हिताय बहुजन सुखाय ॥

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव

ता. चांदवड, जि. नाशिक.

# 'भैरव'

## वार्षिक नियतकालिक

सन २०१७-१८

वर्ष - २ रे - अंक २ रा

*** अध्यक्ष संपादक मंडळ ***

मा. प्राचार्य ए. एल. भगत

*** प्रमुख संपादक ***

प्रा. सोमनाथ डी. फुगट

*** संपादक मंडळ सदस्य ***

प्रा. श्रीमती के. एल. शिंदे, प्रा. श्री. लोखंडे



Scanned with CamScanner

* प्रकाशन स्थळ : कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव

* प्रकाशन कालावधी : वार्षिक

* प्रकाशक : प्राचार्य ए. एल. भगत

* राष्ट्रीयत्व : भारतीय

* पत्ता : कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक.

* प्रकाशक : प्राचार्य ए. एल. भगत

* अक्षर जुळवणी : श्री. विजय बोरखडे (श्री स्वामी समर्थ ऑफसेट)

* मुख पृष्ठ : श्री. विष्णु थोरे, चांदवड

* मुद्रण : मराठा विद्या प्रसारक समाज प्रिंटींग प्रेस, नाशिक - २.

* छायाचित्र : शिवप्रसाद फोटो स्टुडिओ, वडनेर भैरव

मी प्राचार्य ए. एल. भगत असे जाहीर करतो की,

वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे. - प्राचार्य ए. एल. भगत

फक्त खाजगी वितरणासाठी

' या नियतकालिकातील लेखांमध्ये व्यक्त झालेली मते व विचार संबंधित लेखकांचे आहेत. त्यांच्याशी प्राचार्य, संपादक मंडळ, संस्था किंवा महाविद्यालय सहमत असेलच असे नाही.' - प्रमुख संपादक



Scanned with CamScanner

# 'समाजगीत

जनकल्याणी देह झिजवुनी लाजविले चंदना
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना
तुम्हाला लाख लाख वंदना ॥धृ.॥
ऋषिराजाने राजर्षीने लावियली ज्योत
वसा ज्योतीचा घेऊनी साचा पेटविला पोत
दिशादिशांतून परापरांतून आली नवजाग
दिसू लागला मनामनातला मुक्तीचा मार्ग
निद्रेतच होते दंग
अंतरातले स्फुलिंग
ते उठले उधळीत रंग
बहुजन हिताय, बहुजन सुखाय चेतविली चेतना
कर्मवीर हो, ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ॥१॥
नांगर टाका, भाला फेका शिकवी शिवराया
त्याच मातीवर कसुनी कंबर करुया नव किमया
निरलस श्रमुनी काढू खणुनी रुतलेली शल्ये
निष्ठा शिंपून करु पेरणी हवी नवी मूल्ये
दृढनिश्चय ऐसा करुनी
कार्यात प्राण ओतुनी
आयुष्य दिले झोकुनी
ज्ञानप्रशाला उभारण्याला दिलीत हो प्रेरणा
कर्मवीर हो, ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ॥२॥
मूक अडाणी फुलवू अग्रणी त्यातुनी ही जिद्द
मुळात अबला करु या सबला धन्य धन्य ब्रीद
दिव्य थोरवी कुठली ओवी गुंफावी गौरवा
नम्रपणाने एक मागणे हट्ट हाच पुरवा
निरपेक्ष अपुली कृती
ती सेवाभावी मती
ती निष्ठा तसली धृती
समाजदिन हा सार्थ करावा द्या हो द्या प्रेरणा
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ॥३॥

- कै. प्रा. श्रीरंग गुणे



Scanned with CamScanner

# Our Vision and Mission

## - Vision

We envision a college of higher education ensuring conductive environment for teaching and learning, qualitites and skills of students making them into socially responsible, globally competent and excellent human resource.

## - Mission

1) To provide education to masses and first generation of learners.
2) Nuturing encouraging disciplines and the creation of new knowledge.
3) Expanding opportunities for all of our students to acquire understanding of the world as a place of different and diversity across time and culture through participation in study.
4) To develop socially responsible citizens with ethies and morals hence build the nation.
5) To under take activities for community orientation.
6) To empower women by providing right opportunities of higher education and make them self reliant.
8) To inculcate environmental awareness, save and conserve nature.



Scanned with CamScanner

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## * कार्यकारी मंडळ *

### कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे |
| सभापती | : | श्री. माणिकराव माधवराव बोरस्ते |
| उपसभापती | : | श्री. राघो काशिराम आहिरे |
| सरचिटणीस | : | श्रीमती नीलिमाताई वसंतराव पवार |
| चिटणीस | : | डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले |

## * कार्यकारी मंडळाचे तालुका सदस्य *

| | | |
|---|---|---|
| इगतपुरी | : | श्री. भाऊसाहेब लक्ष्मण खताळे |
| चांदवड | : | श्री. उत्तम गणपत भालेराव |
| दिंडोरी | : | श्री. दत्तात्रय रामचंद्र पाटील |
| नाशिक | : | श्री. नामदेव नभाजी महाले |
| कळवण | : | श्री. अशोक राजाराम पवार |
| निफाड | : | श्री. प्रल्हाद दादा गडाख |
| नांदगांव | : | श्री. दिलीप रघुनाथ पाटील |
| बागलाण | : | डॉ. प्रशांत उदाराम देवरे |
| मालेगांव | : | श्री. जयंत त्र्यंबकराव पवार |
| येवला | : | श्री. रायभान गंगाधर काळे |
| सिन्नर | : | श्री. हेमंत विठ्ठल वाजे |
| नाशिक ग्रामीण | : | श्री. सचिन पंडीतराव पिंगळे |
| देवळा | : | डॉ. विश्राम मालजी निकम |

## * सेवक सदस्य *

| | | |
|---|---|---|
| उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विभाग | : | श्री. नानासाहेब त्र्यंबक दाते |
| प्राथमिक व माध्यमिक विभाग | : | श्री. गुलाबराव मुरलीधर भामरे |
| प्राथमिक व माध्यमिक विभाग | : | श्रीमती. नंदा अशोक सोनवणे |



Scanned with CamScanner

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव

## * स्थानिक व्यवस्थापन समिती *

| | | |
|---|---|---|
| १) श्री. दिलीपराव हरिभाऊ धारराव | : | अध्यक्ष |
| २) श्री. ॲड. पोपटराव दगुजी पवार | : | सदस्य |
| ३) श्री. डॉ. सुनिल मधुकर पाचोरकर | : | सदस्य |
| ४) श्री. शंकरराव बाजीराव भालेराव | : | सदस्य |
| ५) श्री. दौलतराव लुंकाजी पाचोरकर | : | सदस्य |
| ६) श्री. वसंतराव देवराम गवळी | : | सदस्य |
| ७) श्री. दत्तात्रय मधुकर माळी | : | सदस्य |
| ८) श्री. विजय ग्यानुजी निखाडे | : | सदस्य |
| ९) श्री. भाऊसाहेब देवराम भालेराव | : | सदस्य |
| १०) श्री. पोपटराव पंढरीनाथ पाचोरकर | : | सदस्य |
| ११) श्री. डॉ. नंदकिशोर भिमराव साब्दे | : | सदस्य |
| १२) प्राचार्य कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव | : | सचिव |
| १३) प्रा. निशांत डी. वडघुले | : | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १४) श्री. संदीप भास्कर शिंदे | : | शिक्षकेत्तर प्रतिनिधी |



Scanned with CamScanner

# संपादकीय....

संपादक : प्रा. सोमनाथ डी. फुगट

मित्रहो,

भैरव - २०१७-१८ चा वार्षिक महाविद्यालयीन नियतकालिकाचा दुसरा अंक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त कलागुण विकसित व्हावे, त्यांना शब्दरुपाने व्यासपीठ मिळावे हाच या नियतकालिकाचा उद्देश आहे. तसेच महाविद्यालयाची वाटचाल, विकास, विविध विद्यापीठीय शैक्षणिक, गुणसंपन्न उपक्रम तसेच विविध स्तरावरील प्रगती विद्यार्थ्यांपर्यंत व समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी महाविद्यालयाचा महत्त्वपूर्ण व आवश्यक असा अविष्कार म्हणजे 'भैरव' ।

सन २०१६-१७ या वर्षापासून आपण 'भैरव' नियतकालिक विशेषांकाच्या स्वरुपात प्रकाशित एक नवा शैक्षणिक प्रयोग सुरू केला आणि याच भैरवचे समाजस्तरावर अगदी सर्वांनी मनापासून कौतुक केले. सन २०१६-१७ या वर्षी 'विचार संक्रमण' विशेषांक प्रकाशित केला. सन २०१७-१८ या वर्षी आपण 'हितगुज' या नावाने हा विशेषांक तयार केला आहे. या अंकाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना लेखनाला प्रवृत्त करणे, विद्यार्थ्यांच्या मनातील भावनांना शब्दांच्या माध्यमातून कागदावर उतरवणे व यातूनच मनातील भावनांच्या आंदोलनाला 'हितगुज'च्या माध्यमातून वाचकवर्गापर्यंत पोहोचविणे हेच महाविद्यालयीन नियतकालिकाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या हेतूने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लेखनाद्वारे विचार प्रवृत्त करुन त्यांच्या दृष्टीकोनातून सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, शैक्षणिक, राजकीय व एकूणच जीवन विषयक क्षेत्रातील आपले स्वत:चे तसेच इतर विद्वानांनी मांडलेले विचार संकलित करुन स्वत: आत्मसात करणे व इतरांपर्यंत घेऊन जाणे हे महाविद्यालयीन शिक्षणाचे ध्येय आहे. 'भैरव' मध्ये विद्यार्थ्यांनी मांडलेले विचार हे स्वरचित तसेच संकलित स्वरुपाचे असून यामध्ये संकलित साहित्याचे प्रमाण जास्त आहे. असे असले तरी याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वाचन आणि शोधक वृत्तीचा विकास होण्यास मदत होईल. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. भगत सरांनी या वार्षिक अंकाच्या संपादनाची जबाबदारी माझ्यावरती टाकून जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या अंकाच्या संपादनात संपादक मंडळ सदस्यांनी केलेल्या तसेच माझे सर्व सहकारी प्राध्यापक बंधू, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मदतीशिवाय हा अंक पूर्ण होणे शक्य नाही. म्हणून मी त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो. तसेच या अंकाच्या अक्षर जुळवणी व टंकलेखनाची जबाबदारी यशस्वीरित्या व अतिशय कमी कालावधीत पूर्ण करुन दिली ते आमचे स्नेही श्री. विजय बोरखडे (समर्थ प्रिंटींग प्रेस) तसेच श्री. विष्णु थोरे (चांदवड) यांनी अतिशय आशयघन मुखपृष्ठ तयार करुन दिले. छपाईची जबाबदारी पूर्ण करणारे म.वि.प्र. प्रिंटींग प्रेस यांच्या मी कायम ऋणात राहू इच्छितो. या अंकासाठी ज्यांनी छायाचित्रे उपलब्ध करुन दिलेत त्या शिवप्रसाद फोटो स्टुडिओचे संचालक श्री. पुरकर साहेब व चि. संदीप (सोनु) यांचेही मन:पूर्वक आभार. तसेच या अंकाच्या संपादनास ज्या ज्ञात-अज्ञातांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे मी संपादक या नात्याने ऋण व्यक्त करतो... धन्यवाद.....। **आपणा सर्वांना नववर्षाच्या हार्दीक शुभेच्छा...।**



Scanned with CamScanner

# प्राचार्यांचे मनोगत...

'शिक्षण' हा व्यक्तीजीवनाला प्रकाशमान करणारी एक ऊर्जा आहे. हीच विचारधारा डोळ्यासमोर ठेवून १०० वर्षापूर्वी कर्मवीरांनी मराठा विद्या प्रसारक संस्थेची स्थापना केली.

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ध्येय उराशी बाळगून तळागाळातील समाजाचा विकास करण्यासाठी आज म. वि. प्र. संस्था कार्यरत आहे आणि 'मी' अशा संस्थेचा एक घटक म्हणून काम करतो याचा मला सार्थ अभिमान आहे.

उच्च शिक्षणामध्ये नवे प्रवाह येत आहेत. जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत क्षमता विकसित करणे हे महाविद्यालयाचे प्रमुख उद्दीष्ट आहे. भविष्यकाळातील आव्हाने आपण पेलू शकतो किंवा नाही याचे आत्मभान ठेवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील राहिल्याशिवाय गत्यंतर नाही. आत्मभान हे मार्गदर्शक, प्रेरणादायी व आत्मविश्वास निर्माण करत असते. या दृष्टीने महाविद्यालय वाटचाल करत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गुणांबरोबरच इतर कलागुणांचा विकास व्हावा. यासाठी महाविद्यालय विविध उपक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करुन देते. महाविद्यालय नियतकालिकाचा 'भैरव'हा दुसरा अंक आपल्या हाती देताना महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून मला मनस्वी आनंद होत आहे.

या वार्षिक अंकात विद्यार्थ्यांनी आपले विचार विविध लेख व काव्याच्या माध्यमातून मांडलेले आहेत. या नियतकालिकातून विद्यार्थ्यांच्या विचार प्रगल्भतेला चालना मिळणार आहे. दरवर्षी असाच दर्जेदार वार्षिक अंक आपल्यापर्यंत पोहचविण्याचा आम्ही प्रयत्न करु...

**धन्यवाद....!**

प्राचार्य
**मा. श्री. ए. एल. भगत**
कला व वाणिज्य महाविद्यालय,
वडनेर भैरव



Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

## (गद्य विभाग)


| अ.क्र. | शिर्षक | | नांव |
|---|---|---|---|
| १) | आनंदमय जीवन | : | पवार पुजा राजेंद्र |
| २) | महाराष्ट्र माझा | : | शेळके सोनाली संपत |
| ३) | परिस्थीतीतून बदलले जीवन | : | शेळके सोनाली संपत |
| ४) | बाप | : | जगताप पूजा सुनिल |
| ५) | मातृ देवो भव | : | तिडके ज्योती सुनिल |
| ६) | जेव्हा आई तुझी खूप आठवण येते | : | तिडके ज्योती सुनिल |
| ७) | खरं प्रेम... | : | गचाले अर्चना बाळासाहेब |
| ८) | मराठी संस्कृती | : | गचाले अर्चना बाळासाहेब |
| ९) | स्त्री: भ्रूण हत्या | : | हाटकर गायत्री संजय |
| १०) | फॅशन | : | साळुंके गायत्री बाजीराव |
| ११) | काळोखाची रात्र | : | भालेराव सागर बाळासाहेब |
| १२) | एक स्त्री | : | कुटे मोनाली रामराव |
| १३) | आदर्श व्यक्तिमत्व - डॉ. बाबासाहेब आमटे | : | भालेराव सागर बाळासाहेब |
| १४) | मी एक मुलगी बोलतेय | : | आहेर मोहिनी दत्तात्रय |
| १५) | आजची युवा पिढी आणि इंटरनेटचा गैरवापर | : | भालेराव सागर बाळासाहेब |
| १६) | मराठी भाषेच्या सवंर्धनातून विकास | : | वाढवणे दिपाली सुरेश |
| १७) | बाप | : | पाचोरकर प्रतिक्षा रामदास |
| १८) | वृद्धाश्रमातील दु:खात्मक आणि सुखात्मीक अध्यात्मीका | : | कुटे मोनाली रामराव |
| १९) | टोपन नावाने लिहिणाऱ्या साहित्यिकांची नावे | : | गचाले अर्चना बाळासाहेब |
| २०) | गुरुची कृपा | : | साळुंके गायत्री बाजीराव |
| २१) | आदर्श व्यक्तिमत्वासाठी | : | प्रा. ज्ञानेश्वर एच. भगुरे |
| २२) | फक्त तूच गं आई... | : | जाधव मयुरी चंद्रभान |
| २३) | Parsian Diasporain Rohintion Mistry | : | Prof. Shinde K.L. |
| २४) | Ways of Successful Life | : | Salunke Gayatri B. |




Scanned with CamScanner

## (पद्य विभाग)

| | | |
|---|---|---|
| १) | ती | : गचाले अर्चना बाळासाहेब |
| २) | आई | : पवार पूजा राजेंद्र |
| ३) | मराठीपणा | : भालेराव हर्षल सीताराम |
| ४) | क्षण | : जाधव धनश्री भाऊसाहेब |
| ५) | देश झोपलाय | : पवार दिपाली नामदेव |
| ६) | लेकीची हकीकत | : जाधव धनश्री भाऊसाहेब |
| ७) | स्वप्न | : पवार दिपाली नामदेव |
| ८) | जीवनाच्या वाटेवरुन चालतांना... | : आहेर पूनम राजेंद्र |
| ९) | वात्सल्य | : हाटकर गायत्री |
| १०) | मैं बोझ नहीं हूँ | : तिडके पूजा सुनिल |
| ११) | तीन गोष्टी | : पठाण उजमा रियाज |
| १२) | ते जीवन | : कुटे मोनाली रामराव |
| १३) | परिस्थिती | : तिडके श्वेता अरुण |
| १४) | स्वप्न | : चौधरी प्रियंका शरद |
| १५) | खरा आनंद | : चौधरी प्रियंका शरद |
| १६) | सोनुली | : तिडके शुभांगी मोहन |
| १७) | मंदी आणि संधी | : वक्टे रोहिणी विष्णु |
| १८) | हरवलेले जग | : गचाले अर्चना बाळासाहेब |
| १९) | नशीब | : तिडके ज्योती |
| २०) | भूक | : गचाले अर्चना बाळासाहेब |
| २१) | प्रतिक्षा | : निखाडे प्रियंका विजय |
| २२) | एक मराठा... लाख मराठा | : जाधव धनश्री भाऊसाहेब |
| २३) | जीवनाचे सार.. | : शेळके सोनाली संपत |
| २४) | शब्द | : शेळके सोनाली संपत |
| २५) | पाणी आडवा... पाणी जिरवा... | : भालेराव हर्षल सीताराम |
| २६) | पूर्वीचा काळ | : पवार दिपाली नामदेव |
| २७) | चला शिवाजी महाराज तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखविते | : पवार दिपाली नामदेव |
| २८) | वृक्षतोड करु नका | : भालेराव हर्षल सीताराम |
| २९) | असं प्रेम करावं | : तिडके पूजा सुनिल |
| ३०) | कैफियत | : भालेराव हर्षल सीताराम |
| ३१) | अंधश्रध्दा | : पवार दिपाली नामदेव |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ३२) हवा हवासा वाटतो क्रिकेट | : | कोतवाल गौरव निलेश |
| ३३) पैसे नसतात तेव्हा | : | वाघ रोहिणी |
| ३४) भेट | : | कोतवाल गौरव निलेश |
| ३५) आयुष्य हे असेच जगायचे असते | : | गांगुर्डे अर्चना |
| ३६) एक कडू सत्य | : | चौरे अश्विनी दत्तू |
| ३७) हिरीताचं देणं घेणं | : | चौरे स्नेहल रमेश |
| ३८) पाठवण | : | बावीस्कर सपना मोहन |
| ३९) घर | : | धनाईत योगिता कैलास |
| ४०) शेतकऱ्याचा न्याय | : | बाविस्कर सपना मोहन |
| ४१) असे जगावे जीवन | : | धनाईत योगिता कैलास |
| ४२) सरकारची भीक | : | बाविस्कर सपना मोहन |
| ४३) विचार करा ? | : | आहेर पूनम राजेंद्र |
| ४४) आई | : | पवार दिपाली नामदेव |
| ४५) बळीराजा | : | प्रतिक्षा बाळासाहेब पगार |
| ४६) माझा बाप | : | हाटकर गायत्री संजय |
| ४७) संसाराचे सार | : | पाचोरकर शितल वसंत |
| ४८) अवस्था | : | आवारे वैष्णवी बाळासाहेब |
| ४९) सैनिक | : | आवारे वैष्णवी बाळासाहेब |
| ५०) जीवन | : | आवारे वैष्णवी बाळासाहेब |
| ५१) कर्म माणसाचे... दोष कर्माला.... | : | वक्टे रोहिणी विष्णू |
| ५२) जीवलग | : | आहेर प्रियंका विष्णूपंत |
| ५३) आयुष्य | : | बिन्नर कविता बाळू |
| ५४) बाप | : | वाढवणे दिपाली सुरेश |
| ५५) मैत्रीचा अर्थ | : | पठाण उजमा रियाज |
| ५६) जीवन | : | चौरे अश्विनी दत्तू |
| ५७) मांडली थट्टा बळीराजाची | : | भालेराव सागर बाळासाहेब |
| ५८) विरह | : | बिन्नर दिपक सुरेश |
| ५९) जिद्द | : | वाढवणे दिपाली सुरेश |
| ६०) बदलते जग | : | तिडके श्वेता अरुण |
| ६१) अस्तित्व | : | बिन्नर योगिता सुरेश |
| ६२) वेळ | : | बेंडके बापू संजय |
| ६३) आंगण | : | भालेराव सागर बाळासाहेब |



Scanned with CamScanner

६४) किनारा : बिन्नर दिपक सुरेश
६५) ध्येय : शिरसाठ राणी कैलास
६६) रुप वसुंधरा : भालेराव सागर बाळासाहेब
६७) आयुष्य : शिरसाठ राणी कैलास
६८) माझा बाप : शिरसाठ राणी कैलास
६९) एक तरी बहिण असावी : तिडके सुजित सुनिल
७०) माय माऊली : भालेराव सागर बाळासाहेब
७१) बैल पोळा... कि ट्रॅक्टर पोळा... : भालेराव सागर बाळासाहेब
७२) विसरु नको रे आई बापाला : तिडके शुभांगी मोहन
७३) मी बुद्धीमान : भालेराव सागर बाळासाहेब
७४) माघार घेऊ नकोस : थोरमिसे स्वाती
७५) भूतकाळ जागा होतो तेव्हा : तिडके श्रद्धा सचिन
७६) शब्दांचे महत्त्व : पवार पूजा राजेंद्र
७७) कारण मी मुलगी झाले : शेळके सोनाली संपत
७८) मैत्री म्हणजे काय ? : सोनवणे सरला नवनाथ
७९) जीवन ध्येय : शेळके सोनाली संपत
८०) बाबा : पवार पूजा राजेंद्र
८१) आई : शेळके सोनाली संपर
८२) लक्ष्य सुस्पष्ट हवे : चौरे स्नेहल रमेश
८३) शेत बांधावरचे दु:ख : प्रा. एस.डी. फुगट
८४) आई : प्रा. श्रीमती आर. एन. पाटील
८५) मेस : लगड निकिता संजय
८६) What is life : Poonam Rajendra Aher
८७) Friendship : Salade Priyanka
* अहवाल विभाग..........



Scanned with CamScanner

# आनंदमय जीवन

पवार पूजा राजेंद्र, द्वितीय वर्ष (बी.ए.)

आनंद या जीवनाचा ।
सुगंध परी दरवळावा ॥
मग झिजुनी स्वत: चंदनाने ।
दुसऱ्यास मधुगंध द्यावा ॥

प्रत्येकाच्या आयुष्यात जीवन प्रवास करीत असताना कडू-गोड क्षणांना सामोरे जावे लागते. या क्षणांमध्ये दुर्मिळ मोत्यासारखे काही क्षण असतात. त्यांना आयुष्याच्या शेवटपर्यंत विसरणे शक्य नसते. माणसाने जीवन असे जगावे की, जीवनालाही जगण्याचा हेवा वाटावा. आपल्याकडे असणारी प्रबळ इच्छा शक्ती, कर्तव्यशक्ती आणि ईश्वरशक्ती या तिन्हीही शक्ती आहे. जगातील कोणतीही गोष्ट आपण मिळवू शकतो. आपल्या शक्तीनेच आपले अस्तित्व निर्माण करु शकतो.

कोणतेही काम करीत असताना स्वत:ला स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करणे हे यशस्वी जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. विवेकानंद म्हणतात,'जो पर्यंत आपण स्वत:ला बिघडून देत नाही. तोपर्यंत जगातील कोणतीही शक्ती आपल्याला बिघडवू शकत नाही.' भगवंतावरील प्रबळ दृढ विश्वास, सकारात्मक दृष्टीकोन, जिद्द, उत्साह इतरांपेक्षा वेगळे काम करण्याची इच्छाशक्ती व्यक्तीला उंचीवर नेवून ठेवते. आणि जीवनातील खरी सार्थकता यातच आहे. आपल्याला मिळालेले आयुष्य खूपच थोडे आहे. या थोड्या आयुष्यात आपल्याला खूप काही करायचे आहे. अशी इच्छाशक्ती ठेवून जीवनातील सुंदरता वाढवता येईल.

'जीवन किती सुंदर आहे,
अनुभव तुम्हाला सांगत जाईल,
प्रयत्न करायला विसरु नका,
मार्ग तुम्हाला सापडत जाईल.'

आपण जी मोठी माणसे पाहतो, त्यांना मोठी माणसे म्हणतो. खरं तर ती मोठी नसतात. त्यांच्यातील माणुसकी त्यांना मोठे करते. स्वत:तील माणूसकी हा गुण विकसित कला पाहिजे. व्यक्तीने आपल्या जीवनात पुढील प्रश्नांचा विचार केला पाहिजे. मी कोठून आलो आहे ? मला कोठे पोहोचायचे आहे ? माझे जीवन कोण चालवतो ? या प्रश्नांचा सतत विचार करणे म्हणजे जीवन विकासाची पहिली पायरी चढण्यासारखी आहे. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात दु:ख येत असतात. पण पाण्यात राहणाऱ्या माशासतके दु:ख कोणालाच नसते.

**॥ माश्यासारखे या जगात कोणीही दु:खी असत नाही, कारण त्याचे अश्रू कधीच कोणाला दिसत नाही ॥**

दु:ख भोगायचे की, कोणाकडे पाहायचे हे प्रत्येकावर अवलंबून असते. शहाणी माणसे तटस्थ राहून दु:खाकडे बघत असतात. त्यांना माहित आहे. हा जीवनातील चढ थोड्या दिवसांचा आहे. माणसांना दु:ख वेदनेमुळे होत असते. वेदना म्हणजे तरी काय ? आपल्याला आवडणारी व्यक्ती आपल्याला न आवडेल असे वागते. आपणच आपल्या माणसामुळे दु:खी होतो.



Scanned with CamScanner

वाटेवरुन जाणाऱ्या व्यक्तीमुळे आपण दुःखी होत नाही. आपल्याला आवडणारी गोष्ट आपल्या जवळच्या व्यक्तीने कराव्यात अशी आपली खुळचट अपेक्षा असते. पण आपल्याला आवडणारी प्रत्येक गोष्ट चांगली असते असे नाही. कारण चांगल्या गोष्टी सर्वांनाच आवडत असतात असे नाही. त्यामुळे वेदना होतात आणि जीवनातील आनंद दूर होतो. आपल्याला सर्वात जास्त आवडणारी व्यक्ती नेहमी आपल्या जवळ असते. तेव्हा त्या व्यक्तीची किंमत आपल्याला त्यावेळी कळत नाही. पण जेव्हा ती व्यक्ती आपल्यापासून दूर जाते. तेव्हा त्या व्यक्तीची किंमत आपल्याला कळते आणि नंतर आपण कितीही प्रयत्न केले तरी ती व्यक्ती आपल्या आयुष्यात परत कधीहीयेत नाही. कारण तेव्हा वेळ निघून गेलेली असते. त्यामुळे आपला जीवन जगण्यात काहीच अर्थ उरत नाही.

जीवनात अनेक माणसे भेटतात, काही दुःख देतात तर काहींवर आपला जीव ओवाळून टाकावा असे वाटते. आदर्श वाटणारी काही माणसे वाईट कार्य करताना खूप दिसतात. त्यातच दुःख खूप असते. अपंगाने अपंगासारखे वागले तर त्याचे दुःख खूप असते. पण चांगल्या माणसाने अपंगासारखे वागले तर त्याचे दुःख सहन होत नाही.

अशा या सुख-दुःखाच्या लपंडावात भौतिक सुखाच्या मागे न धावता आनंद मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुख क्षणभंगुर असते, पण आनंद चिरकाल टिकणारा असतो. म्हणून व्यक्तीने नेहमी आनंदी राहावे. व्यक्तीच्या जीवनात कितीही दुःख असले तरी तो व्यक्ती आनंदी राहन त्या दुःखावर मात करु शकतो. त्याच्या जीवनात आनंद नेहमी दरवळत राहू शकतो. पण जेव्हा व्यक्ती त्याच्या जीवनात सुख-दुःखाच्या वाटेवर आनंदी असेल तेव्हाच त्याचे जीवन आनंदी बनेल व तो आयुष्य आनंदाने जीवन जगू शकेल.

असा आनंद मिळविण्याचा प्रयत्न करुन तो जीवनात सार्थक ठरेल आणि यशस्वी होईल.

----***----

# ती

माझ्या या एकाकी जीवनात
तीच माझा आधार होती,
उणीवांनी भरलेल्या जगात
तीच माझे सर्वस्व होती.

माझ्या मार्गातले काटे ही
तीच दूर करत होती,
माझे चुकलेले पाऊल
तीच सावरत होती.

शत्रूंवर मात करतांनाही
तीच माझ्या हाताशी होती
रखरखत्या मार्गात तीच
सुखाचा गारवा आणत होती

मीही तिचीच होते आणि तिही
माझीच होती.
गैर समज करून नका मित्रांनो.....!
कारण ती माझी
सुंदर साधी चामडी चप्पल होती.

**गचाले अर्चना बाळासाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# ॥ महाराष्ट्र माझा ॥

कु. शेळके सोनाली संपत, द्वितीय वर्ष (बी.ए.)



जय भवानी ! जय शिवाजी !! एक गगन भेदी आरोळी ऐकू आली आणि अंगावर रोमांच उभा राहिला. आई भवानीच्या आशीर्वादाने आपल्या मावळ्यांसोबत हरहर महादेवाच्या गर्जना देत गनिमांनी भरलेले हे राज्य स्वराज्य व्हावे, ही इच्छा मनाशी बाळगून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. या हिंदवी स्वराज्यात एक रामराज्य सुरु केले. माँ साहेबांची शिकवण व मर्द मावळ्यांची साथ या दोन गोष्टींनी आम्हाला हे रामराज्य स्थापनेत यश दिले ! राजकारभार कसा चालवावा, प्रजेचे पालन कसे करावे, हे आमच्या राज्यात बघावे. अरे कसले ते सुराज्य, आणि काय ते दिवस...

अरे हो, तुम्हाला सांगायचेच राहून गेले मी कोण, आणि मी का संवाद साधतोय तुमच्याशी !!

मी आहे "**शिवाजी राजा भोसले**"

होय मीच तो, 'शिवाजी राजा' ज्याचा इतिहास ऐकून तुम्ही ज्याला वंदन करतात. आज मला तुमच्याशी बोलावं असंच वाटलं. कारण आजचा माणूस कोठे चालला आहे ? या प्रश्नाचे उत्तर मी तुम्हालाच विचारणार आहे.

निसर्गाच्या रम्य कुशीत वसलेला हा माझा महाराष्ट्र ! सह्याद्रीच्या पर्वत रांगासह नटलेला हा माझा महाराष्ट्र ! होय, तोच महाराष्ट्र ! जिथे गोदावरी, कृष्णा, भीमा अशा नद्या अत्यंत आनंदाने आपले मार्गक्रमण करीत आहेत. आपला हिरवा शालू पांघरलेली धरणीमाता कशी मोहक रुप दाखविते.

माझ्या काळात अनेक सैतानी अत्याचार करणारे नराधम महाराष्ट्राला लुटत होते, त्यांची चोख व्यवस्था लावण्यासाठी मी व माझ्या मावळ्यांनी समशेरी हातात घेतल्या व त्या काफरांना आसमान दाखविले.

आज माझ्याच राज्यात हे काय चाललंय ! याचा विचारकरुन मी थकलोय. अरे काय तो महाराष्ट्र आज काय होऊन बसलाय ! कुठे गेली ती मावळ्यांची फौज ? कुठे गेले ते रामराज्य ? कोणी आतंकवादी येतात काय ? अरे तो शेजारील प्रांत असे गनिमी धाडतो, ते गनिमी येतात अन् निरपराध रयतेला मारुन काय टाकतात, आणि आपण हातावर हात ठेवून शांत बसतो ? राज्यकर्ते प्रत्येक गोष्टीचे राजकारण करतात. अशा राज्यकर्त्यांना सवाल तुम्ही नाही करायचा तर कोणी ? कोण तो, त्यातला एक गनिम अजूनही जिवंत



Scanned with CamScanner

आहे.... त्याला दवादारु देऊन ठणठणीत बरा केला आहे. त्याची बाजू मांडण्यासाठी तो वकील काय मागतो आहे, अरे चाललंय काय हे..... ?

अरे एका वेळेला माझ्या महाराष्ट्राची प्रगती पाहून खूप बरे वाटते. सर्वच क्षेत्रात हा माणूस प्रगती पथावर आहे, परंतु हे असे विचित्र प्रकार घडवण्यास कारणीभूत कोण ?

एका बाजूला बघितलं तर तरुणाई खूप पुढे चालली आहे. दुसऱ्या बाजूला पाहिले तर.... जडलेली व्यसनं.... विसरत चाललेली संस्कृती, पाश्चात्य संस्कृतीचा चाललेला उदो... उदो..., अरे उच्च शिक्षण घेऊन दुसऱ्या राष्ट्राचा बराक ओबामा निवडून आला म्हणून जल्लोष करु नका तर आपण केव्हा महासत्तेवर जाऊ याचा विचार करा व तसा प्रयत्न करा.

माझ्या सर्व रयतेला एक सांगतो आहे. प्रत्येकानो जागे व्हा. माझ्या सर्व रयतेमध्ये मला माझा मावळा दिसला पाहिजे. त्याचप्रमाणे आपली संस्कृती जपून आपल्या महाराष्ट्राची शान राखली पाहिजे. सुंदर अशी मराठी मायबोलीचा विसर पडता कामा नये.

आणि हो असे काही राज्य निर्माण करा की, या शिवाजीला सुद्धा गर्व वाटला पाहिजे.

आता मी तुमचा निरोप घेतो, परंतु एकच लक्षात ठेवा हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा....!

जय जवानी.... जय भवानी.... जय शिवाजी.

----***----

# आई



आईसाठी काय लिहू
आईसाठी काय लिहू
आईसाठी पुरतील एवढे
शब्द नाही कोठे ?
आईवरती लिहिण्या इतपत नाही
माझे व्यक्तिमत्व मोठे ...जीवन म्हणजे शेत तर
आई म्हणजे विहीर,आई तुझ्या कुशीत
पुन्हा यावेसे वाटते ...
निर्दयी या जगापासून, दूर जावेसे वाटते ...
कोणी न येथे कोणाचा
सारीच नाती खोटी,
तुझ्यापाशी फक्त आता
नाते जपावेसे वाटते
कोळून प्यायले मी, सुख-दुःख सारे ।
माते तुझ्या विरहास, न प्यावेसे वाटते ...
कित्येक रात्री ऐश्वर्यात लोळले मी
अखेरच्या क्षणाला तुझ्या, कुशीत निजावेसे वाटते
दगडतला तो देवही, आता नवसाविना पावेना
निस्वार्थ हृदय, माऊली तुलाच पूजावेसे वाटते
असेल जर मजला, मानव जन्म कधी,
आई तुझ्याच पोटी, पुन्हा जन्मावेसे वाटते

**पवार पूजा राजेंद्र**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)

# परिस्थितीतून बदलले जीवन

कु. शेळके सोनाली संपत, द्वितीय वर्ष (बी.ए.)

''दुःखाचे दिवस जास्त आणि सुखाचे दिवस कमी अशीच आमची परिस्थिती.'' लहानपणापासून गरिबीमध्ये हालअपेष्टा सहन करुन, तरीही गरीबी संपेना.... पोटाला अन्न कधी मिळाले नाही. कधी मुठभर भाकर मिळायची, तर कधी उपाशीच राहायचो. आम्ही भावंडे चार. खूप लहान लहान असतानाच वडील आमच्यातून निघून गेले. वडिलांचे दुःखद निधन झाले. वडील आणि आई दिवसभर शेतात कष्ट करुन राबराब राबून आम्हा लेकरांसाठी धावायचे, परंतू जेव्हा वडील वारले. आम्हा सर्वांच्या मनाला दुःख लावणारी घटना घडली. आता आईचा आधारच गेला. मूल लहान लहान वडील जाऊन १३ दिवस झाले. आई लगेच मजूरी करायला लागली. आम्ही सर्वजण शाळेत जायचो. लहान लहानच होतो. आई दिवसभर कष्ट करुन घरी यायची आम्ही सर्वजण उंबऱ्यात बसून तिची वाट पहायचो. आईला येण्यास थोडा उशीर जरी झाला तरी आमचे डोळे पाणवयायचे.

वडील होते तेव्हा आम्हाला दोन वेळचे अन्न ते पूर्ण भेटत नव्हते. शेजारच्या पाजाऱ्यांनी दिलेली शिळी भाकर, शिळा भात तेच आम्ही खायचो. खूपच हालाखीचे दिवस. शाळेत जायला व्यवस्थित दप्तर नसायचे. तेव्हा पिशवीच न्यायचो. कोणी फाटके दप्तर दिले तर आई त्या दप्तराला ठिगळं लावून द्यायची, पण आम्हाला त्याची कधीच लाज वाटली नाही. शिक्षणाच्या बाबतीत आम्ही भावंडे त्याची कधीच लाज वाटली नाही. शिक्षणाच्या बाबतीत आम्ही भावंडे सर्वच हुशार आईला आमचे कौतूक वाटते, परंतु आमची आईच खूप शिक्षित असल्यामुळे तिने पैसा, संपत्ती काहीच जवळ नसून सुद्धा आम्हाला शिकवलेच. ती म्हणायची शिका मुलांनो कारण 'ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे, जसे प्रकाशाच्या सहाय्याशिवाय वस्तू दिसत नाही तसेच विचाराशिवाय ज्ञानप्राप्ती होत नाही.'

आई मजूरी करायला जायची. पायामध्ये चप्पल नसायची, चटचट चटके बसून पाय भाजायचे, पणतिला मनामध्ये मुलांच्या उद्याच्या भविष्याची काळजी खूप होती. आणि आहे सुद्धा. आम्ही म्हणतो आमचे वडीलपण आम्हाला आईनेच दिले आणि आईपण आम्हाला आईनेच दिले. माझी आई एखाद्या मर्दासारखी लढली आणि आज ही परिस्थिती सुधारते आहे. ती तिच्या मुळेच. माझी आई हीने जे दुःखीत आहे. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे काम करते. ती म्हणते तेच आपले ईश्वरीय कार्य आहे. आमच्या आईला ना कुणाचा आधार ना आज कुणी दिलेली चतकोर भाकर. आज ती स्वतःच्या पायावर उभी राहून हा संसाराचा गाडा ओढते आहे. आयुष्यामध्ये खूप अडचणींना सामोरे जावून संकटे दूर करुन तिने नाव कमवूनाा दाखविले आहे.

आमचे शिक्षणही आईने खूप मजूरी करुन पैसा कमवून स्वतःला ना चांगली व्यवस्थित साडी ना चप्पल, पण मुलांचे शिक्षण तिने आज चालविले आहे. तिची

नीति चांगली आहे. म्हणून तिला आज मान आहे. आईला कधी चोरी, लबाडी आवडली नाही. लाचारपणा तिच्याकडे मुळीचच नाही. तिच्याकडे सत्य व माणुसकी आहे आणि माणुसपणच जपते आहे.

एकदाच आईने आमच्याकडे पान्हावलेल्या डोळ्यांनी बघितले. तिला वाटले चार लेकरांचा सांभाळ करायचा, संसार सांभाळायचा, दुःखाचा डोंगर बाजूला करुन आईने सुखचं आम्हाला दाखविले; परंतु आमच्या डोळ्यात कधी अश्रू येऊ दिले नाही. ती स्वतःच्या पोटाला कमी खायची आणि आम्हालाच पान्हावलेल्या डोळ्यांनी घास भरावयाची. या मायेचा आधार या जगात कोणाकडेच नाही. कारण आपल्या शिक्षणाचे, संस्काराचे, चारित्र्याचे पहिले विद्यापीठ ते म्हणजे आईच असते. ईश्वराचा भास आईच असते.

माणूस जगात येतो ती वेगवेगळी नाती बरोबर घेवूनच. प्रथम जगात सर्वात सुंदर नात मिळते ते म्हणजे आई आणि वडील. आपल्याला अनेक नाते मिळतात. भाऊ–बहिण, मामा–मावशी, आजी–आजोबा, पण त्याही पेक्षा प्रेमळ नाते ते म्हणजे आईचचं असते. परिस्थितीला सामोरा जाण्याचं काम ती आईच करते. वडील कितीही खंबीरपणे उभे राहिलेतर त्या कार्यात आईलाच पुढाकार घ्यावा लागतो. आई ही दुःख लपवून ठेवते आणि दुःखाच्या ठिकाणी सुखच दाखविते.

अशा बालपणातील अनेक आठवणी आज आठवतात. म्हणून सांगावसं वाटतं की, 'गेले ते दिवस आणि राहिल्या त्या आठवणी.'

मी आज महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे. यामागचे शिक्षण मी मजूरीतूनच केले आहे. आम्ही सर्वच बहिण–भावांनी मजूरी करुनच शिक्षण घेतले; परंतु शिक्षणाच्या बाबतीता आईने कधीच माघार घेऊन दिली नाही. आई म्हणजे प्रयत्न करत रहा. 'प्रयत्नांच्या वेलीवर यशाची फुले असतात.' तुम्ही पण शिका आणि दुसऱ्यांनाही ज्ञान द्या असेच तिचे दोन शब्द सांगणे आहे.

आर्थिक परिस्थिती पहिल्यापासूनच बिकट आणि हालाकीची परंतु कष्टाने, मेहनतीने, जिद्दीने मनामध्ये असलेली महत्वाकांक्षा, आत्मविश्वास या भावानेने घेतलेल्या शिक्षणामध्ये कधीही व्यत्यय, अडचण येवू शकत नाही. आईला वाचनाची खूप आवड. आई दिवसभर मजूरी करुन, कष्ट करुन घरी आली की, स्वयंपाक करायची तरीही ती कधी थकलेली नसायची. ती रोज पुस्तक वाचायची, अजूनही वाचतेच. तिने झाडझाडती (विश्वास पाटील) यांचे पुस्तक आहे. त्याचबरोबर विद्यासदनातील गमती जमती (प्राची सहस्त्रबुध्दे), इसापनीतीतील गमती जमती, कथा टायझरच्या (सुरेश भोसले), जीवन विद्येचा मंगल कलश (वामनराव पै), यांची अशी अनेक पुस्तके तिने वाचलेली आहेत. तसेच शैक्षक्षिक पुस्तकांचेही वाचन तिने केले आणि मलाही तीच ओढ वाचनाची पुस्तक असो. विनोदी असो, चकाट्या काहीही वाचण्यासारखे असले तरी ते पूर्ण वाचूनच टाकायचे. मला तर नक्कीच वाटते की, वाचलेले पुस्तक मस्तक सुधारते आणि सुधारलेले मस्तक कधीही कोणापुढे नतमस्तक होत नाही. हे कष्टाचेच फळ आहे. वाचन अन् लेखन माझा जणू हातखंडा.

आईला मी आज शिकते आहे त्याचेच खूपच



Scanned with CamScanner

खूप कौतूक वाटते. मी लहान होत तेव्हा पहिलीच्या वर्गात बसत नव्हते. शिक्षकांची भिती वाटायची म्हणून आणि आज महाविद्यालयामध्ये उच्च वर्गामध्ये शिक्षण घेत आहे. आईला खूप कौतूक वाटते. आपुलकी वाटते. जेव्हा माझ्या या कष्टाला फळ आले.

माझ्याकडे शिक्षणासाठी पैसा नाही, आर्थिक परिस्थिती नाजूक, परंतु न डगमगता आणि न हिंमत सोडता मी जिद्दीने शिक्षण घेत आहे. महाविद्यालयामध्ये असलेल्या 'कमवा आणि शिका' या योजनेअंर्तगत मी शिक्षण घेत आहे; परंतु महाविद्यालयामध्ये असलेले ज्यांना मी आदर्श शिक्षक मानते ते म्हणजे फुगट सर यांनी खूप मदत केलेली आहे. आर्थिक मदतीत या शिक्षकांकडूनच मला झालेली आहे. त्यांची मी अक्षरश: ऋणी आहे. आपण म्हणतो आपले आधारभूत घटक म्हणजे आपले आई–वडील आणि महत्त्वाचे म्हणजे शिक्षक.

आपल्याला कितीही आयुष्यामध्ये कितीही दु:ख आले तरीही ते बाजूला सारुन टाकायचे कारण आपल्या दु:खांना केवळ आपणच जबाबदार असतो. आपण भविष्याचे कर्ते केवळ आपणच असतो. शेवटी जीवन, आयुष्य घडवण हे आपल्याच हातात आहे आणि आलेल्या परिस्थितीला बदलणे हेही आपल्याच हातात आहे.

तेव्हाच बदलते परिस्थितीतून जीवन.  
परिस्थितीची किंमत करा.... लढायला शिका.  
कधीतरी थकायचे, कधीतरी रुसायचे,  
कधीतरी उगीचच रागवायचे,  
यात काय मौज आहे, तुम्हाला काय सांगायचे,  
यंत्र नाही माणूस आहे  
माणसा सारखं जगत आहे  
माणसा सारख जगायचे !  
मन मोठी चीज अजब  
माणूसकिला किंमत आहे  
पैशाला विचारतोय कोण ?  
आज आहे, उद्या नाही  
किंमत त्याची शून्य आहे  
म्हणून सांगते परिस्थितीशी लढायचं आहे.

----***----

## मराठीपणा...

माझं मराठीपण  
मी शोधलं सह्याद्रीच्या डोंगरात  
संताच्या शब्दात  
इतिहासाच्या पानांत ...  
तेव्हा सारीजण हसून म्हणाली  
आम्ही शोधलं,  
आमच मराठीपण  
या भूमीवर माणसाच्या मनात,  
त्याच्या जखमांत, त्याच्या रक्तात  
ज्यातून उपसतात, सूर्याचे किरण  
मराठीपण ओलांडून साऱ्या  
आकाशाला गवसणी घालणारे ...

**भालेराव हर्षल सीताराम**  
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

# बाप

कु. जगताप पूजा सुनिल, प्रथम वर्ष (बी.ए.)



लक्षात नसलेला बाप, वडिल, बाबा, पप्पा, पिता लिहण्याला, बोलण्याला खूप चांगला, पण आपण प्रत्येक जण सहजपणे नेहमी जाणून बुजून शब्द उच्चारतो तो म्हणजे बाप होय बाप... त्याच बापाविषयी थोडी माहिती.

आई घराचे मांगल्य असते, तर बाप घराचे अस्तित्व असतो. पण घरांच्या या अस्तित्वाला खरच कधी आम्ही समजून घेतलं आहे का ? वडिलांना महत्त्व असूनही त्यांच्या विषयी जास्त बोललं जात नाही, लिहिलं जात नाही. कोणताही व्याख्याता त्यांच्या विषयी बोलत नाही, लिहीत नाही, पण कोणताही व्याख्याता आई विषयी जास्त बोलतो. संत महात्म्यांनी आईचेचं महत्त्व सांगितले आहे. देवांनाही आईचे तोंडभरुन कौतूक केले आहे.

चांगल्या गोष्टींना आईची उपमा दिली आहे. पण बापाविषयी फारस बोललं जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला, पण तोही तापड, व्यसनी, मारझोड करणारा. समाजात एक दोन टक्का तसेही असतील, पण चांगल्या वडीलांबद्दल काय ?

आईकडे अश्रूंचे पाट असतात, तर बापाकडे संय्यमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते, पण सांतवण बापालाच करावे लागते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात असते, पण जेवणाच्या शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही सहज विसरतो ! स्वतःचा बाप वारला तरी वडिलांना रडता येत नाही ? कारण छोट्या भावंडांना जपायचे असते. आई गेली तरी रडता येत नाही, कारण बहिणींचा आधार व्हायचे असते. पत्नी अर्ध्यावर सोडून गेली तरी पोरासाठी आवर घालावा लागतो.

वडिलांच्या टाचा झिजलेल्या पायाकडे पाहिले की, त्यांचे प्रेम कळते, मुलीला कपडे घेतील, मुलाला जिन्स घेतील, पण स्वतः मात्र जुनी पॅन्टच वापरायला काढतील.

बाप आजारी पडला तर पटकन दवाखान्यात जात नाही ? तो आजाराला मुळीच घाबरत नाही. पण डॉक्टर एक – दोन महिने आराम करायला लावतील याची त्याला भिती वाटते. कारण पोरीचं लग्न, पोराचं शिक्षण बाकी असतं. घरातून उत्पन्नाचं दुसरं साधन नसतं. ऐपत नसली तरी मुलाला मेडिकलला, इंजिनियरला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढताण सहन करुन त्या मुलाला दर महिन्याला पैसे पाठवले जातात. पण सर्वच नसली तरी काही मुल मित्रांना



Scanned with CamScanner

परमीट रुममध्ये पार्ट्या देतात. ज्या बापाने पैसे पाठवले त्याच बापाच्या नावाने हाका मारतात. त्याच बापाची टिंगल करतात. आई घराचे मांगल्य असते, तर बाप घराचे अस्तित्व असतो. ज्या घरात बाप असतो त्या घराकडे कोणीही वाईट नजरेने पाहू शकत नाही ? कारण घरातला कर्ता जिवंत राहतो, पण तो जरी काही करत नसला तरी त्या पदावर असाते.

कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते. कारण ती जवळ घेते, कवटाळते, कौतुक करते. पण गुपचूप जावून पेढ्यांचा पुडा आणणारा बाप कुणाच्या लक्षात राहत नाही. चटका बसला, फटका बसला, ठेच लागली तर आई गं ? हा शब्द बाहेर पडतो. पण हायवे ओलांडत असतांना एखादा ट्रक जवळ येऊन ब्रेक अचानक दाबतो तेव्हा बाप रे ? हा शब्द बाहेर पडतो. छोट्या संकटांसाठी आई चालते, पण मोठी मोठी वादळे पेलवतांना बापच आठवतो. कोणताही बाप श्रीमंत लेकीच्या घरी जात नसतो ? मात्र गरीब लेकीच्या घरी उभ्या उभ्या का होईना चक्कर मारतो. मुलांच्या नोकरीसाठी साहेबासमोर लाचार होणारा बाप, मुलीच्या स्थळांसाठी उंबरठा झिजवणारा बाप खरच किती ग्रेट असतो.

लहानपणी बाप गेल्यावर त्यांच्यावर अनेक जबाबदाऱ्या पडतात. त्यांना एका वस्तुसाठी तरसावे लागते. वडिलांना खऱ्या अर्थाने समजून घेते ती त्या घरातली मुलगी, सासरी गेल्यावर अथवा घरापासून लांब असलेल्या मुलीला बापांशी फोनवर बोलतांना आवाज क्षीण येतो. मग ती अनेक प्रश्न विचारते. कोणतीही मुलगी स्वत:च्या इच्छा सोडून बाप म्हणेल तेव्हा विवाहांच्या बोहल्यावर उभी रहायला तयार होते.

मुलगी बापाला जाणते, जपते, इतरांनी सुद्धा बापाला जाणाव ही किमान बापाची इच्छा असते.

## क्षण

जगायचं म्हणून जगू नका
क्षण आहे अनमोल जगायला शिका ...

वेळेला महत्व असतं, तेव्हा कधी समजलं नाही
वेळ गेली आता, पश्चाताप सहन होत नाही ...

कसं असतं ना हे जगणं, तडपण्या सारखं,
उठा जागे व्हा, काहीतरी करा जीवनात
आल्यासारखं ...

किती हे सुंदर जग, डोळ्याविना दिसलं नसतं,
माझंच मला कळत नाही, काहीतरी केल पाहिजे
होतं

माणूस हा एकदाच येतो, काहीतरी केलं पाहिजे,
अनमोल देह, कारणी लावला पाहिजे

स्वप्न माझे खूप आहे, वाट सापडतच नाही,
येईल एक दिवस, माझं मला कळतच नाही ...

माणूस असताना माणसाची किंमत कळत नाही
दूर गेल्यानंतर माणूस माणसाला दिसत नाही ...

काय असतं जगणं, शोधलं पाहिजे,
मनुष्य जन्म सार्थकी लावला पाहिजे ...

मनातल्या मनात काही तरी सांगावसं वाटतं
मला ना खूप मोठ व्हावसं वाटतं....

**जाधव धनश्री भाऊसाहेब**
– तृतीय वर्ष (बी.ए.)

# मातृदेवो भव

तिडके ज्योती, (स्व-लिखित), तृतीय वर्ष (बी.ए.)



मातृ देवो भव । पितृ देवो भव । आचार्य देवो भव । आईला देव मानणाऱ्या, पित्याला देव मानणाऱ्या व आचार्यांना देव मानणाऱ्या आपल्या या भव्य भारतीय संस्कृतीचे जेवढे गुणगान गाऊ तेवढे थोडेच आहे. परंतु आजच्या या भौतिकवादाच्या प्रवाहत बुडालेल्या व्यक्तीवादी व भोगवादी बनलेल्या मानवी जीवनात भोगवादी व स्वार्थी विचारांचे तांडवनृत्य जेथे चाललेले आहे, अशा काळात या सुंदर व उदात्त विचारांना मानव जीवनात कोठे स्थान आहे व केवढे स्थान आहे ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

''आई म्हणोनी कोणी आईस हाक मारी
स्वामी तिन्हा जगांचा आईविना भिकारी...
चारा मुखी पिलांच्या चिमणी हळूच देई
गोठ्यात वासरांना त्या चाटतात गाई...
सांगेल ना म्हणाया आम्हा शुभं करोति...
ये रागवावयाही परि येई येई वेगे...''

आईबद्दलच्या या सुंदर,भव्य व प्रेमळ भावनेचा क्षुद्र भोगात रमणाऱ्या भोगच ज्यांच जीवन सर्वस्व अशा मानवांना जरा स्पष्ट शब्दात सांगायचे झाले तर, ज्यांच्यातील मानव नाश पावलेला आहे, असे म्हणावे लागेल अशा या पशूंना त्या भावनेची कल्पना कोठून येणार ?

आजपासून पन्नास-साठ वर्षांपूर्वी घडलेली ही घटना आहे. रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर नावाचे गाव आहे त्याच्या जवळील एका लहानशा खेड्यात एक ब्राह्मण राहात होता. त्या ब्राह्मणाचा एकुलता एक मुलगा फार हुशार होता. आई-वडिल डोळ्यातील पुतळीसारखे त्याला जपत असत. आई त्याला राजा म्हणत होती. पण त्यांच्या घरात राजाचे वैभव नव्हते. गरिबी ही त्यांची दौलत होती. राजाने नाव काढावे हीच आई-बापांची महत्त्वाकांक्षा होती. राजा हा खूप खूप शिकतो. तो पुढे जिल्ह्याचा कलेक्टर होतो. राजाची मेहनत व आई बापाची आंतरिक प्रार्थना भगवंतांनी ऐकली. राजा बी.ए.झाला सर्व युनिर्व्हसिटीमध्ये प्रथम आला. हे सर्व शिक्षण घेत असतांना तो मायदेशी जावे राजाला वाटले व आई-वडिलांना एकवेळ भेटून यावे तसेच शिक्षण पूर्ण झाल्यानंतर राजाचे सुंदर युवतीची लग्न झाले आणि थोड्या दिवसात वर्तमानपत्रात बातमी व फोटो आला. नाशिकला कलेक्टर म्हणून त्याची नेमणूक झाली होती. कोणत्या आईचे मन स्वतःच्या मुलाचा फोटो वर्तमानपत्रात पाहून हरखून जाणार नाही

? कोणता असा पिता असेल जो हा समाचार ऐकून मुलाला शाब्बासकी द्यायला आतूर होणार नाही ? आईला हेच कळत नव्हते हा समाचार ऐकून हसावे की रडावे ? आणि आज तोच मुलगा आपल्या आईला मोलकरणीसारखे घरात कामाला ठेवतो. काय अर्थ आहे कलेक्टर होण्याचा आणि काय अर्थ आहे श्रीमंत बनण्याचा म्हणून मी माझ्या सर्व मित्र मैत्रिणींना सांगते की, विसरा सर्वांना पण आई-बापाला कधीही विसरु नका. मातृदेवो भव , पितृ देवो भव, आचार्य देवो भव.

'आई !' हे शिक्षणच असे आहे की, ते मानवी जीवनच नाश करुन टाकते. हे शिक्षण घेतल्यानंतर सर्व भावजीवन विसरुन जातात. भोगजीवनाच्या ओढीसमोर भावजीवनाच्या कल्पनाच नष्ट होतात. माणूस कृतघ्न बनतो. मी घराघरात जाईन, गावागावात फिरेन, मुलांना हे भावजीवन समजावीन. मातृदेवो भव । पितृदेवो भव। चे पाठ जीवनात आणायला शिकवीन. हेच आता माझे प्रायश्चित्त. आणि त्या राजाने कलेक्टरपदाचा राजीनामा दिला. स्वत:चे उरलेले आयुष्य संस्कृतीच्या या महान कार्यासाठी समर्पित केले.

मी शेवटी एवढेच सांगेल.

''पाकळ्याचं गळणं म्हणजे फुलांचं मरण असतं
मरतांनाही सुगंध देणे हेच खर आयुष्य असतं.
असं आयुष्य जगणं म्हणजे खरचं सोन असतं
पण या आयुष्यात आई-वडीलांसारखे माणसे
मिळाली, तर हे जगणं खरंच सोन्याहून पिवळं
असतं.....'' धन्यवाद...!

----***----

## चारोळी

चालतांना दोन पाय किती विसंगत
एक पुढे असतो, एक मागे असतो
मागच्याला अपमान नसतो
पुढच्याला अभिमान नसतो
कारण त्यांना माहित असतं
की क्षणांतच हे बदलणारं असतं
याचंच नाव जिवन असतं.

**गचाले अर्चना बाळासाहेब**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)

## चारोळी

हसण्याची इच्छा नसतांना
हसावे लागते
कसे आहे विचारले तर
मजेत म्हणावे लागते
जीवन एक रंगमंच आहे
इथे प्रत्येकालाच
नाटक करावे लागते

**गचाले अर्चना बाळासाहेब**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# जेव्हा आई तुझी खूप आठवण येते

तिडके पूजा सुनिल – द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



मित्रांनो, लग्न झाल्यावर जेव्हा आम्हाला आमच्या आईची आठवण येते. तेव्हा आमच्या मनात होणारी तळमळ इथे व्यक्त केलेली आहे.

आई तुझी खूप आठवण येते
आता माझी सकाळ साडेपाचला होते
आणि रात्र बारा वाजता तेव्हा
**''आई तुझी खूप आणवण येते....**
सगळ्यांना गरम गरम जेवायला वाढते
आणि स्वत:मात्र थंड झाल्यावर जेवते
**तेव्हा आई तुझी खूप आठवण येते....**
जेव्हा सासरी कुणी आजारी पडते
तेव्हा त्याच्या सेवेसाठी लगेच हजर होते
पण तेव्हा मला बरं नसते तेव्हा
स्वत:ची काळजी स्वत:च घेते
**तेव्हा आई तुझी खूप आठवण येते....**
रात्री सर्व झोपल्यावर आठवणीने सर्वांना
पांघरुन घालते, पण त्यावेळी मला
पांघारुन घालायला कुणीच नसतं
**तेव्हा आई तुझी खूप आठवण येते...**
सर्वांच्या गरजा पूर्ण करता करता
स्वत:लाच विसरते
**तेव्हा आई तुझी खूप आठवण येते.....''**

कदाचित ही कहाणी लग्नानंतर प्रत्येक मुलीची होते. लग्न अगोदर प्रत्येक मुलगा मुलीला 'वचन' देतो की, लग्न झाल्यावर सासरी तुला आईची आठवण येऊ देणार नाही. तरी का आई तुझी खूप आठवण येते गं? माहेर म्हणजे काय ? अशी एक जागा जिची किंमत असेपर्यंत कळत नाही, माहेर म्हणजे अशी एक जागा जी पैशाने विकत मिळत नाही.

माहेर म्हणजे अशी एक जागा जिथे कोणी आपल्याकडून काहीच अपेक्षा करत नाही, माहेर म्हणजे अशी एक जागा जीथे आपल्याला कधी एकटे वाटत नाही. माहेर म्हणजे अशी एक जागा जिथे हसणं, खिदळनं, खाणं, पिनं याशिवाय आपल्याला काहीही करता येत नाही.

माहेर म्हणजे अशी एक जागा जिथं पुरुषांना कळत नाही, माहेर म्हणजे अशी एक जागा जिथे आई नाही तर काही नाही.

----***----

# खरं प्रेम

गचाले अर्चना बाळासाहेब – द्वितीय वर्ष,(बी.ए.)

प्रेमाला भाषेचे, देशाचे, प्रांताचे बंधन नसते. मनातून व्यक्त होत असल्यामुळे ते थेट पोहोचत आणि फुलतं तसेच प्रेमाला वयाचं, नात्याचं, जातीचं, धर्माचं, गरीब, श्रीमंतीच ही बंधन नसतं. प्रेम केवळ तरुण, तरुणीचं नसतं तर आई, मुलगा, भाऊ–बहीण, वडील–मुलगा, आजी–आजोबा, नात–नातू, भाऊ–भाऊ, बहिणी–बहिणी, मित्र–मैत्रिणी, नवरा–बायको अशा विविध नातेसंबंधातून प्रेम व्यक्त होत असते. याशिवाय गुरू–शिष्य, डॉक्टर–रुग्ण यांच्यातही आपुलकीचं, प्रेमाचं नातं, विश्वासाचं, आदराचं, कृतज्ञतेचं नातं असतं. हेही प्रेमाचच रुप म्हणता येईल. प्रेम म्हणजे भक्ती ज्ञानेश्वर, संत तुकाराम, मीराबाई अशा अनेक संताची भक्तीसुद्धा प्रेमाचेच प्रतिक म्हणता येईल. प्रभूप्रेमासाठी त्यांनी जीवन अर्पण केलं. प्रेमापायी हे सारे संत, सारे जग विसरुन गेले. घराघरात प्राणीमात्रात, निसर्गात अवघा देव भरुन राहिलाय हेच त्यांनी दाखवून दिले.

प्रेमाचा अर्थ व्यापक आहे. प्रेम विश्वव्यापी आहे. प्रेम ही भावना–वैश्विक आहे. त्यामुळे जगात इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा प्रेमविषयक कथा, कांदबऱ्या, प्रेम कहाण्या अधिक लोकप्रिय असतात. या सर्वांतून निखळ प्रेम आणि फक्त प्रेमच दिसून येते.

लहानपणापासून आपण प्रेम अनुभवत असतो. आई–वडील, शिक्षक, मित्र, मैत्रिणी यांचे प्रेम लहानपणी साथ देतं. तरुणपणी प्रेमाचा आणखी वेगळा अर्थ समजतो आणि ते प्रेम मिळविण्यासाठी तरुणींची धडपड चालू असते. यावेळी समोर आदर्श असतो. तो लैला–मजनू, हिर–रांझा, रोमिओ–ज्युलियट, सोनी–महिवाल अशा काही अजरामर प्रेम कहाण्यातील नायक–नायिकाच्या ठराविक वयात, प्रत्येक जण अशा प्रेमाच्या शोधात असतो. काहींना समोरुन तितकाच प्रतिसाद मिळतो. तर काहींना नकार सहन करावा लागतो. अशा वेळी निराशा येते.

आत्महत्येचे विचार डोकावतात तेव्हा कुसूमाग्रजांची कविता, प्रेमकविता, प्रेमाचा अर्थ समजून सांगत असते. नकारावर ही माणसाला प्रेम करता आले पाहिजे. या नकाराचा होकार कसा करायचा ही जिद्द ही त्यांची कविता शिकवते. नकारावरही तुम्ही प्रेम करु लागतात. तर तुम्हाला जगण्याचं बळ मिळेले. त्यासाठी नकार स्विकारण्याची तयारी असावी लागते.

प्रेम ही अतिशय हळवी आणि नाजूक भावना आहे. त्यात कुठेही ओढाताण, खेचाखेची, जबरदस्ती करता येत नाही. जबरदस्तीने कोणाचेही प्रेम मिळवता येत नाही किंवा चार पैसे देऊन विकतही घेता येत नाही. जे या मार्गाने प्रेम मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्यांना एकतर प्रेमाचा खरा अर्थच समजलेला नसतो. मात्र असे लोक प्रेमवीर म्हणून ओळखले जातात. अनेकदा आपण वर्तमान पत्रातून वाचतो की, एकतर्फी प्रेमातून प्रेमवीरांचे प्रेयसीला जाळणे, मारणे, हल्ला करणे, ॲसीड टाकणे अशा बातम्यांमध्ये या लोकांचा उल्लेख प्रेमवीर करणे चुकीचे आहे. प्रेमवीर म्हणजे ज्याने प्रेमासाठी स्वत:च्या प्रेमाची बाजी लावली आहे. असा



Scanned with CamScanner

किंवा जो प्रेम मिळविण्यासाठी सर्व अडथळे दूर करतो. इच्छित प्रेम प्राप्त करुन घेतो. तो प्रेमवीर म्हणता येईल. बळजबरीने किंवा हिंसक मार्गाने प्रेम मिळविण्याचा प्रयत्न करणारा खलनायकच म्हटला पाहिजे.

कारण प्रेमाला प्रेम हेच उत्तर असते. प्रेमात आणि युद्धात सारं काही माफ असते, असे म्हणतात. परंतु जीवावर बेतणारे प्रेम कधीही माफीच्या लायकीचे नसते. प्रेमाला प्रतिक असणारा दिवस 'व्हॅलेंटाईन डे' तरुणांमध्ये विशेष लोकप्रिय असलेला दिसतो. पण या दिवसाच्या पार्श्वभूमीवर अनेकदा अनिष्ट परिणाम अनुचित घटना घडतात. आणि खापर मात्र प्रेमाच्या प्रतिक असलेल्या या व्हॅलेंटाईन डेच्या नावाने फोडले जाते.

खरे प्रेम काय आहे हे जगाला पटवून देण्याचे काम तरुणाने कसे केले पाहिजे.

'कविवर्य मंगेश पाडगांवकर' यांनी असे म्हटले आहे.

''प्रेम म्हणजे, प्रेम म्हणजे
प्रेम असतं
तुमचं आणि आमचं
अगदी सेम असतं.''

प्रत्येक जण प्रेम करत असतो. ते व्यक्त करण्याच्या पद्धती बदलत असतात. प्रेम कसंही व्यक्त झालं तरीही चालेल पण त्यामागे एकमेकांत गुंतण्याने समर्पित होण्याची भावना असावी लागते. तर ते प्रेम यशस्वी होत, फुलत जातं, प्रेमाची व्याख्या करणं तसं कठीण आहे. त्यापेक्षा प्रेम करणं सोप आहे नाही कां ?

----***----

# देश झोपलाय....

सीमेवर गोळीबार,बॉम्ब इथे फोडू नका,
मस्त झोपलाय देश झोप त्याची मोडू नका ...
भ्रष्टाचार पसरतोय... पसरु दे,
रुपया घसरतोय.... घसरु दे,
अंगावरचे पांघरुन उगाचचं ओढू नका..


लुटालुट, बलात्कार... बघूच नका,
रांगेमध्ये उभे रहा... बोलूच नका,
नेत्यांचेच पाया पडा... बोल त्यांचे ऐका,
मस्त झोपलाय देश, झोप त्याची मोडू नका...

त्यांचे सारेच चांगले.....बोलत रहा,
आपले मत पैशाने.... तोलत रहा,
कमरेवरच सांभाळा ते मात्र सोडू नका...
मस्त झोपलया देश, झोप त्याची मोडू नका...

खायला नसले चालेल.... पुतळे बांधा
नाड्या हरवल्या तर... सुतळ बांधा
असे हवे नको उगाच चर्चा झाडू नका...

गांधी रस्ता खड्ड्यात..... चालूच नका,
देशसेवा बाता आता... बोलूच नका,
मरणाणीच वाट उगाच राष्ट्र जोडू नका...
मस्त झोपलया देश झोप त्याची मोडू नका...

**पवार दिपाली नामदेव**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)






Scanned with CamScanner

# मराठी संस्कृती

गचाले अर्चना बाळासाहेब – द्वितीय वर्ष,(बी.ए.)



नेहमी असे म्हटले जाते की, महाराष्ट्राची संस्कृती म्हणजे केवळ ज्ञानोबा माऊली तुकाराम आहे. वास्तविक महाराष्ट्र संस्कृतीची ही मर्यादा नाही. विशालता आहे. व्यापक आहे. क्षितीजही व्यापक व समृध्द अस्तित्व तशी समृद्धता संस्कृतीत आहे. १३ व्या शतकात होऊन गेलेले ज्ञानेश्वर त्याच्या ओव्या–अभंग आजही खेडो–पाडी घराघरात पोहचले आहे. या संतांचे तत्वज्ञान हे लोकशिक्षणाचे महत्त्वाचे साधन आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीत मराठी संताचा फार मोठा वाटा आहे. विज्ञान प्रगत असूनही पंढरपूरला आषाढी एकादशीला जाणारी वारी पाहिली की, महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन झाल्याशिवाय राहत नाही. मन थक्क होऊन जाते. मानवी श्रद्धेची कमाल वाटते. अबालवृद्ध एवढे मोठे अंतर पायी चालतात. पण एका आनंदात, समाधानात घडून गेलेले असतात.

महाराष्ट्र संस्कृतीत ही जशी संताची परंपरा आहे. तशी या संस्कृतीशी जवळचे नाते सांगणारी पुर्वापार चालत आलेली अशी साहित्यिकांची परंपरा आहे. मुकुंदराजांच्या 'विवेकसिंधु' पासून मराठी लिखानाला प्रामुख्याने प्रारंभ झाला. त्यानंतर ज्ञानेश्वर केवळ मराठीतूनच साहित्य निर्मिती करुन थांबले नाहीत, तर मराठीची थोरवी त्यांनी गायली.

**''माझ्या मराठाची बोलू कौतुके ।**
**परि अमृतातेही पैजा जिंके ॥''**

अशा शब्दांत मायबोली बद्दल अभिमान बाळगला याचा परिणाम संपूर्ण समाजावर झाला व प्रत्येक जाती जातीतील माणूस हा लिहू लागला. संत चोख्यामेळ्यांसारखा महार, सावता माळी, नरहरी सोनार, नामदेव शिंपी, तुकाराम वाणी, वेश्यापूंजी, कान्होपात्रा या सर्वांचे लिखान हाच महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अमोल ठेवा आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीत श्रद्धेला महत्त्व आहे. साधे पाहा ना, आपले रोजचे वारही प्रत्येक देवतेचे ठरवून गेलेले आहे. त्या महिन्यांचे सणवार, उत्सव ठरलेले आहेत. बारा महिन्यांत वेगवेगळ्या प्रकारचे सण येतात. सणाच्या वेगवेगळ्या पद्धती आणि रितीरिवाज झालेले आहेत. हे सण सुरु होण्यामागे इतिहास आहे. नागपंचमी सण घेतला तरी



Scanned with CamScanner

अनेक कथा त्या नागपूत्रांमागे आहेत. त्या दिवशी घरांतील माणसे नागाची पूजा करतात. त्याला प्रार्थना करतात. कुणी काही चिरत नाही, तोडत नाही, कापत नाही, भाजत नाही. चैत्र महिन्यांत चैत्र गौरी असतात. ह्या दिवशी देवाभोवती सुंदर आरस करुन महिला एकत्र येतात. हळद-कुंकू देतात. सर्वजणी घरातून बाहेर पडून पुन्हा एकत्र येऊ शकतात. तर काही सण असे आहेत की, त्या दिवशी निसर्गाने केलेल्या कार्याचे मानव ऋण व्यक्त करतात. उदा. खेड्यात शेती हा प्रमुख व्यवसाय असतो. ही शेती बैलावर आधारलेली अवलंबलेली आहे. म्हणून शेतकरी 'बैलपोळा' या दिवशी बैलाची पूजा करतो. त्यांना गोडधोड खायला घालतो. त्या दिवशी या बैलांना सुट्टी असते. ह्या सणावारांतून महाराष्ट्राची अशी खास संस्कृती दिसून येते. महाराष्ट्रातील संस्कृतीचा विचार करताना कवी वसंत बापट यांच्या केवळ माझा सह्यकडा ह्या कवितेची नेहमी आठवण होते.

**''कणखर देशा राकट देशा, दगडांच्या देशा**
**प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा''**

----***----

## चारोळी

माझीया मना
नाद सोड आता
ती तुझी नाही
मान्य कर आता

**गचाले अर्चना बाळासाहबे**
द्वितीय वर्ष (बी.ए.)

## लेकीची हकीगत



नकोशी होती का
आई-बाबा मी तुम्हाला,
का केलं असावं दूर तुम्ही मला,
दुसऱ्याच्या हातात हात देताना,
काय वाटत आई-बाबा तुम्हाला,
आई नऊ महिने सांभाळलं तू मला,
बाबा हात धरुन चालवलं तुम्ही मला,
इतका जीव लावला तुम्ही मला.
का, दिला असावा माझा हात दुसऱ्याच्या हातात,
काळजाचा तुकडा म्हणून सांभाळलं तुम्ही मला,
मग का सोडलं लोकांच्या दारात मला,
राहू द्या ना आई-बाबा तुमच्या जवळ मला.
मी खूप प्रेम केलं तुमच्या त्या मायेला,
घर-दार सोडून कशी जाऊ सोडून तुम्हाला.
मग का केला असावा, इतका प्रेमाचा अट्हास
इतका जीव लावून लोकांची केली का मला...?
ये माय-बापा सोडून नाही शकत मी तुम्हाला...!
पोरा समान धरता म्हणे पोरीला,
मग पोरीनेच का जावे, सोडून आई-बापाला.
एकाच मायेच्या पोटी येऊन कसा हा भेदभाव,
पोरगा दिवा म्हणता, मग तर पोरगी तर दिव्याची वात, पोरासमान का नाही धरत पोरीला,
मग तिला पण पाहिजे आई-बापाची साथ.
आई-बापाची सेवा करायची लेकीला
मग काय काढून दिला तिला लोकांचा दारात.
लहानचं मोठं केल आई-बाबा तुम्ही मला,
सोडून दिलंच पाहिजे का लोकांच्या दारात मला...

**जाधव धनश्री भाऊसाहेब**
- तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# स्त्री : भ्रूण हत्या

कु. हाटकर गायत्री संजय, प्रथम वर्ष (बी.कॉम.)



एकदा वर्तमानपत्रात एक बातमी वाचली. डॉक्टरांच्या समोर जोडपं बसलं होतं. ''डॉक्टर आम्हाला मुलगी नकोय !'' होणाऱ्या बाळाचे बाबा बोलले.

''तुम्हाला कसं कळलं मुलगीच आहे म्हणून?''

'तुम्ही टेस्ट करायला नकार दिलात. मग आम्ही शेजारच्या राज्यातील सोनोग्राफी सेंटरवर टेस्ट करुन आलो.' बाळाचे बाबा म्हणाले.

'मग तिथंच का केलं नाहीत अॅबॉर्शन?' डॉक्टर म्हणाले. 'तिथं सोय नव्हती, त्यांनी दिला होता पत्ता एका डॉक्टरचा; पण त्यांची फी खूपच जास्त वाटली. मग म्हटलं की, तुम्ही ओळखीचे आहात. लाखाऐवजी हजारात काम होईल.' बाळाचे बाबा निर्विकारपणे बोलले. 'मी काय कसाई वाटलो काय तुम्हाला?' डॉक्टर संयम ठेवत पुढे म्हणाले, 'अहो, तुम्हाला पहिली मुलगीच आहे.' इतका वेळ गप्प बसलेली बाळाची आई म्हणाली.'म्हणून तर दुसरी मुलगी नकोय आम्हाला. दुसरा मुलगाच हवा. दोन मुली नकोत.'

डॉक्टरांनी आईच्या मांडीवर बसलेल्या त्या पहिल्या मुलीकडं पाहिलं. निरागस, निष्पाप बोलके डोळे. हसरा चेहरा, नजरानजर होताच ती बाहुली डॉक्टरांकडे झेपावली. त्या चिमण्या जिवाला डॉक्टरांनी जवळ घेतलं. डॉक्टर काही बोलत नाहीत हे बघून मुलीचे बाबा म्हणाले. 'फी व्यवस्थित देऊ आम्ही. शिवाय ही बातमी कुठेही लीक होणार नाही याची खात्री!' डॉक्टरांचे डोळे आता लकाकले. होणाऱ्या बाळाच्या आई-बाबांना ते म्हणाले, 'तुमचा विचार पक्का आहे ? तुम्हाला खरंच दोन मुली नको आहेत ? परत विचार करा.' मुलीचे बाबा म्हणाले.

'पक्का आहे विचार... दोन मुली नकोत.'

'ठीक आहे मग तर आपण आईच्या पोटातली मुलगी राहू देऊ. या पहिल्या मुलीला मी मारुन टाकतो. म्हणजे तुम्हाला एकच मुलगी राहील.' असे म्हणत डॉक्टरांनी टेबलवरची सुरी उचलली व त्या पहिल्या मुलीच्या गळ्याला लावली. आणि त्या मुलीची आई मोठ्यांदा किंचाळली. 'थांबा, डॉक्टर काय करताय ?.... तुम्ही डॉक्टर आहात का कसाई ?' डॉक्टर शांतपणे मंद हसत दोघा आई-बाबांकडे बघत होते. निष्पाप मुलगी हसत खेळत होती. दोनच क्षण शांततेत गेले अन् आई-बाबांच्या लक्षात सारा प्रकार आला. ते भयानक खजिल झाले. इतकेच म्हणाले. 'आम्हाला



Scanned with CamScanner

माफ करा डॉक्टर, आम्ही कसाई व्हायला निघालो होतो. आमची चूक आम्हाला कळाली.' ते जोडपं कडेवरच्या आणि पोटातल्या आपल्या दोन्ही राजकन्यांसह केबीनमधून बाहेर पडतांना डॉक्टर म्हणाले, 'आणखी एक सांगायचं राहिलं.... आमच्या व्यवसायात देखील काही राक्षस प्रवृत्तीचे लोक आहेत. हे दुर्दैव आहे. त्यातलेही काही इतक्या नीच थराला गेले आहेत की, सोनोग्राफीत मुलाचा गर्भ दिसला, तरी पैशासाठी तो मुलीचा आहे म्हणून सांगतात !'

आता मात्र आई-बाबांच्या पायाखालची जमीनच सरकली !!! ही बातमी जेव्हा मी वाचली तेव्हा मला कळाले की, मुलगी ही आई-वडीलांसाठी एक ओझचं असते. पण आम्ही मुलींनी असे कोणते पाप केले आहे की, मुलगी जन्मत:च आईच्या डोळ्यांतून अश्रू व वडिलांच्या खांद्यावर भार वाढतो. पण मुलगा जन्माला आला की, आई वडिलांचे पोट आनंदाने भरते, असे द्विविचार लक्षात घेता असे वाटते की, आम्ही मुली कोणत्या जन्माचे पाप भोगत आहोत ? हा अन्याय मुलींनाच का सहन करावा लागतो ? मुलगी जगात यायच्या आधीच आई-वडील मुलीला मारुन टाकतात. हे सर्वात मोठं पाप करतात. असे म्हणतात की, सर्व दानांमध्ये 'कन्यादान' सर्वात श्रेष्ठ दान आहे. पण आई-वडील हे दान करण्याऐवजी सर्वात मोठे पाप करतात ते म्हणजे स्त्रीभ्रूण हत्या. पूर्वी मुलगी जन्माला आली की, मुलीची आजी झाली किंवा इतर म्हातारी माणसं म्हणायची कारटीच आहे पण ती कारटी दोन घरांचा रथ आहे. माहेरचे व सासरचे ही दोन्ही चाके ती ओढत असते. आमच्या गावात घडलेली एक घटना आहे. एका जोडप्याला चार मुली झाल्या व एक मुलगा झाला. त्या मुलांच्या वडिलांनी गावातल्या सर्वा लोकांना जेवण दिले, का तर घराला वारस मिळाला. वंशाला दिवा मिळाला. त्या वडिलांनी मुलींच्या शिक्षणाला बंदी घातली, पण त्या मुलींनी हार न मानता शिक्षण चालूच ठेवले. पुढे त्याच मुली मोठ्या पदावर गेल्या. एक डॉक्टर व एक मुलगी वकील झाली. तेव्हा त्याच वडिलांची मान अभिमानाने उंचावली. आणि त्या मुलाला मोठ्या शाळेत शहरात शिक्षणास पाठवले, पण तो मुलगा वाईट व्यसनांना लागला. त्याने काही दिवसात आई-वडीलांना घरातून काढून दिले. तेव्हा वडिलांच्या तोंडातून एक वाक्य निघाले, 'तुझ्याऐवजी मुलगी असती तर माझी मान खाली न जाता आणखी गर्वाने उंचावली असती.' तेव्हा त्या मुलींना मुलगी असल्याचा अभिमान वाटला. ही घटना आमच्या गावातील सर्वांसाठी एक मोठा आदर्शच आहे. म्हणूनच मुलगी ही आई-वडिलांची संपत्तीच आहे. मुलगी ही घरातील लक्ष्मी आहे. घरात स्त्री नसेल तर घराला घरपण येत नाही असे म्हणतात. मुलगा हा वंशाचा दिवा असतो, पण मुलगी ही आधाराची काठी आहे. म्हणूनच मुलगी दोन्ही घराचे नाव काढते. मुलगी जन्माला आली तर एक बाळाला आई, भावाला बहिण, वडिलांना मुलगी, नवऱ्याला बायको व मित्राला मैत्रीण मिळू शकेल. म्हणूनच मुलगी झाली तर दु:ख न मानता आनंद झाला पाहिजे. आपल्या घरी मुलगी जन्माला आली तर लक्ष्मी आली. खरंच स्त्रीभ्रूणहत्या बंद झालीच पाहिजे. स्त्री ही देशाची कर्तीधर्ती आहे. ती वाचवण्याचा प्रयत्न करा. बेटी बचाओ, बेटी बढाओ !



Scanned with CamScanner

# फॅशन

साळुंके गायत्री बाजीराव, प्रथम वर्ष (बी.कॉम.)



फॅशन ! फॅशन म्हणजे तरी काय ? फॅशन या तीन अक्षरात जणू सगळं जग सामावलं आहे. फॅशन कोणाला आवडत नाही ? ती सर्वांनाच आवडते. फॅशन म्हणजे लोकांमध्ये अतिप्रिय झालेली एखादी पद्धत ! आणि फॅशनचा हेतू तरी काय असतो ? आपण इतरांपेक्षा सुंदर अन् आकर्षक दिसावे, इतकांच असतो, खरे की नाही ?

सध्या फॅशनची खूपच प्रसिद्धी वाढली आहे. फॅशनवर सिनेमे निघत आहेत, तर सारखे नवीन नवीन टी.व्ही. चॅनल बघायला मिळताहेत. फॅशनचे वेडच सध्या पिढीत दिसत आहे की, त्यांच्यामागे इंटरनेट, मोबाईल, टी.व्ही. सिनेमा लागले आहेत.

अहो, नटायला-थटायला कोणाला आवडत नाही ? पण काहीजण फॅशनला उगीच नावे ठेवतात. समजा फॅशन आलीच नसती तर ? तर आपणही आपल्या पुर्वजांप्रमाणे न कपडे घालताच फिरत असतो. डोक्यावर केसांचा झाप झाला असता. नखे मोठी झाली असती इ. केवळ फॅशनच्या वेडामुळेच आपण आज या अंगभर कपड्यात नटून-थटून बसलेले आहोत. फॅशनचे वेड किती व कशा प्रकारे असते याची कल्पनासुद्धा करु शकणार नाही.

आपण नेमके उलटे करतो. फॅशन चांगली का वाईट ? याचा विचार न करता आपण त्या स्विकारतो. सिनेमाच्या नादी लागून व फॅशनच्या वेडाला बळी पडून आपण नेहमीच स्वत:ची फजिती करुन घेत असतो. आधीचे हिरो टाईटफिट पॅन्ट घालायचे. म्हणून कॉलेजकुमार त्याच्या नादी लागले. एकदा काय झाले, खूप गंमत झाली. वर्गात धिंगाणा करतांना एका कॉलेजकुमाराची पॅन्ट फाटली. सर्वजण खूप हसू लागले. बिचारा शरमेने पाणी पाणी झाला. नंतर फटाक-फटाक वाजणारी आणि रस्ते झाडत चालणारी बेलबॉटम आली. बेलबॉटम म्हणजे आपलाच पाय आपल्याच पॅन्टमध्ये अडकून आपटायचे.

इंग्रज भारतात आले आणि सुटाबुटाची फॅशन ठेवून गेले. या फॅशनमुळे आजही साहेब लोक गरमीने गुदमरुन ऑफिसात बेशुद्ध पडतात. अशा कपड्यातला नवरदेव एकदा मिरवायला गेला. चक्क उन्हातल्या मिरवणुकीत चक्कर येऊन घोड्यावरुनच पडला.

मध्यंतरी काळा गॉगल 'दबंग' ची फॅशन आली. तेव्हा मोठी पंचायत व्हायची की, अल्ला के नाम दे दो, असे म्हणणारे आंधळे व गॉगल्सचे हिरो कोण ? हे काही कळायचे नाही.

हा सर्व परिणाम फॅशनच्या वेडामुळेच झाला. आता तर एकामागून एक आयटम साँग येत आहेत. जे 'मुन्नी बदनाम हुई, शीला की जवानी, चिकनी चमेली' हे सुद्धा फॅशनचे वेड आहे. प्रेक्षकांनी या गाण्यांना इतके डोक्यावर घेतलंय की, गणपती मिरवणुकीत 'मुन्नी' आणि नवरात्रीतही 'मुन्नीचं'.

स्त्रिया म्हणजे संस्कृतीचा वारसा आणि आरसा! पूर्वी कशा अंगभर कपडे घालयाच्या. आता असून नसल्यासारखं ! आधी जिचे केस सर्वांत लांब ती सुंदर समजली जात. आता काय बॉबकट, बॉयकट, यु कट, स्टेप कट, ब्लड कट इ. आता तर तेही गेलं. टी.व्ही.वर तर चक्क चमनगोटा केलेल्या बाया दिसतील. तुम्हीच सांगा बॉयकट केल्यावर व शर्ट-पॅन्ट घातल्यावर मागून बाई कशी ओळखावी ? त्याच्या उलटा आता पुरुष वेण्या घालायला लागले आहेत. त्या वेणीला लाडाने 'टेल' म्हणतात. बिचारा आडाणी माणूस चुकून 'मॅडम' म्हणून हाक मारतो. हा मॅड रागाने वळून पाहातो. मॅडमच्या तर मिश्या आणि दाढी पाहून समोरचा बिचारा आश्चर्यचकीत होतो.

फॅशन म्हणजे माणसाचे अविभाज्या अंग बनले आहे. फॅशन म्हणजे विविधता सर्वांना आवडते व हवी वाटते. पण तिचा अतिरेक होता कामा नये. पण स्त्रियांची गोष्टच निराळी. रात्रं-दिवस आरशासमोर उभ्या राहून नटतील आणि म्हणतील, ' मी कशाला आरशात पाहू गं, मीच माझ्या रुपाची राणी गं....'

सर्वांनी एक लक्षात घ्यावे की, फॅशन आपणासाठी आहे. आपण फॅशनसाठी नाही. नेहमी चांगल्या त्याच फॅशन घ्याव्यात आणि स्वत:चा व समाजाचा विकास करावा. मग कोणतेही वेड जे चांगल्यासाठी असते ते सर्वांनाचा हवेहवेसे वाटते. (संग्रहीत)

## स्वप्न...

ज्या समुद्रापलीकडं कुणी गेलं नाही
तेथे मला जायचं आहे.

त्या पलिकडच्या भयंकर वस्तुस्थितीत
विश्वचित्र मला रेखाटायचं आहे...

गरिबांच्या स्वप्नांच्या इमारतीचा
पाया मला भरायचा आहे.

आणि त्या पायावर मला
गगनचुंबी इमारत बांधायची आहे.

उमटलेल्या पावलांवर पाय
ठेवून मला चालायचं नाही.

नवीन पाऊल मला निर्माण करायची आहेत.
जे सत्य आजवर सापडलेलं नाही.

ते सत्य मला शोधायचं आहे.
गरिबांच्या स्वप्नाचा तारा मला व्हायचं आहे.
आकाशात तारा बनून कायमस्वरुपी मला रहायचं आहे...

**पवार दिपाली नामदेव,** द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# काळोखाची रात्र...

भालेराव सागर बाळासाहेब, तृतीय वर्ष (बी.ए.)

'पाणी जीव पण वाचवितो आणि पाणी जीव पण घेत असतो.' असंच काही या ठिकाणी घडले आहे. एका रात्रीतून होत्याचं नव्हतं झालं होतं. काय झाले होते या रात्री ? कोणता होता तो दिवस ? कोणती होती ती भयंकर रात्र ? आणि सर्वत्र पसरलेला तो काळोख आणि पावसाने घातलेलं थैमान. या घटनेला कोण जबाबदार राहील ? सरकार की, निसर्ग? या ठिकाणी चूक कोणाची पण असो, पण या घटनेत त्या सामान्य माणसांपुढे मृत्यूची दरी आणि दु:खाचा डोंगर उभा झाला.

३ ऑगस्ट २०१६ वार बुधवार जिल्हा रायगड, ता. महाड या ठिकाणी घडलेली सावित्री नदीवरील घटना. या नदीवर असणारा पुल आणि सावित्री नदीस आलेला पूर व त्या पुराच्या पाण्याने घेतलेला भयंकर वेग. सावित्रीनं धारण केलेल्या रौद्र रुपाने या नदीवर असणारा ५०० मीटर लांबीचा ब्रिटीशकालीन पूल मध्यभागी खचला आणि नको असणारी घटना घडली. गोवा व मुंबई महामार्गावरील जाणारी वाहतूक या घटनेस बळी पडली. रात्रीची १० वाजेची वेळ होती. सावित्री नदीस महापूर आलेला होता आणि पाण्याची पातळी प्रचंड वाढलेली होती.

महापूराच्या प्रचंड वेगाने सावित्री नदीवरील पुल मध्यभागी कोसळला, पण वाहतूक सुरुच होती आणि त्यामध्ये वेगाने वाहणारी वाहतूक ही तुटलेल्या भागातून खाली सावित्री नदीच्या पात्रात कोसळत होती. पण असं कमीत कमी ११.३० पर्यंत चाललं होतं. पण नदीचं पात्र मोठ असल्याने याची कोणालाचं काहीच कल्पना येत नव्हती. एका व्यक्तीने ही घटना बघितल्यानंतर. त्या व्यक्तीला थोडा संशय आला म्हणून त्याने पुढे जाऊन बघितलं तर तो हैराण झाला होता. लगेच त्या व्यक्तीने समोरील वाहतूक ताबडतोब थांबवून घटनेबद्दल माहिती दिली. आणि प्रशासकीय यंत्रणेस माहिती दिली. पण दीड तासात किती गोंधळ उडाला असेल विचार करवत नाही.

या घटनेला तत्पर मदत मिळविण्यासाठी स्थानिक प्रशासनाने ताबडतोब काम सुरु केले आणि मग सर्वत्र खळबळ उडाली आणि सरकारी कामगार आणि सरकारची झोपच उडाली. मग बघता बघता सुरु झाले ते सर्व ऑपरेशन आणि चौकशी, परंतु या घटनेत गेलेल्या प्रवाशी व त्यांनी बघितलेली शेवटची रात्र, घेतलेला शेवटचा श्वास किती भयंकर असे दृश्य असेल याची कल्पना सुद्धा करु शकत नाही. कारण सर्वत्र काळोख पसरलेला होता. पावसाने थैमान घातलेले होते आणि त्या कोळख रात्रीचे चमकणारी विजेचे दिवे फक्त दिसत होते. आणि त्यामध्ये जे प्रवाशी मृत्यूमुखी पडले त्यांचा शेवटचा आवाज हा गोंधळत होता, पण सकाळपर्यंत खूप काही माहीत हाती आली होती. त्यानुसार ४०-४५ प्रवासी बेपत्ता झाल्याचे समजले आणि सरकारी बसेस, खाजगी वाहने सुद्धा यामध्ये बेपत्ता झाले असे समजले होते. पण त्यामध्ये



Scanned with CamScanner

कोणत्याही प्रवाशाला पुर्नजन्म मिळलेला नव्हता. सर्व प्रवाशांना या घटनेत जलसमाधी मिळाली होती. या घटनेत खूप जिवीत हानी झालेली होती. सरकारने खूप प्रयत्न केले. प्रशासकीय यंत्रणेचे सर्वत्र प्रयत्न सुरु होते. पण वेळ जाऊन शहाणपण येणे हे खोटेपणाचं लक्षण म्हणावे की काय आणि सरकारने तर मदत केली, मृत्यूमुखी प्रवाशांच्या कुटूंबियांना पैसे देण्यासाठी सरकारने जाहीर केले, पण पैसा पैशाच्या ठिकाणी राहतो पैशाने जीव परत येत नाही. या घटनेत त्या प्रवाशांचे नशीब म्हणावे की, सरकारची चूक. यास जबाबदार कोण ? पण असो अंगावर अक्षरश: शहारे येणारी भयानक घटना घडली आणि त्या प्रवाशांच्या आयुष्यातील ३ ऑगस्ट ही रात्र काळोखाची भयंकर रात्र ठरली. त्या प्रवाशांना या सुंदर जगातून निरोप घ्यावा लागला.

## चारोळी



आई - वेगळीच असते
डोळे मिटून प्रेम करते
ती प्रेयसी असते
डोळे मिटल्या सारखे करते
ती मैत्रीण असते
डोळे वटारुन प्रेम व्यक्त करते
ती पत्नी असते आणि
डोळे मिटेपर्यंत प्रेम करते ती
आई असते

**गचाले अर्चना बाळासाहेब**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)

## जीवनाच्या वाटेवरुन चालतांना....

जीवनाच्या वाटेवरुन चालतांना
एक-एक दिवस घालवावा लागतो
कधी सूख पेरावं लागतं, कधी दु:ख झेलावं लागतं.
जीवनाच्या वाटेवरुन चालतांना....
एक-एक दिवस घालवावा लागतो
कधी कुणाला हसवावं लागतं
कधी कुणाला रागवावं वाटतं
जीवनाच्या वाटेवरुन चालतांना....
एक - एक दिवस घालवावा लागतो
कधी कुणाला शिकवावं लागतं
कधी कुणाकडून शिकाव लागतं
जीवनाच्यो वाटेवरुन चालतांना....
एक - एक दिवस घालवावा लागतो
कधी कुणाला समजून घ्यावं लागतं.
कधी कुणाला समजावून घ्याव लागतं
जीवनाच्या वाटेवरुन चालतांना....
एक - एक दिवस घालवावा लागतो
कधी कुणाचं ऐकावं लागतं
कधी कुणाला सांगावं लागतं
जीवनाच्या वाटेवरुन चालतांना....
एक - एक दिवस घालवावा लागतो
कधी आयुष्यच संपावं लागतं
मृत्यूच्या स्टेशनवर धावावं लागतं
जीवनाच्या वाटेवरुन चालतांना....
एक - एक दिवस घालवावा लागतो

**आहेर पूनम राजेंद्र** - द्वितीय वर्ष (वाणिज्य)

# एक स्त्री

कुटे मोनाली रामराव, तृतीय वर्ष (बी.ए.)



'एक स्त्री' विषय तसा फार छान आहे. पण त्याचे कार्य अनेक आहे जे अवघ्या जगात कुणाचेच नसेल...

माझ्या या वाक्याचा राग कदाचित पुरुषांना नक्कीच येईल. कारण त्यांच्याहूनही मोठ स्थान मी एक स्त्रीलाच देतेय. पण एवढं लक्षात घ्या. पुरुषांना जन्म देणारी एक स्त्रीच आहे. जिला आपण 'आई' म्हणतो. आम्ही कमावतो म्हणून कुटूंब वाढतं, पण स्त्री स्वयंपाक बनवते तेव्हाच अन्न पोटात जाते. हे मात्र लक्षात कोणी घेत नाही... आणि तुम्ही जर कमावतात. एका आईचा मुलगा/बायकोचा पती असो यातून एक स्त्रीचा पाठिंबा जेव्हा मिळतो. तेव्हा तुम्हाला अपयश कधीच येत नाही. येणारही नाही. आणि आलेच तर ती नक्कीच तुम्हाला यशाचा शिखर गाठण्याचा मार्ग दाखवेल. अर्ध्यावाटेत सोडणार नाही. पुरुष पगार कमावतो... नोकरीत काम करुन... सुट्टीच्या दिवशी किरकोळ काम सोडून बाकी वेळ घालवतो व्हॅटस्अप आणि टी.व्ही. बघून... पण एक आई किंवा बायको ही कधी आपल्याला दिवसभर आराम करतांना दिसली कधी ? नाही ना... आईला आज सुट्टी आहे... तिला स्वयंपाक बनवायचा नाही किंवा तिला तिच्या या कार्यासाठी पगार मिळतोय... इनाम मिळतोय.. असे ऐकण्यात कधी आले नाही... सांगा ? सांगा ना... माझ्या या प्रश्नाचं उत्तर मरेपर्यंत मला मिळेल कधी...

आज एका बाईने आपल्या मुलाच्या खोड्यांमुळे त्याला घराबाहेर काढलं आणि त्याला जेवणापासून वंचित केलं.... असं ऐकलत कधी ... ? माहित आहे. आई......रागावते, मारते, हवं ते बोलते.... पण आपल्या भावाकडे, बहिणीकडे निरोप देते.... जेवण तरी करुन घे... उपाशी राहू नकोस.. दोन घास खाऊन घे... अन्नावर राग काढू नये... तेव्हा कुठे आपण जेवण करतो आणि वरुन म्हणतो.... तिने कुठे मला जेवायला सांगितले... तिला माझी काळीजी नाही... मी तिच्यासोबत बोलणार नाही.... किती सोप्पं असतं ना हे बोलणं.... ती सगळ्यांचा विचार करते... पण तिच्या मनाचा विचार कुणीच करत नाही... तिच्या मनातलं गुपीत कुणी जाणू शकत नाही. पहाटे उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत (अंथरुण टाकण्याचेही काम) ती सर्व कामे करते. आपण सहज बोलतो स्त्रीच्या पोटात कोणतीच गोष्ट टिकत नाही... हसू येईल... पण तिच्या पोटात नऊ महिने एक बाळ टिकून राहतं... त्याचं



Scanned with CamScanner

काय ... ? असं बोललं जात मुलगी शिकून काय करणार... नवरा करून लोकांच्या घरी तर जाणार... पण हा विचार केला जात नाही की, ती शिकली तरचं पुढे येणारी पिढी सुशिक्षित होईल. मुलगा म्हणतो, मला इंजिनियर व्हायचंय तेव्हा सहज होकार मिळतो. आणि खिशातून पैसे निघतात. मग कर्ज काढावं लागलं तरी चालेल... मुलगी म्हणते बाबा मला शिक्षिका व्हायचंय.. किंवा एक अधिकारी व्हायचयं.. तेव्हा एक वाक्य येतं. अगं मुलगा आमच्या म्हातारपणाची काठी आहे. तो कमवेल ते आमच्यासाठी तू काय लग्न झाल्यावर तुझं सगळं तिकडंच...

'एका स्त्रीच्या प्रत्येक स्वप्नांवर सहज पाणी फेरल जातं.'

पण तरीही ती निराश होत नाही... कारण तीचं मन शुद्ध असतं... ती एकच ठरवते... ठिक आहे.... लग्न झालं तर मी एक चांगली गृहिणी होईल.. माझं सासरं हेच माझं माहेर असेल... सासू-आई तर सासरे – वडील असंच समजून तेथे नांदेल.... प्रत्येकाचे मन जपण्याचा मी नक्कीच प्रयत्न करील.... ही गोष्ट मात्र अगदी खरी आहे. असा विचार १००% स्त्रीयांपेक्षा ७५% स्त्रीया नक्कीच करतात... अशी मी ग्वाही देते.... कारण काही खट्याळ देखील असतात... आपण म्हणतो एका स्त्रीत ताकद नसते, हिम्मत नसते... तिला थोडे खरचटले तरी ती ते सहन करु शकत नाही... हे अगदी चुकीचं, असत्य आहे... कारण प्रत्येक स्त्रीचा एक नवा जन्म होतो... एका बाळाला जन्म देतांना ... ती मरणाच्या यातना सहन करते.... मग तिच्यात एवढी ताकद कोठून आली असेल... याचा अभ्यास केला कुणी... ? मुलगा झाला असेल तर लगेच सगळ्या नातेवाईकांना फोन केले जातात... पेढे वाटले जातात... देवाचे नवस फेडले जातात... असं कधी झालंय पहिली मुलगी झाली... म्हणून गावात पेढे वाटले... नवस फेडले...

**'बेटी बचाओ, बेटी पढाओ'**

हे वाक्य फक्त बोलण्यातच आले... पण खऱ्या अर्थाने यास स्विकारण्यात आले आहे का ?

मुलगी जन्माला आली की, दु:ख झालेलंच असतं... कारण पुढे तिच्या लग्नाचा खर्च येणार असतो ना... मुलाच्या लग्नाच्या वेळी सुनेच्या अंगावर डाग घालायचा खर्च आपोआप केला जातो... नाही कां.... खरं आहे नां.... मुलगी लहानाची मोठी होत असतांना तिला प्रत्येक वेळी असं सांगितलं जात, अगं बाई तू मुलगी आहेस... तुला जोरात हसणं शोभत नाही... तुझी पोरीची जात... जास्त वेळ झोपून राहायच नाही... जास्त हट्ट करायचा नाही... जे मिळेल ते खायचं.. जे येईल ते घ्यायचं... प्रत्येक काम आलंच पाहिजे... जास्त बोलायचं नाही... टी.व्ही. कमी बघायचा... मुलीला मोबॉईल कशाला ? बाहेर जास्त वेळ फिरायचं नाही...?

**का ? कां ? कां ???**

एका स्त्रीला, एका मुलीलाच एवढी बंधने का ? मुलगा घराबाहेर दिवस-रात्र राहतो.... तेव्हा त्याला कुणीच बोलत नाही... जेवणाच्यावेळी मला ही भाजी नको... मला ते हवं, तेव्हा सहज लाड पुरवले जातात... २४ तास टी.व्ही. बघितला तरी कुणी रागवत नाही... भाऊ तू १०वी १२ वी चांगल्या टक्क्याने पास हो तुला अॅन्ड्राईड मोबाईल घेतो... आम्ही ८०, ९०%.... मिळवून त्याची काहीच किंमत नाही... मग असं का ? मुलींनाच अशी वागणूक का दिली जाते... तिच्या प्रत्येक स्वप्नांवर, भावनांवर लाथ मारली जाते.... पुरुषांना इतकी जपायची नसतील, तितकी नाती एका स्त्रीला जपायची असतात... कधी विचार केलाच नसेल... बरोबर ना... एक स्त्री– एक आई, मुलगी, बहिण,

मावशी, काकी, आत्या, नणंद, पुतणी, आजी, सून, वहिनी, मामी, नात, सासू, भाची.... एवढी नाती एका स्त्रीला जपायची असतात... या भूमिका तिला पार पाडाव्याच लागतात... तसेच यांना जोडून एक पुरुषांची नाती – मुलगा, नातू, भाचा, वडील, आजोबा, काका (वडिलांचे भाऊ आणि मावशीचे पती), मामा (आईचे भाऊ आणि आत्याचे पती), भाऊ (नंदेच्या नवऱ्यालाही भाऊ असं म्हटलं जात...) पुतण्या... अशी एका पुरुषाची नाती... मग यात काही ठिकाणी भूमिका ही एकच येते... हो ना... मग एका स्त्रीच्या महिलेच्या भूमिकेला माझा सलाम हा नक्कीच आहे...असं म्हणायला हरकत नाही..

स्त्री–पुरुष समानता हे वाक्य एका कागदावर ठेवू नका....ही एकच विनंती आहे... माझ्या बोलण्यातून तुमची मनं दु:खावली असतील.. फक्त एकच करा.... प्रत्येक स्त्रीकडे चांगल्या नजरेने बघा... स्त्रीचा आदर करायला शिका... असे संत तुकारामांनी आपल्या समोर नाद लावायला आलेल्या स्त्रीला ताई म्हटलं... तिच्या देखील भावनांना बदलून टाकलं... एवढी ताकद त्यांच्या वागणुकीत, त्यांच्या संस्कारात होती... हे त्यांच्या उदाहरणातून सिद्ध होते.... हे त्याचंया आत्मविश्वातून शक्य झाले.... शिवाजी महाराजांचा फोटो बघून एक मुस्लिम स्त्री त्यांच्याच माणसांच्या वर्तनामुळे आपले चारित्र्य जपण्यासाठी एका मराठ्याच्याच घरात गेली होती.. एवढा गाढ विश्वास शिवाजी महाराजांच्या एका फोटोमुळे एक अनोळखी पुरुषांवर ठेवला.... मग आत्ताच युग एवढ का बदललं... ? एका स्त्रीने आपल्याला भाऊ म्हणण्यापेक्षा आपणच आधी तिला ताई म्हटलं तर... आयुष्यात कधी कुणावर एवढा विश्वास ठेवणार नाही इतका या गोड आणि पवित्र शब्दांमुळे तुमच्यावर विश्वास ठेवते...

बहिण भावाच नातं हे खूप अतूट बंधन असतं...त्याला जपता आलं पाहिजे.... ज्याला बहिण नाही, त्याला बिचारा बहिण नसल्याचे दु:ख जेव्हा राखी बांधायला कुणीच येत नाही.... त्याच्या सुखासाठी देवाकडे प्रार्थना करणारी नसते... एकच धागा असतो... तो नात्याला बळकट करणारा..... घट्ट बनवणारा... त्याला टिकवता आलं पाहिजे... त्या धान्याची गाठ मात्र आयुष्यात कधीच सुट्टू देऊनका... तिच्यातला तुमच्या विषयीचा विश्वास तुट्टू देऊ नका... काही ठिकाणी भाऊ आपल्या बहिणीला तिची मर्यादा दाखत असतो.... धाक नावाची गोष्ट तर माहितच असेल... ते तो करत असतो... पण इतकाही अधिकार नाही तुमचा की, आपल्या बहिणीवर आपले हात साफ करावे... लहान भावांना फार सवय असते... इकडून आलं की बहिणीला एक तरी चपाटा दिलाच पाहिजे, टोमने दिलेच पाहिजे.... पण एक लक्षात ठेवा... या चेष्टेतून तुम्ही कधी कधी आपल्या बहिणीचा अपमान करतात... तिचा विश्वास गमावतात... एक विचारु ? एक लहान बहिण आपल्या मोठ्या भावाला मारते असं ऐकलत का ? उलट तो तेव्हाही तिलाच हुशारकी शिकवतो... दबाव टाकतो... मग असं का असतं... ? तुमच्यात ताकद असते.... तुमच्या या मारहाणीतून तीच माघार घेते.... कारण तिला शहाणपणा नि समजुत दारपणाची वागणूक दिली जाते. मग याच शहाणपणाची अन् समजूतदारपणाची जाण एका मुलाला, भावाला का दिली जाऊ शकत नाही... किंवा त्यांना स्वत:लाच घेता येत नाही का हे ज्ञान...

असं म्हणतात की, भावाने बहिण आणि भाच्यांसाठी जितकं केलं.... तेवढं पुण्य लागत.... पण एक सांगू... खरंच बहिणीला दोन प्रेमाच्या शब्दांची ओढ असते.... मायेची गरज असते...



Scanned with CamScanner

लग्न करुन जेव्हा एखादी मुलगी सासरी जाते... तेव्ही ती त्या घरची लक्ष्मी असते... तिचा छळ होता कामा नये... सासू आणि सून दोघींनी माय-लेकी प्रमाणे वागलं, राहिलं तर घराची सुख-संपदा वाढेल... घरात शांतता राहिल.... आनंदी वातावरण राहिल....आणि पुरुषांनी आपल्या बायकोवर संशय नावाची गोष्ट घेऊ नये.... त्यानेच खरी संसाराची राख-रांगोळी होत असते.... आपली बायको घरी असते... मी बाहेर असतो... मग ती काय करत असेल... ? नाही... प्रत्येक पुरुष नाही करत असा विचार परंतु काही आहेत. अहो, मुलगी लग्न झालं की, तिचं सगळ काही सोडून तुमच्यासाठी तुमच्या घरी येते. तिचे असलेले मनातील सगळे स्वप्न त्याग करते.... आणि तुम्ही तिच्यावर असा संशय घेता... ती म्हणते का कधी, कि तुम्ही ऑफीसमध्ये जातात, रात्री उशीरा येतात... कुणासोबत होता ? काय करत होता ? एवढा उशीराच का येतात... ? नाही ना... मग तुम्ही ही तिच्या विषयी चांगलेच विचार करा आणि आपला संसार टिकवण्याचा प्रयत्न करा...

स्त्रीयांविषयी मला फार कौतूक आहे. अभिमान आहे असं नाही... पण जे लिहिलंय, जो अभ्यास आहे तो सत्य आहे... अहो तिच्या मरणानंतर तिची आठवण देखील कुणी ठेवत नाही... तिचं श्राद्ध झालं की तिचे पित्र देखील नसतात... फक्त अविवाहित स्त्री मृत पावली की, तिची नवमी घालतात... प्रत्येक स्त्रीच मरण पुरुषाच्या आधी नाही येत ना... कधी कधी या निसर्गाचे नियम देखील मनाला पटत नाही...

खंर आहे, पुरुष पैसा कमावतो पण तो स्वत:साठी नाही, कुटूंबासाठी... मग हेही खरं, सत्य आहे एक स्त्री जीवन जगते तर ते स्वत:साठी नाही, आपल्यासाठी...

'स्त्री-पुरुष समानतेचे आचरण करा, त्याला योग्य स्थान द्या... स्त्री-पुरुष एकत्र आले तर नक्कीच जग पुढे चालेल...'

स्त्रीयांचे मी जेवढे कौतूक केलंय... त्यांच्या कार्याला सलाम केलाय... तर त्यांच्याकडून एवढीच अपेक्षा आहे.... त्यांनी चांगलंच वागावं... सासू-सासरे यांना आई-वडिलांप्रमाणे वागवावं... नवऱ्याचा विश्वास टिकवून ठेवावा... आणि मुलींनी आई वडिलांना सोडून दुसरा गैरविचार, वर्तन, अन्य निर्णय घेऊ नयेत...

## वात्सल्य....



तुझी सोनुली, छकुली
मी तुझी लाडकी बाहुली
तुला उन्हाचे चटके,
मला पदराची गं सावली
तुझे उपकार थोर, किती सोसल्या यातना
माझा जन्म होई, तुझा हर्ष गगनी मावेना
तुझ्या मनातलं आई, मला गूपीत माहीत
तुझं वासरु - लेकरु, जसं अत्तर कुपीत
किती प्रेम, किती माया, किती झिजवीशी काया
लेक 'धन' परक्याची सांगे,
धावे कुशीत की घ्याया
तुझे पाणवती डोळे आणि थरारतो हात
माझा 'जीव' कासावीस, तुझा 'जीव' गं माझ्यात
दिली 'संस्काराची' शिदोरी पुरुन उरणारी
नाव काढेन दोन्ही दारी, 'सुख, दुःखालाही भारी.

**कु. हाटकर गायत्री**
- द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# आदर्श व्यक्तिमत्त्व - डॉ. बाबासाहेब आमटे

**भालेराव सागर बाळासाहेब**, तृतीय वर्ष (बी.ए.)

समाजातील वेगवेगळ्या स्तरावर समाजकार्य करणारी मंडळी मी बघितली आहे. समाजासाठी वेगवेगळ्या स्वरुपात मदत करत असतात. पण आज तुमच्यासमोर आगळी-वेगळी प्रतिमा जी समाजकार्य आणि समाजसेवा करण्यासाठी जिद्दीने आपले पाऊल टाकत आहे. त्यांना कोणत्या शब्दांनी संबोधावे हेच समजत नाही ? असे महान व्यक्तिमत्त्व म्हणजे - डॉ. बाबा आमटे !

जन्म १९१४ साली चंद्रपूर जिल्ह्यात झाला आणि आयुष्यातील सर्वक्षण कुष्ठरोगीच्या सेवेसाठी खर्च केले. जिल्हा - चंद्रपूर, ता. वरोरा, मु. पो. आनंदवन. आनंदाने भरलेले आनंदवन गाव. बाबांनी जिवनातील प्रत्येक क्षण आनंदवनात घालविला. बाबाच्या जन्मानंतर त्यांच्या आयुष्यात कुठल्याही गोष्टीची कमी नव्हती. कारण घरची परिस्थिती खूप चांगली होती. लहानपणापासून बाबांनी आपल्या स्वत:ला समाजातील प्रत्येक भागात सहभागी करुन घेतले होते. बाबाचे वडील सरकारी नोकरीला होते. शाळेतील वयापासूनच बाबाचं राहणीमान खूपचं साजेसे होते. तेव्हाच्या काळात मोटार गाडीने बाबा कॉलेजला येत-जात असत. त्यातच बाबांना वेगवेगळ्या क्षेत्रातील छंद जडला होता. बाबा तेव्हाच्या काळात श्रीमंत असले तरी समाजातील माणसापासून अलिप्त कधीच नाही राहीले. बाबांना समाजातील माणसांबद्दल प्रेम, आपुलकी होती. सर्व समाज बाबांना आपलासा वाटत होता. बाबांचा नेहमी एक शोध सुरु असायचा तो म्हणजे आपल्या आयुष्यातील जगण्याचं उद्दिष्ट काय आहे ? म्हणजे बाबांच्या अंगात नेहमी प्रयोगशीलपणा चालू असायचा, समाजाबद्दल इतके प्रेम का वाटतं तर बाबांना डॉक्टर होऊन समाजातील प्रत्येक स्तरापर्यंत माणसांची सेवा करायची होती. (समाजसेवा करायची होती) पण त्यावरुन बाबाचे आणि त्यांच्या वडिलांचे कधीच सूत्र नाही बसले. त्यामुळे वडिलांच्या इच्छेप्रमाणे पर्यायाने वकिलीच्या शिक्षणासाठी जावे लागले. आणि शेवटी वडिलांचा मान ठेवून वकिलीचे शिक्षण पूर्ण केले आणि नंतर बाबांनी वकिल म्हणून काम केले. काही कालावधीनंतर बाबांनी वकिली सोडून देण्याचा निर्णय घेतला आणि नाही - हो करता करता शेवटी १९३९ साली वकिली सोडली. आणि इतरत्र कामे करत गेली. कारण या काळामध्ये बाबांवर महात्मा गांधीच्या विचारांचा प्रभाव पडायला सुरुवात झाली होती. त्यामुळे बाबावर वेगवेगळा प्रभाव पडून समाजाबद्दल काहीतरी करण्याची इच्छा निर्माण झाली होती. आणि बाबांना सर्वधर्म समभाव वाटत होते. समाजातील सर्व लोक समान वाटू लागले होते. पण एकदा बाबा कामावरुन घरी येत असतांना त्यांना गटारीत पडलेला कुष्ठरोगी दिसला. तुळशीराम त्याचे नाव होते. कान-नाक झडून गेलेले, अंगावर झालेल्या जखमा. हे सर्व बघून बाबा काही क्षण हादरले होते, पण आता खरी समाजसेवा बाबांच्या आयुष्यात (जीवनात) सुरु होणार होती.

आणि तो कुष्ठरोगी निर्जीव होऊन पडलेला होता. वरुन पाऊस पडत असताना बाबांनी हे दृश्य बघून मनात पळून जाण्याजोगा विचार आला, पण तसं न करता बाबांनी आपल्याकडे असणारा तरट (रुमाल) त्या कुष्ठरोगीच्या अंगावर टाकला. मग बाबांच्या मनात रात्रभर वेगवेगळे विचार येत होते. बाबांना वाटत होते की, त्या कुष्ठरोगीसारखा मला पण कृष्ठरोग झाला तर काय ? असे विचार बाबा करत होते.अशा अनेक प्रश्नांनी बाबांच्या मनाचा ताबा घेतला होता.

एकदा गांधीजींनी बाबांना, 'अभय साधक' अशी पदवी दिली होती. पण बाबांना या पदवीची लाज वाटू लागली होती आणि ते बोलायचे मी एका कृष्ठरोगाला घाबरुन पळतोय मग मी कसला अभय साधक असा प्रश्न बाबा स्वत:च्या मनाला विचारत होते. मग बाबाच्या मनाने दिलेले उत्तर होते की, इथून पुढे मी कृष्ठरोगीची सेवा करीन. हा निर्णय पक्का झाला होता. डॉ. बाबा आमटे नेहमी म्हणायचे, मी कुष्ठरोग्याच्या कामात का आलो ? तर कारण माझी कुष्ठरोगीबद्दल असणारी भिती जावी म्हणून मी त्यांची सेवा करीत आहे. कुष्ठरोगीची सेवा करण्याचा प्रवास मग बाबांनी जगभरातील कुष्ठरोगीबद्दल अभ्यास सुरु केला आणि दत्तपूर या ठिकाणी जाऊन कुष्ठरोगीची कुलधामात सेवेसाठी बाबा रोज जात असत. बाबांना संपूर्ण प्रशिक्षणात्मक म्हणून अनुभव घेत, पुढे त्यांनी स्वत:ला इतके या कामात झोकून दिले होते की, बाबांना घराच्यांकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. तरी पण बाबांनी आपले कार्य चालूच ठेवले. बाबा नेहमी एक वाक्य बोलायचे की, 'मला थोर नेता वगैरे व्हायचं नाही, तर मला फक्त हातात तेलाची बुधली घेतलेला मॅकेनिकचं व्हायचं आहे.' असं प्रेरणादायी वाक्य बाबांनी सांगितलेले होते. पुढे बाबा आपला समाजकार्यासाठी म्हणून डॉक्टरीचे प्रशिक्षणासाठी गेले, पण त्यांना डॉक्टर नसल्यामुळे प्रशिक्षणासाठी कुठलाही सर्टिफिकेट मात्र मिळाले नाही. कारण बाबांकडे डॉक्टर पदवी नव्हती पण बाबा इतक्यातच कसं थांबताय. प्रशिक्षणाहून परतल्या नंतर १९५२ साली त्यांनी वरोरामध्ये पाच ते सहा कि.मी. अंतरावर ५० एकर जागा मिळाली. ती संपूर्ण जमीन जंगलरुपी होती. पण बाबा आणि ताईने आणि त्यांना जोडी सहा कुष्ठरोगींनी त्या जंगलातील लागेल तशी जागा स्वच्छ केली आणि त्या ठिकाणी झोपडी बांधून राहण्यासाठी ठाण मांडले, पण सुरुवातीला खूप समस्यांना सामोरे जावे लागले, पण पुढे सर्व वेगवेगळ्या सुविधा होत गेल्या आणि या जागेचा कायापालट झाला.


या संस्थेचे नाव 'महारोगी सेवा समिती' असे असले तरी बाबांनी या जागेचं नाव 'आनंदवन' असे ठेवले होते. बाबा नेहमी सांगत, 'जन्माला आलेला प्रत्येक माणूस कुष्ठरोगी किंवा कोणी पण असो, त्याला जगण्याचा अधिकार आहे', असा बाबांचा विचार असे. सांगता सांगता विसरुनच गेलो आनंदवनातील सर्व उभं करण्यासाठी आणि रसोईसारखं काम ताईने पार पाडत आणि बघता बघता १९५४ साली कुष्ठरोग्यांची संख्या सहा वरुन साठवर गेली होती आणि पुढे आनंदवनाची खूप मोठ्या प्रमाणावर सुधारणा होत गेली. डॉ. बाबा आमटे सारख्या आदर्श व्यक्तीमत्व असणाऱ्या व्यक्तीला डॉक्टरीच्या सेवेतील दिला जाणारा 'डेमीयन डहन'



Scanned with CamScanner




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ए. एल. भगत, प्रा. कैलास सलादे, उपप्राचार्य एन. डी. वडघुले, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी



कला वाङ्मय मंडळाचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने करतांना कवी प्रा. प्रशांत केंदळे समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत उपप्राचार्य श्री. एन. डी. वडघुले




कला वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना कवी प्रा. प्रशांत केंदळे समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत, उपप्राचार्य श्री. एन. डी. वडघुले, कला वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा. एस. डी. फुगट व विद्यार्थी

Scanned with CamScanner



अर्थशास्त्र व वाणिज्य विभागांतर्गत
विद्यार्थ्यांना जीएसटी या विषयावर
मागदर्शन करतांना
डॉ. एस. एन. चपळगांवकर
व उपस्थित विद्यार्थी



जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त
लाभलेले प्रमुख व्याख्याते
डॉ. ए. आर. पठारे यांचा सत्कार करतांना
प्राचार्य श्री. ए. एल. भगत सर
समवेत उपप्राचार्य श्री. एन. डी. वडघुले
प्रा. डी. डी. गव्हाणे व उपस्थित विद्यार्थी



विशाखा समिती अंतर्गत
विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना
वडनेर भैरव पोलीस स्टेशनचे
ए.पी.आय. श्री. नितीन पाटील
समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत व
उपस्थित विद्यार्थी.

Scanned with CamScanner




सॉफ्ट स्किल अंतर्गत
विद्यार्थ्यांना आत्मविश्वास
या विषयावर मार्गदर्शन करतांना
पिंपळगांव महाविद्यालयाचे
राज्यशास्त्र विषयाचे प्रा. ज्ञानेश्वर ढगे
समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत




सॉफ्ट स्किल अंतर्गत
विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्य
या विषयावर मार्गदर्शन करतांना
ओझर महाविद्यालयाचे
मराठीचे प्राध्यापक श्री. कैलास सलादे
समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत




सॉफ्ट स्किलमध्ये विद्यार्थ्यांना
प्रमाणपत्र वाटप करतांना
महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ए. एल. भगत
तसेच सॉफ्ट स्किल समन्वयक
प्रा. श्रीमती. के. एल. शिंदे,
प्रा. एस. डी. फुगट, प्रा. डी. एच. भगुरे,
प्रा. एम. आर. धेबडे, प्रा. भीमराज गायकवाड




समाजदिना निमित्त लाभलेले प्रमुख पाहुणे मा. डॉ. प्रल्हाद लुलेकर आपले विचार व्यक्त करतांना समवेत व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर



समाजदिना निमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करतांना म.वि.प्र.स.संस्थेचे चांदवड संचालक मा. श्री. उत्तम (बाबा) भालेराव व व्यासपीठावरील मान्यवर




समाजदिना निमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करतांना स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. दत्तात्रय माळी व व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर.

Scanned with CamScanner



राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत राबविलेल्या
रक्तदान शिबीरात रक्तदान करतांना
महाविद्यालयाचे विद्यार्थी
समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत,
रा.से.यो.चे समन्वयक प्रा. डी.एच. भगुरे
प्रा. एम. आर. धेबडे आदी.



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये
नेतृत्व गुणांचा विकास व्हावा यासाठी
यीन या कार्यक्रमांतर्गत
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
यीन चे समन्वयक श्री. जगदाळे
व उपस्थित मान्यवर



महाविद्यालयीन स्तरावर यीन निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदानाचा हक्क बजावतांना विद्यार्थी
समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगवत व प्राध्यापक वृंद.




राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गर्शन करतांना शिवचरित्रकार प्रा. हेमंत टिळे समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत, वडनेर भैरवचे ज्येष्ठ नागरिक श्री. पंढरीनाथ (भाऊ) पाचोरकर व उपस्थित विद्यार्थी



योग दिनानिमित्त योगासनाचे प्रात्यक्षिक करतांना विद्यार्थी व महाविद्यालयीन प्राध्यापक



योग दिनानिमित्त योगासनाचे प्रात्यक्षिक करतांना विद्यार्थी व महाविद्यालयीन प्राध्यापक

Scanned with CamScanner




राष्ट्रीय सेवा योजना श्रमदान संस्कार
शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी
एन.एस.एस. गीत सादर करतांना
महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी व
व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर




राष्ट्रीय सेवा योजना श्रमदान संस्कार
शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
चांदवडचे उपविभागीय अधिकारी
श्री. सिदार्थ भंडारी व
उपस्थित मान्यवर तसेच विद्यार्थी




राष्ट्रीय सेवा योजना श्रमदान संस्कार
शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी
एन.एस.एस. च्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन
करतांना म.वि.प्र.चे संचालक
मा. श्री. उत्तम (बाबा) भालेराव व
उपस्थित मान्यवर

Scanned with CamScanner

राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमदान संस्कार शिबीरांतर्गत श्रमदान करतांना एन.एस.एस.चे स्वयंसेवक व रा.से.यो.चे प्रमुख प्रा. डी. एच. भगुरे







Scanned with CamScanner

सारख्या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले आणि ते भारतातील पहिले 'नॉन मेडिको' व्यक्ती ठरले. आणि असं हे छोटसं आनंदवन सारखे रोपटे बाबा आणि ताईने वरोरात आनंदवनाच्या रुपाने रुजवलं होतं. पण त्या रोपट्याचं आज मोठ्या वृक्षात रुपांतर झाले आहे. आज या आनंदवनाचे संवर्धन डॉ. आमटे कुटूंब करत आहेत आणि बाबांसारखी समाजसेवेचे कार्य पार पाडत आहेत.

## तीन गोष्टी...

तीन गोष्टी माणसाच्या स्वत:च्या असतात
रुप, भाग्य आणि स्वभाव

तीन गोष्टींचा गर्व नका करु
धन, शक्ती आणि सौंदर्य

तीन गोष्टी निघून गेल्या तर कधीच परत येत
नाही, वेळ, शब्द आणि संधी

तीन गोष्टी माणूस कधीच नाही गमावत
शांती, आशा आणि इमानदारी

तीन गोष्टी सर्वात अमुल्य आहेत
प्रेम, आत्मविश्वास आणि खरा मित्र.

**पठाण उजमा रीयाज**
– तृतीय वर्ष (बी.कॉम.)

## मैं बोझ नहीं हूँ....



शाम हो गई अभी तो घुमने
चलो न पापा ।
चलते चलते थक गई कंधे
पे बिठाओ न पापा ।
अंधेरे से डर लगता सीने से
लगा लो न पापा ।
मम्मी तो सो गई
आप ही थपकी देकर
सुलाओ न पापा ।
स्कूल तो पूरी हो गई
अब कॉलेज जाने दो न पापा ।
पाल पोसकर बडा किया
अब जुदा तो मत करो न पापा ।
अब डोली मे बिठा ही दिया तो
आंसू तो मत बहाओ न पापा ।
आपकी मुस्कराहट अच्छी है
एक बार मुस्कराओ न पापा ।
आप ने मेरी हर बात मानी
एक बात और मान जाओ ना पापा ।
इस धरती पर बोझ नहीं मैं
दुनिया को समझाओ न पापा...।

**तिडके पूजा सुनिल**
– द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# मी एक मुलगी बोलतेय...

आहेर मोहिनी दत्तात्रेय – द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



एखादा जीव जन्माला येण्याच्या आधी मारुन टाकणे हे किती मोठे पाप आहे. हेच पाप करताना आत्ताच्या पिढीला काहीच वाटत नाही. मुलगी होणार आहे हे कळताच तिला या जगात येवून देण्याचा निर्णय घेतात व तो जीव जन्मा येण्याच्या आधी मारुन टाकतात हे कितपत योग्य आहे. हे फार चुकीचे आहे.

आई–बाबा मला जन्माला येऊ द्या. मला पण असे वाटते की, हे सुंदर जग पहावे. फुलांचे रंग, फळांचा आकार अनुभवावा व या जगात खूप मजा करावी, पण माझ्या मनाचा कोणीही विचार करत नाही. मला खरंच खूप खूप मनमोकळेपणाने जगावे असे मनापासून वाटते.

तुम्हाला मुलगा हवा असतो. कारण तर म्हणे तो वंशाचा दिवा असतो. तो वंशाचा दिवा असतो तर मुलगी वंशाची पणती नाही का होऊ शकत? मुलगा जन्माला आल्यानंतर त्याच्या जन्माचा आनंद सगळे लोक साजरा करतात. त्यांना खूप–खूप आनंद होतो, पण हा आनंद त्यांना माहित नसतो की, क्षणिक असतो. पुढे जाऊन तो मुलगा त्यांचे कुळात राहतो व त्या घरातील लोकांना वेगवगेळ्या धमक्या देऊन घाबरायला लावतो व घरातील सर्व मालमत्ता पैसा यांचा ताबा घेतो व आई–बाबा म्हातारे होतात. तेव्हा तो त्यांचा म्हातारपणाचा खर्च करायला तयार नसतो व त्यांना सांभाळणे तर दूरच. त्यांच्याकडे एकदासुद्धा बघायला येत नाही. ही सध्याची परिस्थिती आहे. आई–बाबांना वाटते आपण एवढी सगळी इस्टेट आपल्या एकुलत्या एक मुलाच्या नावावर केली. तोच मुलगा आपल्याला आधार द्यायला तयार नाही.

तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, **मुलापेक्षा मुलगी बरी. प्रकाश देते दोन्ही घरी,** मुलगा हा आपल्या जवळ असतो, आपल्या गावात राहतो, पण तो आपली साधी चौकशी सुद्धा करत नाही आणि तीच मुलगी की, जिचा जीव आपल्याला नकोसा वाटतो. ती मुलगी फोनवर आपली रोज चौकशी करते. जेवलात, औषधे घेतली का ? असे ऐकल्यावर किती छान वाटते. शब्दात नाही व्यक्त करु शकत. खरंच मुला पेक्षा मुलगी खरंच चांगली असते. वेळ आल्यास मुलगी म्हातारपणी आपल्या आई–बाबांना आपल्या सासरी नेते. सासरचे माणसं चांगले असतील तर ठिक नाहीतर तिकडूनही तिला त्रास सहन करावा लागतो. म्हणजे पाहिले की, मुलगी जगात एकदाच जन्माला येते तरी तिचे दोन जीवन असते. एक माहेरचे व दुसरे सासरचे अशा दोन जीवनात जगतांना तिचा जीव काय म्हणत असेल. माहेरी तर तिच्या जन्मापासूनच त्रास असतो. जन्माला येऊ द्यायचे की नाही हाच मोठा प्रश्न असतो.



Scanned with CamScanner

# आजची युवा पिढी आणि इंटरनेटचा गैरवापर

**भालेराव सागर बाळासाहेब**, तृतीय वर्ष (बी.ए.)




आजवर माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे दैनंदिन जीवन खूप सोईस्कर झालेले दिसते. मग का या अशा वाईट प्रवृत्तींना आजची युवा पिढी बळी पडत आहेत. नको असणाऱ्या पद्धतीने इंटरनेट सारख्या चांगल्या माध्यमाचा गैरवापर करतांना दिसतेय?

गेल्या पाच ते सहा वर्षांमध्ये इंटरनेट सारख्या माध्यमाने व सोशल ॲपसारख्या सुविधाने मानवी जीवन खूप वेगवान घडविण्याचा प्रयत्न केला आहे. अजूनसुद्धा सोशल मिडीया सारखा घटक खूप प्रगती करत आहेत. त्यामुळे जग जवळ येत आहे. पण समाजासाठी या गोष्टी खूप छान आहेत. मात्र आजची युवा पिढी या सर्व माध्यमांचा दूरूपयोग करत आहेत. आज मोबाईल सारख्या माध्यमातून आणि सोशल ॲप्स्‌द्वारे उदा. फेसबुक, जी-मेल, गुग्गल आणि आत्ताच एक-दोन वर्षांपूर्वी लोकप्रिय झालेले व्हॉटस्‌ॲप सारखे ॲप दुष्परिणामास कारणीभूत ठरलेले आहेत. आणि हे दुष्परिणाम आपल्या जीवनात आपण स्वत:च स्वत:कडे ओढावून घेत असतो. कारण हे एक व्यसनच आहे. कारण इंटरनेट किंवा जगात कोणती ही वस्तू जीवनावश्यक असून चांगल्या कामासाठीचं तयार केलेली असते, पण त्या चांगल्या जीवनावाश्यक वस्तूंना खराब व दूरपयोगी करण्याचे कार्य माणसापासूनच होत असते. असंच काही आज समाजात बघावयास मिळते. कारण वेगवेगळ्या माध्यमातनू ॲप्स्‌द्वारे विविध दुष्परिणामकारक वापर करुन दुप्पटीने ही संख्या होत आहे. कारण चांगल्या कामासाठी चांगली माहिती देवाण-घेवाणीसाठी या सोशल ॲपचा वापर केला जाते. पण आज इंटरनेट सारख्या व्यसनास बळी पडतात. सकाळपासून रात्रीचे २-३ वाजेपर्यंत आपल्या इंटरनेटचा वापर करत असतात. पण इतक्या वेळ इंटरनेटचा वापर आणि त्यातून होणाऱ्या विकृतीची जाणीव सुद्धा त्यांना नसते. आणि त्यामध्ये घरच्यांचे त्यांच्या या वर्तनाकडे लक्ष नसते. त्यामुळे ज्यावेळी एखादी मुलगी किंवा मुलगा मानसिक रोगाला बळी पडतात. किंवा इंटरनेटसारख्या व्यसनास बळी पडतात. तेव्हा घरच्यांच्या लक्षात येत असते, तो पर्यंत कोणीच लक्ष देत नाही. ही तर खरी समस्या आहे. यातूनच आपला पाल्य हे 'यू ट्यूब' सारख्या सोशल मिडीयावर (ॲप्स्)वर अश्लील व्हिडीओ सारख्या व्यसनास बळी पडतोय, नको असणारी स्पीच बघतोय आणि नको त्या माहिती वाचतोय हे सर्व त्यांच्या या वयातच १५ ते २१ वयोगटात जास्त प्रमाणात घडतांना दिसतंय, पण याचे सर्व दुष्परिणाम हा त्याच्या भविष्यासाठी घातक ठरतात.

त्यामुळेच मुला-मुलीमध्ये होणारे तणाव, थकवा



Scanned with CamScanner

आणि त्यातून होणारे शारीरिक इफेक्ट हे जाणवू लागतात. आणि मुख्यत: त्याचा मनावर परिणाम होतांना दिसून येतो आणि ते एक मानसिक ग्रस्त होतात. या व्यसनातून मार्ग काढणे खूप अवघड असते. समाजात रोज अशा हजारो घटना घडतांना दिसतात. साहजिकच मानस्पोचार तज्ञ आणि सोशल मिडीयाकडून वारंवार यासंबंधी विविध माध्यमातून या विषयी माहिती प्रसारीत होत असते.

आता मागे एक -दोन महिन्यांपूर्वी इंटरनेटवर ऑपरेट होणारा 'ब्ल्यू व्हेल्स' नावाच्या गेमने धुमाकूळ सुरु केला होता. या सर्व गोष्टींना मुले बळी पडतात आणि मनावरील ताबा नाहीसा होवून आत्महत्या सारख्या कृती करण्यास प्रवृत्त होत असतात. त्यामुळे या सोशल ॲप आणि इंटरनेटसारख्या माहिती प्रसारण तंत्रज्ञानाचा खूप चांगला उपयोग करता येत असतो. आपल्या शरीराला, आपल्या मनाला वळण लावून चांगले विचार मिळविण्याचा प्रयत्न करु शकतो आणि त्यातूनच स्पर्धा परिक्षा सारख्या अभ्यासात्मक बाबी व त्याबद्दल माहिती मिळवणे ही सवय लावणे गरजेचे असते. कारण विविध साहित्य सुद्धा ई-साहित्याच्या स्वरुपात आपल्याला इंटरनेटद्वारे मिळत असते. त्यामुळे तुम्ही ज्या क्षेत्रात करिअर करतात ना त्या क्षेत्रातील माहिती ही इंटरनेटवरुन व सोशल ॲपद्वारे देवाण घेवाण करु शकता. आणि इंटरनेट हे कमी कमी व कामापुरते कसे वापरता येईल याची काळजी घेणे आवश्यक आहे आणि त्यातूनच पालकांनी सुद्धा आपल्या मुलांकडे लक्ष देणे गरजेचे असते. त्यामुळे मुलाचे करियर हे चांगल्या पद्धतीने भविष्यासाठी घडेल आणि योग्य इंटरनेटच्या माध्यमातून आपले योग्य कार्य करु शकतील.

----***----

## ते जीवन...



किती मस्त होत ना, ते जीवन...
जेव्हा असायचे जात्यावरचे दळण
आणि गायली जाणारी
आपुलकीची ओवी अन् गाणी ...
किती मस्त होत ना, ते जीवन...
जेव्हा होई सुरपारंबी
आटापाट्या अन् लपंडावाचे खेळ,
होता सवंगड्याचा मेळ...
किती मस्त होत ना, ते जीवन...
जेव्हा येई आपल्यांचा निरोप
असायची आपुलकीची ओढ
नि खुशालीची जोड ...
किती मस्त होत ना, ते जीवन...
जेव्हा सगळी माणसं,
पाराखाली गप्पा मारत बसत
तेव्हा खरे समानतेचे भाव दिसत
किती मस्त होत ना, ते जीवन...
जेव्हा सगळ्यांचा मेळ असायचा
तुझ नि माझं नसायचं
आपुलकीचा भाव असायचा
आपल्या माणसांना, आपल्याकडून वेळ
मिळायचा...

**कुटे मोनाली रामराव**
- तृतीय वर्ष (बी.ए.)

# मराठी भाषेच्या संवर्धनातून विकास

**वाढवणे दिपाली सुरेश**, द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

भारतीय संस्कृतीची ओळख महाराष्ट्र करुन देतो आणि महाराष्ट्राची ओळख मायबोली 'मराठी' मराठीची थोरवी येथील मातीचा प्रत्येक कण आणि प्रत्येक मन सतत गात असते. मराठी भाषा म्हटलं की आठवते.

**''माझ्या मराठीची गोडी मला वाटते अवीट**
**माझ्या मराठीचा छंद मना नित्ये मोहवीत.''**

किती मधुर, रसाळ आणि आपुलकी आहे मराठीत ! महाराष्ट्र आधीपासून वैभवसंपन्न राज्य आणि या वैभवाचा मानबिंदू मराठी संतांनी म्हटले की..

**''माझ्या मराठाची बोलू कौतूके ।**
**परि अमृतातेही पैजामी जिंके ।**
**ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ॥''**

अशी स्वत:ची ओळख महाराष्ट्र व मराठीने निर्माण केली व्यक्तीच्या जीवनात मातेचे जेवढे महत्त्व असते. तेवढेच त्याच्या मातृभाषेचेही असते. कारण मातृभाषा त्याच्यावर सुयोग्य संस्कार करत असते. या संस्कारातून त्याचे व्यक्तीमत्व विकसित होते. आज प्रत्येक व्यक्ती आधुनिक जगातील सुशिक्षित, सुजान नागरिक म्हणून समाजात जगताना दिसतो. या आधुनिक युगात मात्र त्याला स्वत:च्या मायभूमीचा व मातृभाषेचा विसर पडत आहे. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानात प्रत्येक क्षेत्रात मराठी माणसाने स्वत:च्या कर्तृत्वाची छाप पाडलेली दिसून येते व म्हणूनच म्हटले आहे की,

**''स्वराज्य तोरण चढे, गर्जती तोफांचे चौघडे,**
**मराठी पाऊल पडते पुढे ।''**

मराठीची अशी ओळख ही येथील संस्कार व संस्कृती यामुळे आहे. परंतु आजच्या स्पर्धेच्या युगात याच मराठीची अस्मिता लोप पावू लागली आहे. चारित्र्याचा विकास सुसंगतीत होतो आणि बुद्धीचा विकास एकांतात होतो. हीच सुसंगती मराठी साहित्यात आहे म्हणून तिची अस्मिता जपण्याची गरज आहे.

मराठीच्या संवर्धनात आपण दैनंदिन जीवनातील आपल्या सवयी आणि आपले विचार यांना मराठीची जोड देणे आवश्यक आहे. दररोज मराठी वर्तमानपत्र व महिन्याअखेर एखादी मराठी कांदबरी वाचन केली, तरी देखील मराठी साहित्याशी आपली नाळ नळकत जोडली जाऊ शकते. तरुण तरुणींनी सोशल मिडीयाद्वारे स्वत:चे विचार मराठीत मांडून मराठी ज्ञानाची देवाण-घेवाण केल्यास त्यातून विचार क्रांती घडून येऊ शकते.

प्रत्येक मुखातून जर स्वर उमटले की, **' लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी'**

आज समाजात दिवसेंदिवस वाढणारा भ्रष्टाचार, अत्याचार आणि हिंसाचार याला जबाबदार प्रत्येक व्यक्ती आहे. कारण तो संस्काराचे बीज पेरणाऱ्या माय मराठीची ओळख विसरतोय. लहान वयापासून मुलांना मराठीत संस्कार मिळतात. 'मातृदेवो भव:', पितृदेवो भव:', आणि 'आचार्यदेवो भव:' यातून भावी आदर्श नागरिक घडतो. याच संस्काराची समाजात उणीव



Scanned with CamScanner

असते. केवळ मराठीच्या संस्कारातून उत्तम समाजाची जडण-घडण होऊ शकते. त्यामुळे मराठीचे संवर्धन ही आजच्या काळाची गरज आहे.

**'विचार पेराल तेव्हा कृती उगवते, कृती पेराल तेव्हा सवय उगवते.'**

जीवन कृतार्थ करण्यासाठी जीवनात केवळ दोन ऋण फेडावे. पहिले आपल्या आई-वडिलांचे आणि दुसरे मातृभूमीचे ! मातृभूमीचे ऋण फेडण्यास केवळ मराठी संवर्धन गरजेचे आहे आणि याच मराठी संवर्धनातून स्वत:चा विकास !

----***----

# परिस्थिती....

रस्त्यावर गर्दी अफाट
पडला हा देह मृत्यूने घायाळ,
देहा भवती पिल्ले ही चार
भरुनी आलं त्यांच्या नयनी आभाळ ...
दु:ख अश्रू झोळीत टाकूनी
काळाने आनंद हिस्कावून नेला,
लाडक्या मुलांना पोरके करुनी
आई-बाप विश्व हे सोडून गेलं...
डोळ्यापुढे सारा अंधार राहिला
जगण्याचा नवा मार्ग न राहिला
भावंडे घेऊन बहिण विरहात
पण उमलावे कसे न कळले या कळीला.
भावंडांसाठी मदतीचा हात पुढे आला
तिच्या समोर सुखाचा प्रस्ताव ठेवीला
शहरी काम केल्याने
बक्कळ पैसा मिळेल,
भावंडांच आयुष्य हे
पुन्हा नव्याने उजळेल ...
विचार करुनी ती तयार झाली
भावंडांना आश्रमशाळेत सोडून आली,
पुन्हा आयुष्य नव्याने आशेने उजळेल
कामासाठी शहरी निघून गेली ...
शहरी येवूनी काळ ओढावला
दुखा:मध्ये हा जीव पुन्हा गहीवरला,
नराधमाने तिची किंमत करुन
त्यांचा डाव तिला न कळला ...
शहारली, बावरली, घाबरली
गोंधळून तेथून निसटून गेली,
तक्रार करण्या चौकीत आली
बाजारी औरत म्हणून त्यांच्या पुन्हा हवाली केली...
पोटातल्या खडगीसाठी
ती देखील लाचार झाली,
खांद्यावरचा पदर पडून
नियतीने तिला बेजार केली...

**तिडके श्वेता अरुण**

– तृतीय वर्ष (बी.कॉम)

## चारोळी

तुला हो म्हणायला, मी कधीही आहे रेडी
पण पायतही अडकली आहे, करीअरची बेडी

**गचाले अर्चना बाळासाहबे,**

द्वितीय वर्ष (बी.ए.)

# बाप....

प्रतिक्षा रामदास पाचोरकर, १२ वी (सायन्स)



आई घराचे मांगल्य असते, तर बाप घराचे अस्तित्व असतो. आपण खरंच या अस्तित्वाला कधी समजले आहे का ?

'बाग को जन्म देनेवाला बागवान'
परिवारा को जन्म देनेवाला पिता
दोनो ही अपने खून पसिनेसे
अपने पौधो को सिंचते है।'

ना सिर्फ उनके पेड से, उनके साये से भी प्यार करते है। क्योंकि उसे उम्मीद है। एक रोज ओ जिंदगी से थक जायेगा, वही साया उसके काम आएगा ।

संत महंतांनी आईचेच गुणगाण गायले आहे. देवाधिकांनी आईलाच उपमा दिली आहे, पण बापा विषयी फारसे कौतूक कुठेही केले जात नाही.

समई पेक्षा ज्योतीचाच प्रकाश जास्त पडतो
मग श्रेय नेहमी ज्योतीलाच जाते ना.

एखाद्या मंगल कार्याच्या ठिकाणी घरातील सर्वजण जातात, पण एखाद्या मयतेला फक्त बापच जातो.

मुलगा सलूनला जातो, वीस-पंचवीस रुपये खर्च करतो. मुलगी पार्लरला जाते, पण त्याच घरातला बाप दाढीचा साबण नसेल तर आंघोळीचा साबण वापरतो.

बाबा आजारी पडले, तर लवकर दवाखान्यात जात नाही. ते त्या आजाराला घाबरत नाही, पण डॉक्टरने एखादा महिना आराम करायला लावला तर... मुलीच्या लग्नासाठी उंबरठे झिजवणारा बाप, मुलाच्या नोकरीसाठी साहेबांपुढे लाचार होणार बाप.

दुसऱ्यांसाठी स्वतःच्या इच्छा लपवणारा बाप.

बाबा खरंच किती ग्रेट असतात. जी मुलगी बापाला खऱ्या अर्थाने समजून घेते. ती मुलगी बापाशी फोनवर बोलतांना बाबाचा बदलेला आवाज एका क्षणात ओळखते.

बाबा....!!!

## स्वप्नं....

सगळ्याच गोष्टी सांगायच्या नसतात,
सगळेच अश्रू दाखवायचे नसतात,
सगळ्याच नात्यांना नावं द्यायची नसतात,
स्वप्न पूर्ण होत नाहीत म्हणून
स्वप्न पाहणं सोडून द्यायची नसतात,
तर ती मनाच्या एका कोपऱ्यात जपायचं
असतात..

**चौधरी प्रियंका शरद**
– तृतीय वर्ष (बी.कॉम.)

# वृध्दाश्रमातील दुःखात्मक आणि सुखात्मक अध्यात्मिका

कुटे सोनाली रामराव, तृतीय वर्ष (बी.ए.)



सुरेखा : काय रे... आवरलं का ? (मुलाला म्हणते)

राम : हो आई... चल माझी बस आली असेल... मी निघतो. मी पिकनिकला खूप इन्जॉय करेल...

सुरेखा : हो, हो कर... आधी दही साखर खा बघू... (सुरेखा दही साखर खाऊ घालते.) आता जा... बाय... बाय..

राम : बाय .... बाय....

पिंकू : (सुरेखाची मुलगी पिंकू) आई आज तू ऑफीसला नाही जायचस... मला जोडी थांब ना... आज मला सुट्टी आहे, अभ्यास पण नाही...

सुरेखा : बरं बेटा, तुझ्यासाठी आजचा दिवस थांबते. परत नाही हं...

पिंकू : ओके

**(दोन तासानंतर)**

सुरेखा : अरे देवा, जोशी मावशीकडे पार्टी होती... बर आठ वाजता आहे ना.. आता तर सात वाजले... पटकन काम आवरुन निघते... (सुरेखा झाडत असते. त्यात सासू खोकते.. मग तिला ती पाणी प्यायला देते.. आवरुन निघते..)

सासुबाई आता मी येते हं....

सासू : अगं, थांब ना मला जोडी, मला ना थोड फिरून आण बरं...

सुरेखा : वेळेवर तुम्हाला सुचतं आता उठां... (सुरेखा सासूला उठवून फिरवून आणते, बाहेरुन आल्यानंतर) अरे देवा... आठ वाजता पार्टी होती. आता नऊ वाजले. आता मला नाही जाता येणार... प्रत्येक वेळी असंच होत या सासुबाईमुळे मला कुठेच जाता येत नाही...

**(तेवढ्यात सुरेखाचा नवरा राजेश येतो)**

राजेश : काय झालं, एवढं तोंड उतरवून बसायला ?

सुरेखा : आता काय सांगू ? प्रत्येक वेळेला मी कुठेही निघाले, तरी तुमची आई टोकाटानी करत असते. मला ऑफिसला फक्त आठवड्यातून चार वेळा जाता येते. याला दोन वर्ष झाली.

किती सहन करायचं मी.. मला आता एवढं झेपत नाही. घरात कोंडल्यासारखं होत... तुम्ही आता काय तो निर्णय घ्या... एक तर मीच या घरात राहीन नाही, तर तुमची आई...

राजेश : अगं, आई आहे ग ती माझी... तिचा काय निर्णय घेऊ मी.

सुरेखा : म्हणजे तुमची आई आहे म्हणून तुम्ही काहीच करणार नाही... (रागावून, तोंड मुरडून म्हणते.)

राजेश : मग मी काय करु... तूच सांग...

सुरेखा : (उत्साहात) आपण त्यांना योग्य ठिकाणी नेऊ.

राजेश : (टेन्शनने) म्हणजे, नक्की कुठे .... ?

सुरेखा : अहो, वृध्दाश्रमात.... तेथे त्या सुरक्षित राहतील. त्यांना हवे तेव्हा फिरता येईल. तेथील स्त्रीया मस्त, चांगली काळजी घेतील.

राजेश : (संतापून), तुझं डोकं ठिकाणावर आहे कां?

सुरेखा : हो... अगदी योग्य बोलते आहे मी... तुम्हाला वाटलं तर हो म्हणा... नाहीतर मीच या घरातून निघते... (सुरेखा बॅग घेऊन पिंकूचा हात पकडून निघते. तेव्हढ्यात राजेश आवाज देतो...)

राजेश : थांब, मी आईला वृद्धाश्रमात टाकायला तयार आहे... पण एका अटीवर...

सुरेखा : कोणती अट ?

राजेश : तुला ऑफिस सोडावं लागेल ?

सुरेखा : इतकंच ना... मला मान्य आहे. चला आईला नेऊ.

(ऑफीसला जाण्यावरुन भांडणारी सासू वृद्धाश्रमात सोडवण्यासाठी ऑफीस बंद करणार... वा कमाल आहे.)

(सुरेखा – राजेश आईच्या खोलीत जातात. पिंकूही मागे मागे असते..)

राजेश : आई उठं, तुला मंदिर दाखवून आणतो. (अंथरुणाला खिळलेल्या आईला ते उठवतात. त्यांच्या सोबत नेतात... त्या खूर्चीवर बसवून.. परंतु वृद्धाश्रम पाहून ती घाबरते.. राजेश नोंदणीसाठी जातो....)

सासू : अगं सुरेखा ? राजेश कुठे गेला. मंदिरात जायचंय ना.. हे वृद्धाश्रमापाशी का थांबलोय आपण ?

सुरेखा : आई थांबा, येतीलच ते...

(राजेश येतो, राजेश–सुरेखा दोघेही आईला वृद्धाश्रमात नेतात. खुर्चीवर बसवून ठेवतात... ते निघातच क्षणी आई राजेशचा हात पकडते.)

आई : राजेश काय रे... मला तू येथे सोडून चालला... नको रे असं करु... नको ना जाऊ...

(राजेश आईने पकडलेला हात झटकतो, पुढे चालतो चालतांना त्याला जोरात ठेच लागते. तो खाली पडतो न चालता येणारी आई कशीबशी तडफडत उठते... त्याच्यापर्यंत जाते. त्याला उठवते.. बाळा तुला लागलं तर नाही ना ? विचारते.)

सुरेखा : चला हो, उशीर होतो आहे... वेळ नका



Scanned with CamScanner

लावू...

राजेश : (चिडून डोळ्यांतील पाणी पुसून म्हणतो) तुला जायचं तर जा.... मी आता माझ्या आईला घेऊन परत घरी जाणार... मी पडलो, तरी तुला काहीच फरक पडला नाही... माझी आईच मला उठवायला आली... तू तुझ्या माहेरी जा... मी माझ्या आईला घरी नेतोय समजलं.

सुरेखा : अहो, असं नका ना करु... मी माझ्या माहेरी काय सांगू ? मला तुम्ही हकलून दिलं असं, नाही... नाही हो नाही...

(सुरेखा सासूंचे पाय धरते... रडत रडत म्हणते)

सासूबाई माल माफ करा... माझी चूक झाली पदरात घ्या.

सासू : (सुरेखाला उठवते)

सुरेखा उठं... आपण आपल्या घरी जावू.

राजेश : आई हे काय करते आहेस तू... जीने तुला वृद्धाश्रमात टाकलं... तिला तू घरी घेतेस.

सासू : (आई)

चूक प्रत्येकाकडून होते. पण ती चूक लक्षात येण व वेळेत सुधारवून माफी मागणं हे महत्वाचं असतं.. आता चला आपल्या घरी...

(ते सर्व घरी परतात.)

**वृद्धाश्रमातील स्त्री :-**

आमच्या वृद्धाश्रमात ही पहिलीच घटना अशी घडली की, आपल्या आईला आपला मुलगा घेऊन आला तर खरी, परंतु लगेचच घेऊन गेला... जर त्यांनी त्या आईला येथेच ठेवले असते... तर काही वर्षांनी तेच या वृद्धाश्रमात तुम्हाला दिसले असते. म्हणून अशी चूक करु नका. सासूतच आपली एक आई शोधा... आणि मुलांनो, जीवनात आई-वडील परत मिळत नाही.. म्हणून आई-वडील जोपर्यंत आहेत. तो पर्यंत त्यांचा आदर करा.... त्यांचा आधार बना...

## खरा आनंद....

एकही मित्र नाही असा माणूस कुठेच नसेल
एकही मित्र नाही असा माणूस कुठेच नसेल
थोड्यापुरती का होईना, प्रत्येकाने मैत्री केली असेल
शरीरात रक्त नसलं तरी चालेल,
पण आयुष्यात मैत्री हवीच.
कितीही जुनी झाली तरी ती नेहमी वाटते नवीच.
रक्ताच्या नात्याला नसेल
एवढी मैत्रीच्या नात्यात ओढ असते.
कशीही असली तरी शेवटी मैत्री गोड असते.
मैत्री म्हणजे त्याग आहे, मैत्री म्हणजे विश्वास आहे.
हवा एक नावापुरती, तर मैत्री खरा श्वास आहे.
मैत्रीच्या त्या नात्याबद्दल लिहिण्यासारखे खूप
आहे,
रक्ताचे नाते नसले तरी मैत्रीला एक रुप आहे.
मैत्रीला गंध नसतो, मैत्रीचा फक्त छंद असतो.
मैत्री सर्वांनी करावी, त्यात खरा आनंद असतो.

**चौधरी प्रियंका शरद**
– तृतीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# टोपण नावाने लिहिणाऱ्या साहित्यिकांची नावे

गचाले अर्चना बाळासाहबे, द्वितीय वर्ष (बी.ए.)

| अ. नं. | टोपण नांव | | मूळ नांव |
|---|---|---|---|
| ०१. | बालकवी | – | त्र्यंबक बापू ठोंबरे |
| ०२. | बाबा आमटे | – | मुरलीधर देविदास आमटे |
| ०३. | केशवसूत | – | कृष्णाजी केशव दामले |
| ०४. | केशव कुमार /आचार्य अत्रे | – | प्रल्हाद केशव अत्रे |
| ०५. | श्रीधर | – | श्रीधर स्वामी ब्रह्मानंद नाझरेकर |
| ०६. | अनिल | – | आत्माराम रावजी देशपांडे |
| ०७. | आरती प्रभू | – | चिंतामण त्र्यंबक खानोलकर |
| ०८. | आचार्य काका कालेलकर | – | दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर |
| ०९. | बी | – | नारायण मुरलीधर गुप्ते |
| १०. | बी – रघुनाथ | – | भागवत रघुनाथ कुलकर्णी |
| ११. | कुसूमाग्रज | – | विष्णु वामन शिरवाडकर |
| १२. | गोविंदग्रज | – | राम गणेश गडकरी |
| १३. | गोडसे भटजी | – | विष्णूभट बाळभट्ट गोडसे |
| १४. | गिरीष | – | शंकर केशव कानेटकर |
| १५. | ग्रेस | – | माणिक शंकर गोडघाटे |
| १६. | संत तुकाराम | – | तुकाराम बोल्होबा अंबिले/मोरे |
| १७. | संत ज्ञानदेव | – | ज्ञानेश्वर विठ्ठलपंत कुलकर्णी |
| १८. | बहिणाबाई | – | बहिणाबाई भाऊदेव चौधरी |
| १९. | संत रामदास | – | नारायण सूर्याजी ठोसर |
| २०. | संत तुकडोजी महाराज | – | माणिक बंडोजी ठाकूर |
| २१. | इंदिरा संत | – | इंदिरा नारायण संत |
| २२. | माधव ज्युलियन | – | माधव त्र्यंबक पटवर्धन |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २३. | मनमोहन | – | गोपाळ नरहर नातू |
| २४. | मोरोपंत | – | मोरोश्वर रामचंद्र पराडकर |
| २५. | साने गुरूजी | – | पांडुरंग सदाशिव साने |
| २६. | विंदा करंदीकर | – | गोविंद विनायक करंदीकर |
| २७. | वसंत बापट | – | विश्वनाथ वामन बापट |
| २८. | विभावरी शिरुरकर | – | पुर्वाश्रमीच्या बाळुताई खरे / मालतीबाई बेडेकर |
| २९. | दिवाकर पवार | – | शंकर काशिनाथ गर्गे |
| ३०. | दया पवार | – | दगडू मारुती पवार |
| ३१. | यशवंत | – | यशवंत दिनकर पेंढारकर |
| ३२. | राजा महाजन | – | जगन्नाथ विठ्ठल महाजन |
| ३३. | प्रबोधनकार ठाकरे | – | केशव सिताराम ठाकरे |
| ३४. | चारुता सागर | – | दिनकर दत्तात्रेय भोसले |
| ३५. | लोकहितवादी | – | गोपाळ हरि देशमुख. |

---

## चारोळी

यशाचा कानमंत्र फक्त मुलांसाठी
तुमच्या आयुष्यात कोणतेही काम
करण्यापूर्वी पहिल्यांदा मुलीचा सल्ला घ्या
आता त्या मुलीने जे सांगितले
त्याच्या बरोबर उलटे करा
यश, प्रसिद्धी तुमच्या पायाशी
लोटांगण घेईल.

---

हृदयाच्या ऑपरेशनला
बायपास का म्हणतात
कारण ऑपरेशनने ठीक झालं तर
'पास' नाही तर 'बाय' !!

---

थकलेले जीव सारे
सावलीला निजले होते
बाभळीचे झाड घराशी
फुलांनी सजले होते
पाखरांनी आपले घरटे
छपराला टांगलेले होते
भातुलकीचे डाव दारी
खेळ सारे मांडले होते

---

तसेच जगातले सगळेच नकारात्मक
विचार तुम्हाला हरवू शकत नाही
जोवर तुम्ही त्यातल्या एकाला ही
तुमच्या मनात प्रवेश देत नाही

**गचाले अर्चना बाळासाहेब**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# गुरूची कृपा

साळुंके गायत्री बाजीराव, प्रथम वर्ष (बी.कॉम.)



गुरू-कृपा अथवा सन्त-कृपा यांचे खूप विशेष महात्म्य आहे. भगवंताच्या कृपेने जीवाला मानवी शरीर मिळते आणि गुरूकृपेने भगवान मिळतात. लोक समजतात की, आम्ही गुरू करु म्हणजे मग ते कृपा करतील. परंतु ही काही महत्त्वाची गोष्ट नाही. आपल्या बालकांचे पालन सर्वच करतात. कुत्री सुद्धा आपल्या पिलांचे पालन करते, पण संत कृपा पार विलक्षण असते. दुसरा शिष्य बनो अगर न बनो, त्याच्यावर प्रेम करो अगर न करो. त्याकडे संत पाहत नाही. दीन-दुःखी लोकांना पाहून संतांचे लक्ष्य द्रवीत होते, तर त्यामुळे त्यांचे काम बनून जाते. जगाई-मधाई प्रसिद्ध पाणी होते आणि साधूशी वैर करीत असत, पण चैतन्य महाप्रभूंनी त्याच्यावरही दया करुन त्यांचा उद्धार केला.

सतगुरू भुठा इंद्र सम, कमी न राखी कोयी ।
वैसा ही फल नीपजे, जैसी भूमिका होय ॥

वर्षा सर्वांवर समान रुपाने होते, पण बीज जसे असेल तसे फळ उत्पन्न होते. त्याप्रमाणेच भगवंताची, संत महात्म्यांची कृपा सर्वांवर सदा समान रुपाने असते. ज्याला जसा हवा असेल तसा त्याने लाभ घ्यावा.

संत सर्वांवरच कृपा करतात, पण परमात्म तत्त्वाचा जिज्ञासूच त्या कृपेला ग्रहण करतो, जसे तहानलेला माणूसच जलाचे ग्रहण करतो. सच्चा जिज्ञासूवर संत-कृपा अथवा गुरू-कृपा आपल्या आपण होत असते. गुरू-कृपा झाल्यावर मग काही शिल्लक राहतच नाही. परंतु असे गुरू अत्यंत दुर्लभ असतात. परिसामुळे लोखंडाचे सोने होते, पण त्या सोन्यात तशी ताकद नसते की, दुसऱ्या लोखंडाचेही सोने बनवले, परंतु असली गुरू मिळाला तर त्याच्या कृपेने चेला (शिष्य) पण गुरु बनतो, महात्मा बनतो.

पारस में अरू संत में, बहुत अंतरौ जान ।
वह लोहा कंचन करे वह करै आपु समान ॥

ही गुरूकृपेची विलक्षणता आहे ! ही गुरूकृपा चार प्रकारांनी होते.

जो सन्मुख होत नाही तो फायदा करून घेऊ शकत नाही, जसे पाऊस तेव्हा पावसांत पात्र ठेवले तर ते पाण्याने भरुन जाते, परंतु मात्र उलटे-पालथे घालून ठेवले तर ते जलाने भरुन न जाता कोरडेच राहते. संत-कृपा ग्रहण करणारे पात्र जसे असते तसा त्याला लाभ होतो. (संग्रहीत).

# आदर्श व्यक्तिमत्वासाठी.....

**प्रा. ज्ञानेश्वर भगुरे,**
**वाणिज्य विभाग.**



'गतिमानता' हे आधुनिक युगातील मानवी जीवनशैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य बनले आहे. स्पर्धा परिक्षा, प्रसारमाध्यमे, जाहिराती, इंटरनेट व त्यावरील विविध ॲप्सने जग काबीज केलेल्या या काळात आपल्या अस्तित्वाची जाणीव इतरांना करुन देण्यासाठी आणि यशस्वी होवू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी 'चांगले व्यक्तिमत्व असणे' हा भाग अपरिहार्य बनला आहे. यासाठी सातत्याने उठावदार वागण्या बोलण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करीत असतो. त्यात दिसणं आणि बोलणं यांच्या तत्कालिक अविष्कारावर भर असतो. परंतु आपले व्यक्तीमत्व केवळ या वरवरच्या गोष्टींवर अवलंबून नसून ते आपले गुण, वृत्ती, स्वभाव आणि मानसिक व आध्यात्मिक क्षमता यावर अवलंबून असते.

स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी ही काही गुणवंत आणि आदर्श व्यक्तीमत्वे आपल्याला इतिहासात पहायला मिळतात. त्यांनी मांडलेल्या सिद्धांत, तत्वज्ञान आणि नितीतत्त्वांचे पालन आजही समाजातील हजारो लोक करतात व आदर्श जीवन जगतात. हेच या महापुरुषांच्या व्यक्तीमत्वातील दिव्यतेचे द्योतक आहे. त्यामुळेच या महापुरुषांप्रमाणे आपणही समाजात प्रकाशमान व्हावे अशी सुप्त इच्छा प्रत्येकाच्या मनात असते.

केवळ चांगले दिसणे किंवा सुडौल असणे, आकर्षक कपडे घालणे, प्रभाव पडेल असे बोलणे, भाषेवर प्रभुत्व असणे किंवा केवळ उत्कृष्ट वक्ता असणे म्हणजे उत्तम व्यक्तीमत्व नव्हे, तर व्यक्तीचे विचार, त्याचा अविष्कार, व्यक्तीची अभिरुची, त्याची काम करण्याची पद्धत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या व्यक्तीचे जीवनविषयक तत्वज्ञान यामध्ये व्यक्त झालेले व्यक्तीच्या वर्तनाचे एकूण स्वरुप म्हणजे 'आदर्श व्यक्तिमत्व' होय.

सदैव हसतमुख, सर्वांना मदत करणारे, आत्मविश्वासाने वागणारे आणि नेतृत्व घेवून प्रत्येक गोष्ट करणारे आदर्श व्यक्तीमत्व प्रत्येकालाच हवेसे वाटते. पण प्रत्येकाला हे सहजशक्य कसे होईल ? परंतु आपले व्यक्तीमत्व आदर्श करणे अवघड असले, तरी अगदीच अशक्य आहे असे नाही !



Scanned with CamScanner

व्यक्तीची प्रत्येक कृती ही तिच्या विचारांवर अवलंबून असते आणि विचार हे व्यक्तीच्या वृत्तीवर अवलंबून असतात. व्यक्तीची वृत्ती जेवढी निर्मळ, निर्दोष असेल तितकेच त्याचे विचार पर्यायाने वर्तन हे 'सद्वर्तन' असू शकते. स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा, नम्रता, वक्तशीरपणा या साऱ्या बाह्य गोष्टी ज्या प्रभावी व्यक्तीमत्वाच्या अविभाज्य बाजू असू शकतात, परंतु त्या अचानक जमणाऱ्या नव्हते ! आपण बघतोच की, राग, द्वेष, लोभ, वासना यांचे प्राबल्य असणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तीमत्व हे प्रभावशाली आणि अनुनय करावे असे असते.

वैयक्तिक आणि सामाजिक जीवन यशस्वीपणे जगण्यासाठी अंगी सद्गुण असणे आवश्यक असते. तसेच दुर्गुण कमी करणेही आवश्यक असते. गुणांनी माणसं पारखली जातात आणि त्यांच्यातील गुणांमुळेचे ती इतरांना आवडतात. संयम, चिकाटी, निरीक्षण, क्षमता, ध्येयासाठी झोकून देणे यासारखे गुण व्यक्तीमत्वाला समृद्ध करतात. जीवन हा संघर्ष आहे, गुण व दोषांचा ! जीवन हे एक मोठे गणित आहे. ज्यात गुणांचा गुणाकार करतांना दोषांचा भागाकारा सतत करीत रहावे लागते ! मात्र हे सर्व करतांना व्यक्तीने स्वःतशी मात्र ठामपणे प्रामाणिक रहावे लागते. गुणनिर्मिती होईल अशा सवयी अंगी बाळगणे आणि आपल्यातले दोष ओळखून ते घालवण्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न करणे आणि या दोन्ही गोष्टी एकाच वेळेस करणे. यासाठी आपण इतरांचीही मदत घेवू शकतो. आपल्या सभोवतालच्या व्यक्तींना आपले गुणदोष आपल्यापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे माहीत असतात. वस्तू जागेवर न ठेवणे, परावलंबित्व, वेळेचे गांभिर्य नसणे, संकुचितपणा, विचार न करता बोलणे यासारखे दोन प्रयत्नांती सुधारु शकतात. आपल्या आसपासच्या लोकांना आपल्या ज्या दोषांचा त्रास होतो. ते दोष सर्वात आधी घालविणे आवश्यक असते. निर्दोष व्यक्तीत्व हे चैतन्यदायी बनते. यासाठी दररोज आपल्या वागण्यातील दोष असणारे प्रसंग आणि चुका लिहून काढल्यास आपले स्वभावदोष कमी होण्यास मदत होते. यासाठी स्वयंसूचना घेणे ही एक उपयुक्त पद्धती ठरली आहे. स्वयंसूचना म्हणजे विशिष्ट प्रसंगात माझ्या मनात कोणते योग्य व आदर्श विचार असायला हवे, माझी योग्य कृती कशी असायला हवी याची सूचनेद्वारे आपल्या मनाला आपणच करुन दिलेली जाणीव होय. स्वभावदोष निर्मुनाच्या प्रक्रियेत नखे कुरतडणे, नाकात बोट घालणे अशा वाईट सवयी आपण कृतीच्यास्तरावर सुधारु शकतो. तर लाजाळूपणा, भित्रेपणा यासारख्या बाह्य व्यक्तीमत्वावर थेट प्रभाव टाकणाऱ्या दोषांवर स्वयंसूचना देवून आपल्यात आत्मविश्वास निर्माण करुन आपले व्यक्तीमत्व अमुलाग्र बदलू शकतो. उतावळेपणा, धांदरटपणा, बेजबाबदारपणा, निष्काळजीपणा आणि आळस यासारखे दोष कृषीच्या स्तरावर आणि स्वयंसूचना देवून अशा दोन्ही स्तरीय प्रयत्नांनी बदलतात.

चिडचीड करणे, रागावणे व त्यामुळे प्रतिक्रिया देणे हे सारे मनाच्या पातळीवर विचार केल्याने उद्भवणारे दोष झाले, जे आपले सारे व्यक्तीमत्व झाकोळून टाकतात. इतकेच नव्हे तर आपल्याला शत्रू



Scanned with CamScanner

निर्माण करुन ठेवतात. 'भावनाविवशता' हा दुर्गुण विशेषत: मुलींमध्ये तसेच मुलांमध्येही असतो. त्यामुळे दु:ख होणे, वाईट वाटणे, निराशा येणे यासारखे दोष उद्भवून आपले व्यक्तीमत्व इतरांसाठी सहानुभूतीचा विषय बनते

वरील दोन्ही बाबतीत त्या त्या प्रसंगांचा अभ्यास करुन केवळ का प्रसंगाच्या संदर्भात स्वयंसूचना घेतली तरी कालांतराने अशा प्रकारचा इतरही प्रसंगात तीव्रतेने दोष उफाळून येण्याचे प्रमाण घटत चालल्याचे लक्षात येते. मनोराज्यात रमणे हा बहुसंख्य युवकांचा मोठा स्वभावदोष असतो. मानसशास्त्रानुसार स्वत:कडून, इतरांकडून व जगाकडून अपेक्षा ठेवणे. यामुळेही अनेक दोषांची निर्मिती ही होत असते.

म्हणजेच आपण जर आपल्यातील स्वभावदोष संपवले नाहीत तर तेच आपल्याला संपवून टाकतील ! कारण आजच्या स्पर्धायुगात 'निर्दोष-गुणवान-प्रभावी' व्यक्तीमत्व निखळ यशप्राप्तीचे साधन आहे. हे मान्य करावेच लागते !

आपण बघतो आज हजारो लोक संतांच्या कीर्तन/प्रवचनांसाठी येतात. राजकारणी नेत्यांच्या भाषणांप्रमाणे त्यांना गाड्या भरुन, पैसे देवून आणावे लागत नाही, असे का होते ? तर त्यांच्यातील चैतन्यामुळे ! बोलणारा प्रत्येक शब्द स्वत: कृतीत आणलेला असेल तर बोलण्यात चैतन्य जाणवते आणि ते प्रत्येक शब्दातूनच व्यक्त होते. त्यामुळे आपले व्यक्तीमत्व सुधारु इच्छिणाऱ्या युवकांनी आपल्या उक्ती व कृतीमध्ये एकवाक्यता जपण्याचा प्रयत्न करायलाच हवा. तरच शब्दांमध्ये चैतन्य येते. हे चैतन्य केवळ प्रयत्नांनी, योग्य साधनेने साध्य होवू शकते.

स्वत:साठी स्वयंसूचना घेवून स्वभावदोष निर्मुलन करणे ही काही काळ चालू राहणारी प्रक्रिया आहे. त्याला बुद्धी आणि परिस्थितीच्या मर्यादा आहेत. मात्र अध्यात्मशास्त्र समजून घेवून साधना करण्याचा प्रयत्न केल्यास ते जलद साध्य होवू शकते. असा अनेकांचा अनुभव आहे. नाम जपाने मनातील दुर्गुण, दोष आणि वासना केंद्रे क्षीण होतात व सत् चे केंद्र निर्माण होते. साधना करणारी व्यक्ती बऱ्या-वाईट अशा दोन्ही प्रसंगात स्थीर रहायला शिकते, खचून जात नाही. कणखर मनामुळे आपत्काळात तिचा धीर सूटत नाही. व्यक्तीच्या ऐहीक अपेक्षा कमी झाल्याने व तिचे ध्येय निश्चित झाल्याने षड्‌रिपूमुळे व्यक्तीमत्वाच उत्पन्न होणारे दोष क्षणात नाहीसे करणे जमायला लागते. आध्यात्मिक साधनेने व्यक्तीची एकाग्रता वाढल्याने ध्येयप्राप्तीच्या प्रयत्नांना प्रचंड वेग प्राप्त होतो. यामुळेच इतिहासात बहुतांशी आध्यात्मिक व्यक्तीमत्वेचे त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात विलक्षण यशस्वी झालेली दिसतात. आपण भगवान श्रीकृष्णाला पूर्णावतार म्हणतो. व्यक्तीत कायमस्वरुपी अंतबाहर्य बदल होणे हे साधनेनेच शक्य होवू शकते.

अध्यात्मशास्त्रात जीवनातील प्रत्येक अंगाबाबत आपली कृती-उक्ती-मनोभूमिका कशी असावी याबाबत मार्गदर्शन केले आहे. याचे धडे अशा प्रकारे दिले आहेत की, त्या विविध नियमांचे केवळ पालन केल्यानेही आपण स्वनियंत्रित व अधिकाधिक समृद्धतेकडे जाणारे जीवन जगू शकतो ! व्यक्तीमत्व विकासात अशीच अध्यात्माची किनार लाभलेले जगद्‌विख्यात स्वामी



Scanned with CamScanner

विवेकानंद, म. गांधी, लोकमान्य टिळक, वासुदेव बळवंत फडके, लोकमाता अहिल्याबाई होळकर, नरसिंह महाराणा प्रताप तसेच आदर्श राज्यकर्ता छत्रपती शिवाजी महाराज, विद्वत्तामूर्ती संत ज्ञानेश्वर, समर्थ रामदास, संत तुकाराम ही त्याचीच काही उदाहरणे आहेत.

तात्पर्य, दैनंदिन धकाधकीचे जीवन जगतांना निरामय, आनंदमय, सततोत्साही, गुणवंत आणि आदर्श व्यक्तीमत्व घडविण्यासाठी प्रत्येकाने प्रतिदिन ठरवून प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच याकामी अध्यात्मशास्त्र चिकित्सक बुद्धीने समजून घेणे व कृतीत आणणे अत्यावश्यक ठरते. थोरामोठ्यांनी अनुभवलेली हीच 'सुख-समृध्दी-सामर्थ्य आणि सर्वोच्च सफलतेची गुरुकिल्ली आहे.'

या लेखातून आजच्या व्यक्तीमत्त्वच हरवत चाललेल्या जीवघेण्या स्पर्धायुगातील विद्यार्थ्यांना आपले व्यक्तीमत्व अंतर्बाह्य दोषमुक्त व आदर्श बनविण्याची प्रेरणा मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना ! कारण कोणतेही 'मन' जोपर्यंत 'सु-मन (पुष्प/फूल) झाल्याशिवाय ते देवाच्या चरणांपर्यंत पोहचत नसते !

## चारोळी

झाडाशिवाय पान नाही,
गुरुशिवाय ज्ञान नाही,
माता-पित्यांशिवाय
मान नाही...

**शिरसाट राणी कैलास**
**- १२ वी (सायन्स)**

## सोनुली...

सांग ना ! आई मला कोण वाचवणार !
तुझ्या विना जन्मासी कोण घालणार
दुनियेचा रंग मला कोण दावणार
सोनुलीला तुझ्या जन्म कोण देणार
कोणी म्हणू काही, कोणी म्हणू नाही
सोनुलीला तुझ्या जन्म देणार आई
शाळेतूनी आल्यावरती काम करणार ।
तुझ्या विना जन्मासी कोण घालणार
दुनियेचा रंग मला कोण दावणार ।
तुझ्या विना जन्मासी कोण घालणार
होईल मी मोठी शिकून शिकून
मारील भरारी पाखरु होऊन
कुंकवाचा टिळा कपाळी लावणार ।
तुझ्या विना जन्मासी कोण घालणार
सांग ना ! आई मला कोण वाचवणार ।
तुझ्या विना मला जन्मासी कोण घालणार
होईल मी जेव्हा राजाची गं राणी ।
गाळू नको आई तुझ्या डोळ्यातलं पाणी ।
जाईल ना दूर दूर, बाबा रडणार..
सोनुलीच्या तुझ्या डोळ्यातलं
पाणी कोण पुसणार ...?
कोणी म्हणू नका काही, कोणी म्हणू नाही
सोनुलीला तुझ्या जन्म देणा आई
सांग ना ! आई मला कोण वाचवणार,
तुझ्या विणा मला जन्मासी कोण घालणार.

**तिडके शुभांगी मोहन**
**- प्रथम वर्ष (बी.ए.)**

# फक्त तूच गं.. आई....

जाधव मयुरी चंद्रभान
प्रथम वर्ष (बी.ए.)



देवाला सगळीकडे धावनू जाणं शक्य होत नाही म्हणून त्याने आई निर्माण केली, अशा अर्थाचं एकवचन आहे. कोणत्याही सहृदय माणसाच्या हृदयाच्या गाभ्यात आईसाठी वेगळी जागा असते, माझं हृदयही त्याला अपवाद नाही.

आई हे दोनच स्वर, ही दोनच अक्षरे, पण यात अतीव माधुर्य, अमोल प्रेम साठले आहे. मनुष्य हा एक वेळ अन्नावाचून जगू शकेल, पण आईच्या प्रेमावाचून जगू शकणार नाही. श्रीमंत असो, गरीब असो, मोठा असो, लहान असो. सर्वांना त्या प्रेमाची गरज आहे. आपल्या जीवनाची शिल्पकार आपली आई असते. आईचे दोनच गोड शब्द आपली भूक भागवितात. तिचा पाठीवरुन फिरलेला प्रेमळ हात अपाल्याला धैर्यशाली बनवितो. आईची ममता, आईचे वात्सल्य जगातील अन्य कोणतीच व्यक्ती देऊ शकत नाही. आईच्या सहवासाचा, आईच्या प्रेमळ स्पर्शाची बरोबरी कशाशीच करता येणार नाही. प्रत्येक आई आपल्या मुलाला घडवते. जसे की, जिजामातेमुळे छत्रपती शिवाजी महाराज हे व्यक्तीमत्व आकाराला आले.

परमेश्वर हा स्वर्ग, मृत्यू व पातळ या तिन्ही जगांचा स्वामी आहे. म्हणजेच तो संपूर्ण विश्वाचा स्वामी आहे. परमेश्वर हा स्वयंभू आहे. त्याच्याकडे सगळे आहे. पण त्याच्याकडे आई नाही. म्हणूनच म्हटले आहे. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' बघा या आईला प्रत्येकाच्या जीवनात किती महत्त्व आहे.

अनेक प्रसिद्ध कवींनी आपल्या कवितेतून आईचे रुप मांडण्याचा प्रयत्न केला आहे. विविध कथा, कादंबऱ्या, चित्रपट, लेख यामध्येही 'आई' हा विषय आपल्याला बघायला मिळतो. अनेक प्रसंगातून ती विविध रुपांत आपल्यासमोर उभी राहते. आयुष्यातल्या प्रत्येक बऱ्या-वाईट घटनांनी आपण कितीही दुःखी, अस्वस्थ झालो तरी अशा काही व्यक्ती असतात असे काही अनुभव असतात की, ज्यांच्यासमोर आपण नतमस्तक होतो. आई ही अशीच एक व्यक्ती आहे जिच्या मायेने आणि अस्तित्वामुळे आपण लहानाचे मोठे झालेलो आहोत.



Scanned with CamScanner

आईचे प्रेम हे समुद्रासारखे अथांग आहे. तिच्या मनात काय चालले आहे हे कधीच कोणाला कळणार नाही आणि ती स्वत:ही कोणाला सांगणार नाही. आई कुठल्याही एका चौकटीत न मावणारी आणि जिला आपण आपले जीवन मानतो. अशा स्त्री प्रतिमेचे प्रतिनिधीत्व करते. स्त्री प्रतिमेच्या सर्व शक्ती जिच्यामध्ये पूर्णपणे एकवटलेल्या आहेत ना. अशी ही स्त्री म्हणजे आपल्या सर्वांची आई आहे. आपल्या घर-परिवारावर प्रेम करणारी. संसारात आलेल्या कठीण प्रसंगांना सहज आणि खंबीरपणे सामोरे जाण्याची ताकद केवळ फक्त आईमध्येच असते. स्त्री ही कितीही अडाणी किंवा भोळी असली तरी आपल्या जीवनातील कोणत्याही संकटांना तोंड देण्याची तिची तयारी असते. कारण स्वत:चा संसार फुलावा यासाठी तिने आपले सर्वस्वपणाला लावलेले असते. आई ही घराचा मजबूत असा पाया असते. कोणत्याही परिस्थितीत आपला संसार विस्कटणार नाही. याची जबाबदारी तिने घेतलेली असते. आपल्या लेकराला एवढीच ठेच जरी लागली तरी, तिचे डोळे पाणवतात. घरातील एखादी व्यक्ती आजारी पडली तर ती पणती बनून त्याची काळजी घेत असते. सर्वांच्या सुख-दु:खात ती सामील होते.

आई श्रीमंत किंवा गरीब, परंतु ती आई असते. जेवढे प्रेम श्रीमंत आई आपल्या मुलावर करते, मुलाला कडेवर घेऊन भीक मागणारी आई देखील आईच असते. आपण भीक मागतोय याची लाज चेहऱ्यावर असते, पण आपल्या मुलांच्या पोटात घास जावेत यासाठी कुठल्याही टोकापर्यंत जाण्याची तिची तयारी असते. लहानपणीच्या अल्लकड मुलीपासून ते तरुणी, गृहिणी, बहिण, प्रेयसी, मैत्रिण, पत्नी ही सर्व रुपे तिने धारण केलेली असतात आणि म्हणूनच आई झाल्यावर ह्या सर्व भावना एकत्रित झालेल्या तिच्या व्यक्तीमत्वातून दिसून येतात. पुरुष हा कितीही आक्रमक किंवा खंबीर भासत असला तरी निराशेच्या पराभवाच्या वेळी खचून जातो. अशावेळी त्याच्यात पुन्हा आत्मविश्वास निर्माण करण्याची जबाबदारी स्त्री स्वत: उचलते अशा वेळी ती स्त्री या नात्याने कोणीही असली तरी याप्रसंगी ती आईच बनलेली असते. खरंच आईसारखे दुसरे दैवत या जगात नाही. प्रत्येकाच्या हृदयात आईचे एक विशेष स्थान असते. आई सुख-दु:खात आपल्या लेकरांना साथ देते. आईची वेगवेगळी रुपे आपल्याला बघायला भेटतात. कधी एक मैत्रिण म्हणूनच ती आपल्या मुलाशी हितगूज करते. आईच्या प्रेमात आपण न्हाऊन निघतो. तिच्या भडक वृत्तीने आपण चकीत होतो. तिच्या त्यागाने आपण जसे भारावून जातो. तसेच तिच्या विरहाने आपण पूर्णपणे व्याकूळ होतो.

'आई' म्हणजे घराचा आधारस्तंभ, आई घराचा पाया असते. आई ही घराची सर्वस्व असते. आई शेतात दिवस-रात्र राबराब राबते, कष्ट करते, का ? तर तिला आपल्या लेकरांना शिकवायचे असते. आपली मुले मोठी व्हावीत, आपले नाव मोठे व्हावे, आपली मुले सुखी रहावीत असे तिला वाटत असते. आई खरंच आई असते. अनेक संत-महात्म्यांनी आपल्या विचारांतून आईची महती सांगितली आहे.

***आई ही देवाचेच... एक रुप असणारी स्त्री... आई.....***

----***----

# Parsian Diaspora In Rohintion Mistry

**Prof. Shinde K. L.** (English Dept.)

The term "Diaspora" is a Greek word, 'dia' means two and 'spora' means sphere. It refers to the movement of any group of people who share a common ethnic identity and were either forced to leave or left their homeland of their own accord. 'Diaspora' began to be seen as a movement of Jews specially who were exiled by the Babylonians from Israel in 607 BC and at other times too. Unlike the Jews who faced religious persecution in their home-land and were forced to leave their country, the Indians who left their country to settle elsewhere did so voluntarily. They went abroad for higher education or better econimic prospects. Diasporic literature is concerned with two relationships: one with the motherland which gives rise to nostaligia, meories and reminiscences, and the other, the new relationship with the adopted country.

The Zoroastrian Persian Empire borke down under the impact of Arab invasion during 638 AD and 641 AD. Islam replced the revious Zoroastrian religion. Those who fought agains the invaders were defeated and to avoid persecution the Parsis came to India. There is one interesting, or perhaps apocryphal Parsi legend about their meeting between Jadhav Rana when they arrived in Gujarat: When the Zoroastrain requested asylum, Jadhav Rana brought a vessel of milk filled to the very brim to signify that his kingdom was already full and could not accept refugges. I response, one of the Zoroastrain priets added a pinch of suger to the milk, thus indicating that they would not bring vessel to overflowing and indeed make the lives of the citizens sweeter.

Indian English Liteature in English originated as a necessary outcome of the intrduction of English education in India by Indians in English. It could be in the form of poetry, prose, fiction or drama. It is now recognized that India English literature is not only part of commonwealth literature, but also occupies a great importance in the world literature. Among the twentieth century writers Rohinton Mistry is an India born Canadian short-story writer and a novelist. He has become one of the pre-eminent writers of the post-colonialist writing movement. He now lives in Toronto, but sets his novels primarily in his native Bombay, presenting an honest and loving image of India. As a Parsi, Mistry is part of a dwindling community of fewer than 1,25,000 people worldwide, most of whom are concentrated around Bombay.

Rohinton Mistry is an expatriate India-Parsi writer who lives in Canda. As a Parsi and also a immigrant in Canada, he look at him as a symbol of double displacement and this sense of displacement is recurrent theme in his literary works. His historical situation includes development of new identity in the nation of which he has migrated and a complex relationship with political and cultural history of the nation he has left behind. Generally Indian Diasporas suffers from a sense of triple displacement. They lose their



Scanned with CamScanner

native place, they enter into an alien language and find themselves among people whose culture and codes are different and sometimes offensive to their own.

Mistry's books portary diverse facets of Indian socio-economic life, as well as Parsi Zoroastrian life, customs and religion. Many of his writings are marked as "Indo-nostalgic." He works propose to look at the anguish Parsi way of live and also wrapped up in thick coverings of Parsi ethnicity with the essence of Parsi spirit. Parsi people were presecuted in their homeland in Persia because of their distinct religious identity. They were provided with refuge in India many centuries ago. They had contributed much to the economy, politics and Society of India. Parsis proved themselves an an example for the rich society of India.

Being the miniscule minority in India, the Parsis do experience ethnic anxiety, they feel insecure, experience identity crisis and feel threatend by possible submersion in the dominant Hindu culture, a nighmarish prospect which they do not ever want to come true. Along with these, there are other disturbing fetures namely : declining population, late marriages, low birth rate, high rate of divorce, attitudes to the girl child , urbanization, alienation etc. All these issues find expression in the post independence Parsi writing in English.

Mistry's characters, represent the Parsi Community, whose identity has been historically problematized. It is a progressive community with a glorious pas and a dismal future. Mistry attempts at giving details about the lifestyles and culture of the Parsis wherever he gets an opportunity in his fiction.

As a chronicler a Parsi Community, Mistry is keenly aware of his Community's predicament. In the recent years, a large numbers of young Parsis have chosen to migate to the West, Mistry who belongs to them also hopes to, recover a life of comfort and pride. All the works of Mistry foregrounds the heterogeneity of identity within Parsi Community and the dynamic nature of Parsi community itself.

The writings of Indian Diaspora have received a great deal of attention. Rohinton Mistryis the best example of presenting different narratives of Diaspora while residing in Canada. The way he describes Parsi habits and customs is uniqe to him. Despite a limited quantity of literary production, he has set new yardsticks in diasporic writings. He is claimed to be a post-colonial writer and always tries to demonstrate a medium, which reflects his ideology as well as cultural commitments.

**A Fine Balance** consists of a lot of paradoxical situations, which move the reader to deep pity. However, with the help of an alternative reality the writer seems to make his best efforts to balance the critical life of his characters. The main symbolic significance of the novel is that "in spite of the circumstances we are in, we can strike a fine balance". The novel upholds the integrity, dignity and invincibility of the human mind. The novel highlights a crisis of balance where one character is identical with another in his/her struggle and capacity to survive. They retain a collective memory, vision, or myth of their marginalized group.

The backdrop of the novel **Such a Long Journey (1991)** deals with the historical movements such as : partition of India and Pakistan, 1962 Indo-China war,



Scanned with CamScanner

Scam of sixty lakh rupees during Indira Gandhi's rule and 1971 Indo-Pak war giving birth to Bangladesh. Along with the historical events, the novel is more of inward voyage of the chief characters, inhabiting in the Khodadad building. In this particular novel the writer employs images and symbols more decisively for the reconstruction of his past memories. The novel is unique in the sense that the narrative is made up of a series of reverie. Custad Noble, the chief character becomes nostalgic frequently in the novel and many desires that are unfulfilled linger on the broder of his consciousness.

Gustad belongs to the Parsi community and a devoted family man struggling to keep his wife Dilnavaz and three children out of poverty. The crisis and turmoil begins in his family when his eldest son Shorab refuses to join the prestigious Indian Institute of Technology and his youngest daughter Roshan fall ill. Gustad later on receives a letter from an old friend Major Billmoria pulls him to involve in the corruption of large amount of money. Thus the long journey of Gustad starts by shedding new light on all the aspects of both personal and political life of him.

Such a Long Journey is a uniqe attempt novel based on truth in India Fiction in English. The protagonist has the feelings of loss and insecurity with several chastening experiences. The novel is multi-layered which gives importance only to social and political details, as Mistry symbolizes on a middle class family of the Parsi community who lives in Bombay. The political theme of the novel is based on the notorious Nagarwala Conspiracy case of 1971. It is a real story that took place during Indira Gandhi's period in which shorab Nagarwala, the chief cashier of the Parliament in the State Bank of India followed the highest forces in the country, found himself behind bar and died later in imprisonment.

In Family Matters, Mistry weaves the lives and memories of one Parsi family into a novel of humanistic dignity. The novel is a memory of moving into the past and the element of nostalgia sharply coming on the surface. It also highlights the sense of belongingness and the crisis of uprooted. Nariman, aged seventy-ning is divided between two daughters and finds himself in a situnation of King Lear.

Like othe Parsi writers, Mistry's work is guided by the experience of double displacement. As a Paris, Mistry finds himself at the margins of Indian society and hence his writing challenges and resists absorption by the dominating and Hindu-glorifying culture of India. He has experimented with linguistic hybridity and celebrates the use of Parsi language. The post-colonial concern for him is not only to fight for a cultural territory but also to create a distinct identity of their own. He focuses on the human condition, location in time and space, the Parsi middle class in Suburban Bombay and rural migrants. The feeling of being left out of the cultural main-stream is uniquely reflected in the way Mistry's characters are displaced and search for new identity, through emigration or reinventing themselves through religious enlightenment.

The Parsis revere the sun, moon, fire, water and all creations of God. In Zoroastrian religion fire is considered sacrosant. Fire worshipped in all forms from the sun to the household fire, and no Zoroastrian worship is complete without it. Being a Parsi himslef,

Rohintion Mistry is aware of the rites and rituals of his religion. The novel is strewn with words from Paris life, like Kusti, dustoorji, loban, Gomez etc. which create the atmosphere. These words realte to the Parsi life which a non-Parsi may find difficult to grasp.

**Work Cited**

**Primary Source**

Mistry, Rohintion. Such a long journy, London & Boston : Faber & Faber, 1991. Print.

..A Fine Balance. London & Boston : Faber & Faber, 1995. Print.

Secondary Sources

Albertazzi, Silvia. A companion to Indian Fiction in English. Ed. Pier Paolo Piciucco. New Delhi : Atlantic Publisher, 2004, Print.

Dodiya, Jaydipsinh. Parsi English Novel. New Delhi : Sarup & Sons, 2006. Print.

Uma Parameshwaran, "Literature of the Indian Diaspora In Canada : An Overview", South Asian Canadian, eds. Jameela Begum and Maya Dutt, Madras : Anu Chitra Publications, 199, 23. Print.

Srinivas, Sunitha. C. Funtionalsim and Indian English Fiction. New Delhi : Atlantic Publishers, 2010, 147 Print.

---

## मंदी आणि संधी

मंदी आणि संधी
यांची कधी होत नसते 'संधी'
दोन्ही एकमेकाच्या सवती
घुटमळतात दोन्ही माणसाच्या अवती भवती
मंदी असल्यास संधी दूर पळते
संधी आल्यास मंदीला पळवता येते
मंदी चकवता येत नाही
संधी हुकली की परत येत नाही
मंदी जाता जात नाही
संधी येता येत नाही
मंदी जाण्याची वाट बघावी लागते
संधी येण्याची वाट बघावी लागते
मंदीत चुकून संधी आली तर
हे माणसा तिला आपलेसे कर
अन्यथा मंदी तीला गिळून पडेल
आणि माणसाची सहनशक्ती पिळून पडेल
एक मंदी पुरे आहे जगाला नाहिसे करायला
मात्र फक्त एकच संधी आवश्यक आहे
मंदीला पळवायला....!
मंदीला पळवायला....!!

**वक्टे रोहिणी विष्णू**
– तृतीय वर्ष (बी.कॉम.)

---

## चारोळी

जिंदगी हे नाराज मत होना की
उदास मत हो, ये जिंदगी एक संघर्ष है
कितनी भी मुसीबत आए
फीर भी अपने जीने का तरीका मत बदलना.

**शिरसाट राणी कैलास**
– १२ वी (सायन्स)



Scanned with CamScanner

# 'Ways of Successful Life'

Salunke Gaytri Bajirao - F.Y. B.Com

Every born person has a lot of expectation to be rightful luxurious and to be a good citizen make him onxious. The dream of successful life encourages him to climb the step of highest peak of difficulties and problems. Though he wants to be successful in his life, but cannot get the success easily. He has to face many problems and difficulties. He builts the houses of success in his mind and expects to achieve the same. Man has his right to passes expectations with him. But it has limitations. "It is said that expectations give man frustration, no expectation give man frustration, no expectation no frustration." He who works without expectations of getting fruit, always succeed in his life. And also never become failure.

As a student if we want to achieve the success in our life we must know the importance of every letter in the word student.

Eg - S - Sensible
T - Tactful
U - Understanding power
D - Dutiful
E - Eager
N - Noble
T - Talent.

He should give priority menthioned above letters and introspect the world. FAIL. He fails in his life because he forgets the aim of intellectuality and becomes lazy.

Many person have proud of their beauty and therefore he must memorize that we are persishable. He must develope the personalilty, the massive persoality and keep study will help him to reach the zenith. Besides character should be co-related with virtues. If the nature is decorated with good qualities consequently he will get success the quarrel, attitude of doing hard work and perseverance will bloom of success of flowers.

"You cannot change your FUTURE,
But, you can change your HABITS,
And surely your habits wil change
your FUTURE."

**- Dr. Abdul Kalam.**

"Live as if you were to
Die TOMORROW.
Learn as if you were to
Live FOREVER."

**- Mahatma Gandhi.**

"Take the whole RESPONSIBILITY
on your own shoulders, And
know that you are the CREATOR
of your own destiny."

**- Swami Vivekananda.**

# शब्द

लिहितांना जपावे शब्दते मनातले,
रडतांना जपावे पाणी ते डोळ्यातले
बोलतांना जपावे शब्द ते ओठातले
चालतांना जपावे काटे हे रस्त्यातले आणि
हसतांना विसरावे दु:ख ते जीवनातले...

**- तिडके ज्योती (स्व:लिखित)**
तृतीय वर्ष (बी.ए.)

# What Makes Life 100% Successful

Aher Poonam Rajendra - S.Y. B.Com

Let.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| A = 1 | B = 2 | C = 3 | D = 4 | E = 5 | F = 6 |
| G = 7 | H = 8 | I = 9 | J = 10 | K = 11 | L = 12 |
| M = 13 | N = 14 | O = 14 | P = 15 | Q - 17 | R = 18 |
| S = 19 | T = 20 | U = 21 | V = 22 | W = 23 | X = 24 |
| Y = 25 | Z = 26 | | | | |

Knowldege = k + n + o + w + l + e + d + g + e
= 11+14+15+23+12+5+4+7+15
= 96% only

Luck = L + a + c + k
= 12+21+3+11
= 47% only

Hardwork = H + a + r + d + w + o + r + k
= 8+1+18+4+23+15+18+11
= 98% only

Love = L + o + v + e
= 12+15+22+5
= 54% only

Attiude = A + t + t + i + u + d + e
= 1+20+20+9+20+21+4+5
= 100%

So, I belive in 100% and positive attitude. People loaugh at me because I am different I laugh at them because they are all the same. Just an attitude that makes all the differance.

Life it your Way...........



Scanned with CamScanner

## हरवलेले जग

ए.सी. ऑफीस स्वतंत्र केबीन
फटाकडी सेक्रेटरी, दिवभर मिटिंग्ज
सारं सोडून द्याव्यात अशा
खूप भेटी राहिल्या आहे.
अन् भेटायचं ज्याला तो लंगोटी
यार हरवला आहे.

भरपूर पगार, उदंड सेव्हिंग्जं
मनसोक्त शॉपींग सामानाचा ढिग
ढिगाखाली त्या खूप काही दडलं आहे
चूक करुन लपावं ज्याच्या आड निश्चित
तो आईचा पदर हरवला आहे

दिवसाआड पार्टी कधी... कधी डिस्को
धुंद, रात्र मस्तीची प्याला प्याल्यातून झिंग
चिअर्सच्या चित्कारातून खूप आवाज विरले आहेत
हृदयाला साद घालणारा – आतून तो आरतीचा गजर
हरवला आहे.

ठरवंल आहे... हरवलं आहे...
खूप काही हरवलं आहे
कारच्या वेगात, सायकलची फेरी
हॉटेलच्या खाण्यात, फोडणीची पोळी
तारंकीत प्रवासात, पंढरीची वारी
सिमेंटच्या रस्त्यात, वडाची सावली
डिजे व्हिजेच्या जल्लोषात,
वासुदेवाची मुरली हरवली आहे

**गचाले अर्चना बाळासाहेब**
द्वितीय वर्ष (बी.ए.)

## नशीब

नशीबाने साथ सोडली म्हणून मरायचे नसते,
स्वत:च्या हिंमतीवरच जगायचे असते.
मागचे सारे आठवून रडायचे नसते.
भविष्याचा विचार करुन जगायचे असते.
क्षुल्लक संकटांना घाबरायचे नसते.
एक ठेच लागली म्हणून थांबायचे नसते.
धैर्याने त्याच वाटेने चालयाचे असते.
कर्तृत्वांतून माणून घडतो हे लक्षात
ठेवून जगायचे असते.

**– तिडके ज्योती (स्व:लिखित)**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## भूक

जात्याला घास भरवता भरवता
रात कधी सरली...
तिचं तिलाच कळलं नाही
रातभर दळून ही
पसाभर पीठ मात्र जमलंच नाही !
कारण नव्हते दाणे जात्यात
नव्हत्या मोळ्या चुलीत
नव्हतं काही चुलीवरच्या पातेल्यात...
मग काय आणि कसं काय जाईल पोटात ?
रातभर जागून ही जळाली रात
पण, माझ्या पोटाची आग
काही मंदावली नाही.
आणि माझ्या खपाटी गेलेल्या पोटाला
पाहून मला भरवता भरवता !
माय मात्र उपाशीच राहिली
.... अखंड...... सौभाग्यवती प्रमाणं !

**गचाले अर्चना बाळासाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.ए.)

## प्रतिज्ञा

शिवसागर माझा देश आहे,
सारे शिवजन माझे बांधव आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने
नटलेल्या गडकिल्ल्यांचा मला अभिमान आहे
छत्रपती शिवरायांसारखे विचारधारणां प्रत्येक
शिवभक्ताच्या अंगी यावी म्हणून
मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या राज्याच्या इतिहासाचा आणि
स्वराज्याच्या शिवधर्माचा मान ठेवीन आणि
प्रत्येकाला शिवभक्तीची ओढ लागण्यासाठी मी
सदैव प्रयत्न करीन.

माझे मावळे आणि स्वराज्य यांच्याशी निष्ठा
राखण्यांची मी प्रतिज्ञा करीत आहे.
सर्व शिवभक्तांचे शिव कार्य अखंड चालू रहावे,
यातच माझे सौख्य सामावले आहे.
जय भवानी... जय शिवराय... जय जिजामाता.

**निखाडे प्रियंका विजय**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

# एक मराठा, लाख मराठा



माझी माता, माझा पिता
जय शिवबाची जनता
एकच तर आहे, शिवाजी छत्रपती नेता
थोर नेते होऊन गेले
शिवबा त्याचे नाव आहे
जीवाची कळा, फक्त मराठा श्वास आहे
मराठा माझं रक्त आहे
मराठा माझी जात आहे
शिवबालाच फक्त नाव आहे, याचाच मला
अभिनान आहे
जिवनात जगताना जगण्यासारखं वाटत नाही
काहीतरी कराव वाटत
मराठी म्हणून रक्ताच पाणी कराव वाटत
श्वासात श्वास गुंतला आहे
मराठी म्हणून जगाव वाटत
फक्त मराठी म्हणा किती छान वाटत
थोर नेते होऊन गेले
माणूस कसा जगतो
मराठी म्हणून जय शिवबा म्हणतो
जगण्यात जगताना आनंद वाटतो
आपण कोणामुळे आहोत
याचा मला अभिमान वाटतो
सह्याद्री तिरी पाणी कसं वाहतं
आकाश कसं भरुन गेलं
माझा शिवबाच नाव निघत
महाराष्ट्र माझी शान आहे
मराठा माझा मान आहे
शिवबा कसे होऊन गेले, नाव त्याचे आहे
अंगात भिनल शिवबाचं नाव
एकच म्हणा ना
जय शिवरायाची शान
एक मराठा, लाख मराठा
जय शिवाजी, जय शिवराय
जय महाराष्ट्र

**जाधव धनश्री भाऊसाहेब**
- तृतीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## जिवनाचे सार

जन्माला आला आहेस
थोड जगून बघ ...
जिवनात दुःख खूप आहे
थोड सोसून बघ ...
चिमूटभर दुःखाने कोसळू नकोस
दुःखाचे पहाड चढून बघ ...
यशाची चव चाखून बघ
अपयश येते निरखून बघ ...
डाव मांडणं सोपं असतं,
थोड खेळून बघ
घरटं बांधणं सोप असतं
थोडी मेहनत करुन बघं ...
जगण कठीण, मरण सोपं असतं
दोन्हीतल्या वेदना झेलून बघं,
जगणे-मरणे एक कोड असतं
जाता-जाता एवढं सोडून बघ ...
जाता-जाता एवढं सोडून बघ....

**कु. शेळके सोनाली संपत**
- द्वितीय वर्ष (बी.ए.) मराठी

## शब्द

तुमच्या प्रत्येक शब्दाला, काहीतरी अर्थ असतो,
याचा अर्थ असा नव्हे, समोरचा शब्द व्यर्थ असतो ..
प्रत्येक शब्दाला किंमत असते,
देतांना ती कळत नाही,
शब्दांची किंमत तेव्हा कळते, देणारा जेव्हा पाळत
नाही ...
काही शब्द विशाल असतात, जणू गहिरा सागर सिंधू
काही शब्द आशाळ असतात, लोचट आणि
संधीसाधू ...
काही शब्द जहाल असतात, नागिनीच्या दंशासारखे,
काही शब्द ओशाळ असतात, मतिमंद मुलासारखे...
शब्दांनाही वेग असतो, कमानीतल्या बाणासारखा,
शब्दालाही कस असतो, लोहाराच्या घाणासारखा...
मन मोकळे करताना जे शब्द मवाळ असतात,
मनाविरुध्द घडताना तेच शब्द मशाला बनतात...
शब्द कधी भिरकावला की, चेंडूसारखा परत येतो,
तोंडघशी पडल्यावर, भल्याभल्यांचा तोल जातो....
कधी अधिक, कधी दुणे, शब्दालाही किंमत असते,
बोलणाऱ्यांची ऐकणाऱ्याला शब्दावरुन किंमत कळते..
काय बोलावं, किती बोलावं, शब्दालाही माप असते
खरं बोलावं की खोट बोलावं, शब्दातही पाप असते
मरण टाळता येत नाही, कधी येईल कळत नाही,
शब्दाला त्या अंत नाही, शब्द कधी जळत नाही...
अक्षर अक्षर वेचून सुंदर शब्द फुलांचे फुलवू मळे,
शिवाचे नाते ओढून, जिंकून घेऊ जग सगळे....

**कु. शेळके सोनाली संपत**
- द्वितीय वर्ष (बी.ए.) मराठी



Scanned with CamScanner

# पाणी आडवा ... पाणी जिरवा...

एकच उक्ती कृतीत उतरवा
पाणी आडवा पाणी जिरवा ॥ धृ ॥

पाणी म्हणजे जीवन ते भागवते सर्वाची तहान
या जगात पाण्याशिवाय कोणीच नाही महान
तळपती उष्णता बाजूला सारुन
हवा असेल थोडा गारवा
पाणी आडवा, पाणी जिरवा ॥१॥

दूषित होत आहेत अनेक स्त्रोत पाण्याचे
यामुळेच उद्‌भवतात विविध विकार आरोग्याचे
पाणी शुद्ध राखून करु शकता
आपल्याच आरोग्याची सेवा
पाणी आडवा, पाणी जिरवा ॥२॥

पाण्याचा अपव्यय टाळून आपलेच जीवन सावरा
अन्यथा अपव्यय करुन तडफडून मरा
पाण्याचे संधारण करुन चाखा जीवनाचा मेवा
पाणी आडवा, पाणी जिरवा ॥३॥

**भालेराव हर्षल सीताराम**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

# पूर्वीचा काळ...

एक होता पूर्वीचा काळ
होते त्यात गावरान फार
आता ऐकायलाही मिळत नाही शब्द गावरान
आत्ताच्या काळात
होत आहे वृक्षतोड
उरले नाही एकही झाड
वृक्षतोडीमुळे होत नाही वर्षा
पडतो आहे दुष्काळ
म्हणून मला जावेसे वाटते
पूर्वीच्या काळात, निसर्गरम्यात ॥१॥

आहे आत्ताच्या काळातली फळं
फुगली फवाऱ्याने, रंगी झाली पावडरने
खाल्ली तर पडलो आजारी
होती त्या काळातली फळं
गोड गोड फार रसरशीत, सुगंधीत फार
म्हणून मला जावेसे वाटते
पूर्वीच्या काळात निसर्गरम्यात ॥२॥

आहे आत्ताच्या काळातली माणसे
पडतात रोज रोज आजारी सारी
जगत नाही पन्नाशीच्यावर फारशी
होती त्या काळातली माणसे
उलटावयाची शंभरी रहायची टणटणीत
म्हणून मला जावेसे वाटते
पूर्वीच्या काळात, निसर्गरम्यात ॥३॥

**पवार दिपाली नामदेव**
– द्वितीय वर्ष. (बी.ए.)



Scanned with CamScanner

# चला शिवाजी महाराज.. तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवते....



राज्यासाठी झुंजला तुम्ही
मुघलाची लावून वाट,
दऱ्या-खोऱ्यातून शोधून किल्ले
चढलात अवघड घाट,
तीच तुमची कीर्ती आठवते
चला शिवाजी महाराज  तुम्हाला
तुमचा महाराष्ट्र दाखवते ....

जिजाऊंचे वीर पूत्र तुम्ही
आदर्श तुमचा ठेवतो आम्ही
आदराने मुजरा करते ...
चला शिवाजी महाराज तुम्हाला
तुमचा महाराष्ट्र दाखवते ...

शाहिस्तेखानाची तोडून बोटे,
मुघलांचे ते शब्द खोटे,
तुम्ही आहात अवती भवती हे भासवते ....
चला शिवाजी महाराज तुम्हाला
तुमचा महाराष्ट्र दाखवते ....

जिजाऊंचे शब्द आठवून
अफजलफानाची भेट घेऊन
स्त्रीची कीर्ती आठवते ...
चला शिवाजी महाराज तुम्हाला
तुमचा महाराष्ट्र दाखवते ...

भ्रष्टाचाराने भरला महाराष्ट्र
उध्वस्त होत चालले तुमचे राष्ट्र
गरिबांचे पाहून दुःख आठवण तुमची येते ...
चला शिवाजी महाराज तुम्हाला
आजचा महाराष्ट्र दाखवते ...

मराठ्यांची कीर्ती ढासळते आज,
आपल्या लोकांनी केलाय आपलाच घात
परत जन्म घ्यावा असे आम्हाला वाटते
मराठी जनांना पुन्हा जमवून
भ्रष्टाचाराचा नाश करुन
हा महाराष्ट्र तुमचा पुन्हा घडवू
मग तेव्हाच म्हणू
चला शिवाजी महाराज तुम्हाला
तुमचा महाराष्ट्र दाखवते ...

**पवार दिपाली नामदेव**
**- द्वितीय वर्ष (बी.ए.)**



Scanned with CamScanner

## वृक्ष तोड करु नका..



आजी सांगायची उन्हाळ्यात ऊन पडतं
हिवाळ्यात थंडी पडते आणि पावसाळ्यात पाऊस
पण आता पूर्वीसारखं काहीच घडत नाही.
आता हिवाळ्यात ऊन पडत, पावसाळ्यात थंडी
आणि उन्हाळ्यात पाऊस पडतो.
आणि शेतकऱ्याचा कांदा सडतो.
मग मी विचारलं देवाला –
का ही शिक्षा मानवाला देतोय ?
तेव्हा देव म्हणाला – मानव आपल्या कर्माची फळे भोगतोय.
मग मी म्हणालो – मानव असं करतो तरी काय ?
देव म्हणाला – वृक्ष तोडतोय त्याचं काय ?
आपणच बोलावली ही आपत्ती
का नष्ट करतोय आपण
आपली नैसर्गिक साधन संपत्ती.
दिलंय देवाने आपल्याला इतके वैभव
वापरता येत नाही आपल्याला हेच आपले दुर्दैव.
राक्षस बनू नका । वृक्षतोड करु नका ॥
निसर्गाकडे जरा डोकावून बघा, अनुभवा त्याची मजा
वृक्षतोड केल्यास मिळेल आपल्यालाच सजा.
म्हणून हर्षल भालेराव शेवटी एकच सांगतो
**वृक्षतोड करु नका ! राक्षस तुम्ही बनू नका.**

**भालेराव हर्षल सीताराम,** – द्वितीय वर्ष (बी.ए.)

## असं प्रेम करावं.....


थोड सांगाव, थोड लपवावं
असं प्रेम करावं...
थोडं रुसावं, थोडं हसावं
असं प्रेम करावं....
गुपचूप फोनवर बोलावं
कोणाची नजर पडताच 'आरे चं अगं 'करावं
असं प्रेम करावं.....
जग पुढे चालत असेल
तरी आपण थोड मागेच राहवं
टेलिफोन, एस.एम.एस., ईमेल च्या जगात
आपण मात्र पत्र लिहूनच बोलावं
असं प्रेम करावं.....
कुठं भेटल्यावर बोलावल्यावर
आपण मात्र मुद्दाम उशिरा जावं
मग आपणाच जावनू सॉरी म्हणावं
असं प्रेम करावं....
वर–वर त्याच्या भोळसटपणाची
खूप चेष्टा करावी
पण तरीही तो आपल्याला किती आवडतो
हे जरुर सांगावं
असं प्रेम करावं....
एकदाच होतं दोन मनाचं भेटणं
म्हणून जीवापाड जपावं..
असं प्रेम करावं....

**तिडके पूजा सुनिल**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## कैफियत...



म्हणतात मला जगाचा पोशिंदा
दुष्काळामुळे मला नाही उरला कामधंदा ...
उपाशी ठेवून म्हणतात मला बळीराजा
पण मला वाटले जीवन आहे पुरती सजा ...
माथी आहे कर्जाचा डोंगर
महागाईची तर आहे सर्वांनाच खबर
मांडवी म्हणतो देवापुढे कैफियत ....
पण दिसत नाही 'तो' ही तर त्याची
खासियत ...
विसरुन सर्व काही
लागावे म्हणतो कामाला ...
पण खरे सांगू का हो
नाही मिळत पुरे मोल माझ्या घामाला ...
चार खांबांच घर, वर गवताच छप्पर
मुलीच्या हुंड्याची, आता लागलीय घरघर
नांगरणीचा बैल घेण्या, जावे म्हणतो बाजारी ...
पण पदरी नाही दमडी, परत फिरतो माघारी ...
कारभारीण म्हणते, 'सांभाळू धनी कुंकवाला'
लेकरं कुठे शोधतील आपल्या अभागी बापाला
म्हणून नाही घेत जवळ मी मरणाला ...
पण खरंच सांगा हो
काय अर्थ आहे या जगण्याला,
जिवंत असून मेल्यागत जिण्याला ...

भालेराव हर्षल सीताराम
- द्वितीय वर्ष (बी.ए.)

---

## अंधश्रध्दा...

अंगारे धुपारे सारे भ्रमाचे वारे
भुताच्या भितीपोटी फसती ही दीन सारे
देवा तूच धाव रे ? नवसाला पाव रे ?
या भ्रमाच्या फटक्यानं
फिटेल कधी पांग रे
गंडे-दोरे आवळती जगण्याचे त्यास
मंत्र-तंत्रात गेले अनेकांचे
प्राण सारे सोडून पळती
बाबा-बुवांवर भाळती
अविचाराने जणू त्यांचा गळाच घोटला रे ...!
कर्माची भक्ती, निष्ठेची शक्ती
श्रध्देच्या सुसंग विचारांच्या मुठीत
खरा अत्यानंद आपला आत्मा
प्रगतीच्या वाटेवर
अडथळ्याची शर्यत
अंधश्रध्देच्या विळख्यात
खचला तो संपला, उठला तो जिंकला ...
कर्मयोगावर जगा रे,
**अंधश्रद्धेतून मुक्ती मिळवा रे ...!**

**पवार दिपाली नामदेव**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## हवा हवासा वाटतो क्रिकेट !

हवा हवासा वाटतो क्रिकेट
अभ्यास पाहून पडते विकेट ॥धृ.॥
मनात येते क्रिकेट खेळू
बाबा म्हणतात क्रिकेट टाळू
धावत धावत चेंडूमागे पळू
आई म्हणते मदत कर बटाटे साळू ॥१॥
दप्तर सोडून बॅटसंगे सवारी
घेऊ या उंच उंच भरारी
अभ्यास झाला नाही तर
शिक्षकांना म्हणावे लागते सॉरी ॥२॥
अभ्यास केला नाही म्हणून परिक्षेत पडतात कमी गुण
कोणत्या जन्माचे फेडले हे ऋण खूप पडतील गुण
थोडसं थांबा, मार्कस् इज कमिंग सून ॥३॥
क्रिकेट खेळणे पडते महाग
जसा धावून येतो वाघ,
येता मला याचा खूपच राग, पण क्रिकेटचा
आता करावा लागणार त्याग ॥४॥
निर्माण करावी लागेल आता अभ्यासाची गोडी
शिक्षणाची आता गरज वाटते थोडी
नाही चालणार आता क्रिकेटची लाडीगोडी
आता सुरु करु यशाची होडी ॥५॥

**कोतवाल गौरव निलेश**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

## पैसे नसतात तेव्हा....

पैसे नसतात तेव्हा माणूस
झाडाचा पाला खाऊन दिवस काढतो
पैसा आल्यावर, हाच झाडाचा पाला सडला म्हणून
हॉटेलात खातो, पैसे नसतात तेव्हा, माणूस
सायकलने रपेट करतो, पैसा आल्यावर मात्र हीच
सायकल तो जिममध्ये व्यायामासाठी चालवतो
पैसे नसतात तेव्हा, रोजीरोटीसाठी त्याची पायपीट
चालू असते, पैसे आल्यावर मात्र हीच पायपीट
तो चरबी कमी करण्यासाठी करतो.
माणूस स्वत:शीच प्रतारणा करीत असतो.
ऐपत नसली तरी,
लग्न करायला एका पायावर तयार असतो.
ऐपत असली की मात्र त्याला घटस्फोट हवा असतो
पैसे वाचवायला तो कधी बायकोलाच
आपली सेक्रेटरी बनवतो.
पुढे पैसा आला की, सेक्रेटरी बायकोसारखी वापरतो
पैसे नसेल तेव्हा, तो असल्याचे सोंग करतो.
पैसे असतात, तेव्हा कंगाल असल्याचे ढोंग करतो.
मिठाई खावीशी वाटेल पैसे आल्यावर
मधुमेहामुळे खाता येत नाही.
पैसे नसतात तेव्हा भूक लागते, झोप लागते.
पैसे आल्यावर, दोन्हीसाठी औषधे घ्यावे लागते
अरे माणसा... तू वास्तव तरी कधी स्वीकारतोस ?
आपल्या सावली पासून आपण शिकावे
कधी लहान तर कधी मोठे होऊन जगावे.
शेवटी काय घेऊन जाणार आहोत,
सोबत म्हणून प्रत्येक नात्याला, हृदयातून जपावे.

**वाघ रोहिणी** – १२ वी सायन्स



Scanned with CamScanner

# भेट....

सागर आणू की, आकाश आणू काही सूचत नाही,
सांग ना गं तुझ्यासाठी, काय करु मी आई ॥धृ.॥
नऊ महिने मी गर्भात होतो किती जपलेस गं मला
उन, पाऊस झेलून किती त्रास झाला गं तुला
हाक मार तू माझे मस्तक उडवीन तुझ्या पायी
सांग ना गं तुझ्यासाठी, काय करु मी आई ॥१॥
जन्म देऊन जग दाखविलेस आणलेस धरती वरती
सूर्य, चंद्र आणूनी खरचं करावी तुझी आरती
तुझ्यासाठी फुलवीन माते वाळवंटी वनराई
सांग ना गं तुझ्यासाठी काय करु मी आई ॥२॥
जन्म दिलास तेव्हा माझ्या बंद दोन्ही मुठी
'आई' शब्द माझ्यकडून आणलेत तुझ्यासाठी
हीच माझी भेट तुला माझ्या प्रिय आई
दुनियेमध्ये याच्यापेक्षा काहीच मोठे नाही ॥३॥
कुणी नाही कुणाचे या जगी, मग कुणाच्या आधारे ही
सृष्टी उभी ?, प्रत्येकालाच असते येथे स्वत: पुरती
धाव, सत्य हे अंतिम असे यालाच जीवन ऐसे नाव..
पंख्यामध्ये नसतो वारा, सृष्टीमध्ये फिरणारा,
देवळामध्ये नसतो देव विश्व व्यापून उरणारा....
वाळवंटी या वाट चालता इथे गवसला असा जलाशय
गर्द वनाने किनारलेला स्फटिक दृश्याचा वात्सल
संचय... जगण्याच्या या शापासाठी उ:शाप आहे
मरणाचा.. काळोखातील रस्त्यावरती उजेड जळत्या
सरणाचा.. वडीलधाऱ्या या पायांना शतकाधिकाचे
हात स्पर्शांती' खंत एक की उरला नाही हात एक
खांद्यावरती' आकाशतली फुललेली मातीतील एक
कहाणी' क्षण मावळतीला येता डोळ्यात कशाला
पाणी' दिनादिनांचे जोडूनी धागे नगर बांधतो मी
जगण्याचे' काळ म्हणे मी विनतो जाळे त्या नगरासह
तुझ धरण्याचे...

**कोतवाल गौरव निलेश**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)

# आयुष्य हे असेच जगायचे असते...

'ए' पासून 'झेड' पर्यंत सगळंच
शिकायचं असतं
परिस्थिती नसतांनाही प्रत्येकाला
डॉक्टर, इंजिनियर व्हायचं असतं ....
वावरतांना समाजात
संस्कारांना जपायचं असतं,
भीतीपोटी आई बाबांच्या,
प्रेयसीच्या प्रेमालाही नाकारायचं असतं...
करियर करियर म्हणून फक्त
गुणांनाच महत्त्व द्यायचं नसतं,
स्व:त एकटेच पुढे जाण्यापेक्षा
इतरांनाही सोबत न्यायचं असतं...
आलं अपयश नकळत कधी
तरी त्याला हसत स्वीकारायचं असतं,
चुकांमध्ये करुन सुधार
पुन्हा नवीन जोमाने उभं राहायचं असतं...
आयुष्य जगताना
तुझंच फार छान असं म्हणून
प्रतिस्पर्धांचही कौतूक करायचं असतं
वेळ आल्यावर स्वत:ची कुवत दाखविल्याशिवाय
मंचावरुन खाली उतरायच नसतं ...!
म्हणूनच कितीही मोठ झालं झाड
तरीही त्याच्या फळांच ओझं पेलवायचं असतं
शतकं बदलली, विचारधारणा बदलली तरीही चालेल
मात्र आयुष्य हे असंच जगायचं असतं....

**अर्चना गांगुर्डे**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# एक कडू सत्य

नदीत किंवा तलावात आंघोळ
करायला लाज वाटते...आणि
स्विमींग पुलमध्ये पोहायला फॅशन वाटते
गरीबाला एक रुपया दान नाही करु शकत.. आणि
वेटरला मात्र १० रु. टिप देण्यात मोठेपणा वाटतो..
पंक्तीत बसून जेवणे ही जूनी पद्धत वाटते... आणि
पार्टीत खाण्यासाठी रांग लावण्यासाठी छान वाटते..
बहिण काही मागत असेल तर फालतू खर्च वाटतो
आणि... गर्लफ्रेंडच्या डिमांडला सौभाग्य समजले
जाते...
गरीबांकडून भाजी घेण्यात कमीपणा वाटतो... आणि
शॉपींग मॉलमध्ये आपला खिसा रिकामा करण्यात
अभिमान वाटतो.
जगात श्रीमंत कोण ?
ज्याला आई-बाप आहेत तो...
जगात यशस्वी कोण ?
ज्याला आईबापाची किंमत कळाली तो
जगात महान कोण ?
ज्याला आईबापांची स्वप्न पूर्ण केली तो .. आणि
जगात नालायक कोण ?
ज्याने आईबापाला वृद्धाश्रमात ठेवले, त्रास दिला,
छळले तो नालायक...
मेल्यावर आई-बापाच्या मढ्यावर सगळेच बोंबलून
रडतात.... खरा पूत्र तो जो जिवंतपणी त्याची सेवा
करतो.
जेव्हा मागत होते चॉकलेट लहानपणी
आई जवळ
आता, आई चष्मा मागते
तर तिला नाही म्हणू नका तुम्ही
आई रागवत होती तुम्हाला, जेव्हा मस्ती करत
तुम्ही, आता तीला ऐकू येत नाही
तर तिला रागवू नका तुम्ही.
जेव्हा रडत होते तुम्ही, आई छातीला लावत होती
आता सहन करा दु:ख तुम्ही
तिला रडू देवू नका.
जेव्हा जन्मले होते तुम्ही
आई तुमच्या जवळ होती
जेव्हा आईचा शेवटचा क्षण येईल
तेव्हा तिच्याजवळ नक्की थांबा तुम्ही...
आयुष्यात खूप अडचणी येतील पण..
त्यांच्यासाठी जगा... जे
तुमच्यासाठी स्वत:चा जीव अर्पण करतात.

**चौरे अश्विनी दत्तू**
- तृतीय वर्ष (बी.कॉम)

## चारोळी

प्रेमाला हरलात म्हणून
आयुष्य संपवण्यात काहीच अर्थ नाही
कारण तिला त्याला कदाचित
दुसरा साथीदार मिळेल, पण
तुमच्या आई-बाबांना तुमच्या सारखा
मुलगा-मुलगी कधीच नाही मिळणार...!

**पवार दिपाली नामदेव**
द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## हिरीताचं देणं घेणं...

नको लागू जीवा, सदा मतलबासाठी
हिरीताचं देणं घेणं नाही पोटासाठी
उभे शेतामध्ये पीकं
ऊन, वारा खातं खातं
तरसती कव्हा जाऊ
देवा, भुकेल्या पोटात
पेटवा रे चुल्हा आता, मांडा ताटवाटी
पाहिसनी रे लोकांचे
व्यवहार खोटे नाटे
तव्हा बोरी बाभळीच्या
आले अंगावर काटे
राखोटीच्यासाठी झाल्या शेतात कपाटी
नको लागू जीवा, सदा मतलबासाठी
किती भरला कणगा
भरल्यानं होतो रिता
हिरिताचं देणं घेणं
नही डाडोराकरता
गेली देही निधीसनी नाव रे शेवटी
नको लागू जीवा, सदा मतलबासाठी

**बहिणाबाई चौधरी** – स्वार्थासाठी अखंड धडपड करणाऱ्या जीवा थोड हृदयांचंही ऐकायला शिक. आयुष्याच्या कणगा कितीही भरला, तरी शेवटी रिकामाच होतो. हरिताचं देणं घेणं हेच खरं जगणं आहे....

असं बहिणाबाईंची कविता सांगतेय. अस्सल मराठी मातीचा हुंकार म्हणजे बहिणाबाईंची कविता

**चौरे स्नेहल रमेश** – तृतीय वर्ष (बी.कॉम)

## पाठवण....



तुझ्या ममतेचा ठेवा
आई ठेवीन मी उरी...
कर पाठवण माझी
सुखी जाते मी सासरी...
तु गं नको डोळे भरु
मोठ कर जरा मन
वाडवडलांचे बोल
लेक परक्याचं धन...
जीवा परिस जपलं
नाही उघडलं दुःख...
स्व:त राहून उपाशी
म्हणे तूच आहे सूख...
खस्ता खाता खाता बाबा
आलं अर्ध्यावरी जीणं...
आज आठवतं सारं
नाही पडू दिलं उणं...
आज झाली परक्याची
दादा लाडाची बहीण...
तुझ्या हाती सोपवलं
आई-बाबांच जीवन...
येता लाडाची वहिनी
कर गोकुळ घराचं...
आज वचन मागते
आई-बाबांच्या सुखाचं...
बाबा घेते मी निरोप
जरी सोडलं माहेर...
नावासाठीच करील
दोन कुळांचा उद्धार...

**बाविस्कर सपना मोहन**
– द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## घरं....

'आचार - विचार' ही घराची आखणी आहे
'प्रेम' हा घराचा पाया आहे.
'थोर माणसे' या घराच्या भिंती आहेत
'सुख' हे घराचे छत आहे
'जिव्हाळा' हा घराचा कळस आहे.
'माणुसकी' ही घरातील तिजोरी आहे
'गोड शब्द' हे घरातील धन-दौलत आहेत
'शांतता' ही घरातील लक्ष्मी आहे
'आत्मविश्वास' हेच घरातील देवस्थान आहे
'दुजाभाव विसरणे'हीच घरातील तेजस्वी समई आहे
'पैसा' हा घराचा पाहुणा आहे
'गर्विष्ठपणा' हा घराचा वैरी आहे
'अतिथ्य' हेच घराचे वैभव आहे
'नम्रता' हीच घराची प्रतिष्ठा आहे
'व्यवस्था' हीच घराची शोभा आहे
'समाधान' हीच घराची कीर्ती आहे
अशाच घरात नेहमी प्रभूचा वास आहे
कर्ज होईल असा खर्च करु नका.
पाप होईल अशी कमाई करु नका.
दुःख होईल असे बोलू नका.
चिंता होईल असे जीवन जगू नका.
रोग होईल असे खावू नका...

**कु. धनाईत योगिता कैलास**
– द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## शेतकऱ्याचा न्याय...

शेतकरी म्हणून माझ्यावर, सदाच होतो अन्याय
मिळेल का माझ्या, कष्टाला न्याय ?
शेतकऱ्याच्या घरी जन्मलो, ह्यात माझा काय गुन्हा ?
माझ्यावरच संकट, येतं पुन्हा:पुन्हा
संकटावर मात करण्या, सांगा काही उपाय ?
मिळेल का माझ्या कष्टाला न्याय ?
गहाण ठेवली शेती, आता नाही सुटत,
सारं रान विकलं तरी, कर्ज नाही फिटत ...
कर्जापायी सावकारानं, विकायला काढलं
फी पायी मास्तरांन, पोर घरी धाडलं ...
पोराच्या शिक्षणाला सांग करु काय ?
मिळेल का माझ्या कष्टाला न्याय ?
कधी वल्ला दुष्काळ, कधी कोरडा दुष्काळ
येईल का माझ्या जीवनात, कधीकधी सुकाळ...
दुष्काळा तोंड द्यायची, जडली आता सवय...
मिळेल का माझ्या कष्टाला न्याय ?
माय-बाब बिचारे, शेतातच राबले
जलमभर राबून, मातीतच खपले ...
तीच गत माझी, ठाव मला हाय तरी पण
मिळेल का माझ्या कष्टाला न्याय ?



**शाविस्कर सपना मोहन**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## अजे जगावे जीवन...

जीवन सांगते....
येता जाता रडायचं नसतं,
दुःखात सुद्धा हसायचं असतं
गुलाब सांगतो....
येता जाता रडायस नसतं
काट्यातसुद्धा हसायचं असतं
रात्र म्हणते....
अंधाराला घाबरायचं नसतं
काळोखालाही सावरायचं असतं
रातराणी म्हणते....
अंधाराला खचायचं नसतं
कोळाखातही फुलायचे असतं
दिवस सांगतो....
रुसून बसून राहायचं नसतं
हसून खेळून जगायचं असतं
सदाफुली सांगते....
जीवनात रुसून रहायचं नसतं
जीवनात कायम फुलायचं असतं
बाळ म्हणते....
गर्भाला कधी मारायचं नसतं
स्त्रीभ्रूण हत्या टाळायचं असतं
स्त्री म्हणते....
अत्याचाराला बळी पडायचं नसतं
त्यातून सावरुन निघायचं असतं.

**कु. धनाईत योगिता कैलास**
– द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## सरकारची भीक...

सरकार मायबापा, नको वाढू तुझी भीक
रात दिसाचा राबतो, त्याचं मोल देण्या शिक....
दिस उगल्यापासून, काळ्या आईशी भांडतो
कांदा भाकर खाऊन, राती भुईला झोपतो ...
नाही पोटभर खाया, अर्धपोटी ज्याची भूक
रात दिसाचा राबतो, त्याचं मोल देण्या शिक.....
रितसर तुझं देणं, ज्यानं फेडले नेमानं
त्याच्या पदरी नाही, सारं लबाडा जेवण ...
लबाडाच्या पंगतीला, नको वाढू लाख लाख
रात दिसाचा राबतो, त्याच मोल देण्या शिक....
त्याची बाईल बिचारी, चूल फुंकून बेजार
कंदिलाच्या उजेडात, पोरं गिरवी अक्षर ...
पोरं हुशार असून, त्याला शिकायचा धाक
रात दिसाचा राबतो, त्याचं मोल देण्या शिक....
एका हातानं वाढीतो, दुज्या हातानं काढीतो
घाम गाळता गाळता, संग रगात आटितो ....
खऱ्या घामाचंच आता, खरं दाम देण्या शिक
रात दिसाचा राबतो, त्याचं मोल देण्या शिक...

**बाविस्कर सपना मोहन**
– द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## विचार करा...

सोप असतं – दुसऱ्याला रडवणं
अवघड असतं – दुसऱ्याला हसवणं
सोप असतं – सुखाचं प्रदर्शन
अवघड असतं – दुःखाचं दर्शन
सोप असतं – मदत स्विकारणं
अवघड असतं – मदतीला धावणं
सोप असतं – उपदेश करणं
अवघड असतं – त्याप्रमाणे वागणं
सोप असतं – शिक्षा करणं
अवघड असतं – क्षमा करणं
सोपं असतं – मुर्ख बनणं
अवघड असतं – शहाणपणाने वागणे
सोपं असतं – उपकार विसरणं
अवघड असतं – नकार देणं
सोप असतं – खोट बोलणं
अवघड असतं – लक्षात ठेवणं
सोपं असतं – चुका शोधणं
अवघड असतं – दुरुस्त्या सुचवणं
सोपं असतं – यश मिळवणं
अवघड असतं – अपयश पचवणं
सोपं असतं – एखाद्यावर प्रेम करणं
अवघड असतं – तेच प्रेम निभावणं

**कु. आहेर पूनम राजेंद्र**
– तृतीय वर्ष (बी.कॉम)

## आई....

बाळ जन्म घेण्याच्या आगोदर
देवाने त्याला सांगितले
आता तुझा जन्म पृथ्वीवर होईल
हे ऐकून मुलगा रडायला लागला
आणि त्याने विचारले
तिथे माझी काळजी कोण घेणार ?
देव म्हणाला, मी एक परी पाठवली आहे
ती तुझी खूप छान काळजी घेईल.
बाळाने पुन्हा विचारले
मला बोलायला कोण शिकवणार ?
देव म्हणाला, तीच परी तुला बोलायला शिकवेल.
बाळाने पुन्हा एक प्रश्न विचारला
मी तुझी प्रार्थना कशी करणार ?
देव म्हणाला, परी तुला शिकवेल
मी त्या परीला ओळखणार कसे ?
देव म्हणाला, ओळखायला वेळ नाही लागणार
कारण पृथ्वीवर तीला लोक 'आई' म्हणतात.

**पवार दिपाली नामदेव**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

आयुष्यात दोन व्यक्तीची
खूप काळजी घ्या
तुम्ही जिंकण्यासाठी स्वत:
हरत राहिले तरीही
ते बाबा, तुमच्या हरण्याला
सतत जिंकत मानत आली ती आई.



Scanned with CamScanner



राष्ट्रीय सेवा योजनेच्या
श्रमदान संस्कार शिबीरांतर्गत
मंदिर परिसराची स्वच्छता करतांना
रा.से.यो.चे स्वयंसेवक विद्यार्थी.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या
श्रमदान संस्कार शिबीरांतर्गत
डोंगर पायथ्याशी चर खोदतांना
रा.से.यो.चे स्वयंसेवक विद्यार्थी.





राष्ट्रीय सेवा योजनेच्या
श्रमदान संस्कार शिबीरांतर्गत
गांव तसेच परिसराची स्वच्छता करतांना
रा.से.यो.चे स्वयंसेवक विद्यार्थी.

Scanned with CamScanner

# भैरव २०१७-१८



मानसनिती व सामाजिक शास्त्र मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मा. डॉ. ए. आर. भारद्वाज समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत व उपस्थित विद्यार्थी

विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत राबविलेल्या मतदार जागृती अभियानात विद्यार्थ्यांना मतदान ओळखपत्र वाटप करतांना स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य ॲड. पोपटराव पवार समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत व विद्यार्थी कल्याण मंडळाचे समन्वयक प्रा. एन. डी. वडघुले






राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देतांना रा.से.यो.चे स्वयंसेवक विद्यार्थी

Scanned with CamScanner

# भैरव २०१७-१८

राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमदान संस्कार शिबीरांतर्गत
बहादुरी गावातील ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्त्व
पटवून देतांना रा.से.यो.चे स्वयंसेवक विद्यार्थी










Scanned with CamScanner




राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमदान संस्कार शिबीरांतर्गत गावफेरीतून ग्रामस्थांना स्वच्छतेबाबत प्रबोधन करतांना रा.से.यो.चे स्वयंसेवक विद्यार्थी



राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमदान संस्कार शिबीरांतर्गत गावातील महिलांना शिक्षणाचे, स्वच्छतेची माहिती देतांना रा.से.यो.चे स्वयंसेवक विद्यार्थी



मुलींना स्व: रक्षणाचे प्रात्यक्षिक दाखवितांना प्रा. मृणाल जोशी व कु. वृषाली क्षत्रिय, नाशिक

Scanned with CamScanner



राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीराच्या समारोप प्रसंगी सरस्वती व शिवप्रतीमेचे पूजन करतांना म.वि.प्र. समाज संस्थेचे सभापती मा. श्री. माणिकराव बोरस्ते, म.वि.प्र. संचालक श्री. उत्तम (बाबा) भालेराव, बहादुरीचे सरपंच श्रीमती सरस्वती गायकवाड व उपस्थित मान्यवर



राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी बोलतांना म.वि.प्र. समाज संस्थेचे सभापती मा. श्री. माणिकराव बोरस्ते व व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर




राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीराच्या समारोप प्रसंगी आपले विचार व्यक्त करतांना म.वि.प्र.चे संचालक मा. श्री. उत्तम (बाबा) भालेराव, व्यासपीठावर उपस्थित मान्यवर


Scanned with CamScanner



राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीराच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्राचार्य श्री. ए. एल. भगत व कार्यक्रमाचे अध्यक्ष म.वि.प्र.समाज संस्थेचे सभापती मा. श्री. माणिकराव बोरस्ते, म.वि.प्र.चे संचालक श्री. उत्तम (बाबा) भालेराव श्री. दिलीपराव धारराव व उपस्थित मान्यवर

युवा सप्ताह निमित्त घेण्यात आलेल्या पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये विद्यार्थ्यास माहिती विचारतांना सनराईज स्कूलच्या प्राचार्या मा. श्रीमती. आहिरे मॅडम






युवा सप्ताह अंतर्गत ग्रंथ प्रदर्शनामध्ये पुस्तकांची पाहणी व खरेदी करतांना ग्रामस्थ व विद्यार्थी

Scanned with CamScanner

# सांस्कृतिक युवा महोत्सवाची क्षणचित्रे











युवा महोत्सवाच्या समारोप प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित प्रमुख पाहुणे मा. डॉ. रत्नाकर अहिरे, म.वि.प्र.समाज संस्थेचे चिटणीस सुनिल ढिकले, स्था.व्य.स.अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव, ॲड. पोपटराव पवार, श्री. दत्तात्रय माळी, श्री. पंढरीनाथभाऊ पाचोरकर, प्राचार्य श्री. ए. एल. भगत व उपस्थित मान्यवर



युवा महोत्सवाच्या समारोप प्रसंगी भैरव (२०१६-१७) या नियतकालिकाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे मा. डॉ. रत्नाकर अहिरे, म.वि.प्र.समाज संस्थेचे चिटणीस सुनिल ढिकले, स्था.व्य.स.अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव, ॲड. पोपटराव पवार, श्री. दत्तात्रय माळी, श्री. पंढरीनाथभाऊ पाचोरकर, प्राचार्य श्री. ए. एल. भगत व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न

Scanned with CamScanner

## बळीराजा....



अनाथाला राजा बनवून, व्यर्थ दर्प का वाढविला,
राजा नव्हताच कधी, राजा म्हणून छळ का चालविला
मध्यम नव्हताच कधी व्यापार, आणि दुय्यम नोकरी
कनिष्ट्च होती शेती, उत्तम म्हणून छळ का चालविला
मान नाही, सन्मान नाही, सत्ता नाही, नाही ताज
कसा हा राजा पहा, कष्ट करुनही अन्नाला मौताज ...
शेतकऱ्यांची मुलं चालविती सरकार
अनुदान देऊन, जगविती कास्तकार...
पारतंत्र गेले स्वातंत्र्य आले, घेतला समृध्दीचा ध्यास
राष्ट्राचा हा अन्नदाता, कवटाळती मृत्यूचा फास ....
शिक्षित नाही सोबत प्राध्यापक,
साहित्यिक ना भांडवलदार, स्वत:च्या कष्टावर,
निगर्साच्या अवकृपेवर अन्नदाता आहे निराधार
जवान लढतो देशासाठी, नेते लढतात सत्तेसाठी
कास्तकार लढतो सर्वांसाठी,
पण मरतो फक्त स्वत:साठी ...
नेता नाही, नेतृत्व नाही, नाही कोणी सरदार
अनुदानासाठी दरवर्षी झिजविती शासकीय दरबार ..
जय जवान, जय किसान शब्दछल वाटतात सारे
दिवसरात्र कष्ट करुनी, गरिबीचे भोग नशिबी आले...
म्हणे लोकशाहीचा ध्यास, हा सर्वांचा समान विकास
दलाल येथे श्रीमंत होती, कष्टकरी होती भकास
देशाचे पोशिंदे आम्ही, दर्जा आमचा सर्वांहून लहान
कसे म्हणावे स्वातंत्र्य याला,
कसा हा आमचा भारत महान....

**प्रतिक्षा बाळासाहेब पगार**
**- ११ वी (विज्ञान)**

---

## माझा बाप...



कष्टकरी बाप माझा
माझा बाप साधा भोळा
नको मिष्टान्न, पक्कान्न
खाई कांदा-भाकर न् मुळ
हाती फोड पायी भेगा
मला फुलापायी जपे
मुखी घोष पांडुरंगाचा
घेई पोटास चिमटे ॥
मला खाऊ देई गोड गोड
माझ्यासाठी जगताना
सारी त्याची धडपड
सारी त्याची धडपड ॥

**हाटकर गायत्री संजय**
**- प्रथम वर्ष (बी.कॉम)**



Scanned with CamScanner

## जीवनाचे सार...

संकटांनी कधी कंटाळायचे नसतं,
त्याला सामोरं जायचं असतं !
कुणी नावे ठेवली तरी थांबायचं नसतं,
आपलं काम चांगलच करायचं असतं !
अपमानाने कधी खचायचं नसतं,
जिद्दीने बळ वाढवायचं असतं !
निराश मुळीच व्हायचं नसतं,
चैतन्य सदा फुलवायचं असतं !
पाय ओढले म्हणून परतायचं नसतं,
पुढे आणि पुढेचं जायचं असतं !
लोक निंदेला कधी घाबरायचं नसतं,
आपलं सामर्थ्य दाखवायचं असतं !
जीवनात खूप करण्याजोग असतं,
पण आपलं तिकड लक्षचं नसतं !
रागाने कुणाला बोलायचं नसतं,
प्रेमाने मन जिंकायचं असतं !
प्रेमात लहान थोर पहायचं नसतं,
एकमेकांना आधार देऊन
मार्गदर्शन करायचं असतं... !!

**शितल वसंत पाचोरकर**
– तृतीय वर्ष (बी.कॉम.)

## अवस्था....

जवळ आल्यावर सर्वच माणसे आपले असतात
परंतु आजही नाही, पण ते कधीच परके नसतात
आयुष्यानेही जिवनाच्या अशाच एका वळणावर
आणलं की, मनाचाच गुंता झालायं
कोण परकं आणि कोण आपलं
बरंच काही हसून गेलं, रुसूनही गेलयं
कधी माहितीच नव्हतं की, रडणं आणि हिरमुसन
काय असतं.
म्हणूनच तर आता संघर्षाचा अग्निडाव सोसतेय
अश्रू डोळ्यात साठवूण
व पुन्हा नव्या उमेदीने कसतेय
जुन्या आठवणी पुन्हा आठवत
मन खूप लाजिरवाण झालयं शेवट
म्हणतय खूप केलं इतरांसाठी
अन् ते लाचार विचार मन म्हणतयं उत्कंठेपोटी की,
अगं जग कधी स्वत:साठी
अशाच एका रात्री मन विचार करु लागतं
खूप आठवणींनी विचारांच आभाळ दाटून येतं
ते सुंदर आकाश, चांदण्यांची रात्र
आणि तो पक्ष्यांचा चिवचिवाट एकच सगळीकडे
हळूच मन जुन्या आठवणीत गुंतले
मीच मनाला विचारले, जे नाही व्हायचे तेच घडले
तेही न घाबरता उत्तर मिळाले. काय होतीस तू,
काय झालीस तू, अगं विचारी स्वप्नांची परी वाया
गेलीस तू, आजही वाटतयं काहीतरी शिकावं या
ओळींमधून, तरंच आयुष्य घडेल या जिवनाच्या
जाळीतून, आजही माझी तशीच जिद्द, हिंमत आहे,
काहीतरी करुन दाखविण्याची, फक्त एकदा वाट
पाहतेय, माझी गाडी रुळावर येण्याची, फक्त वाट
पाहतेय एका संधीची, पुन्हा एकदा नवा चान्स
मिळण्याची, चान्स मिळण्याची...

**आवारे वैष्णवी बाळासाहेब** – तृतीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## सैनिक...

सलाम माझा तुला,
ज्या आईने, बाबांने सावरले, घडवले तुला
मनात खूप खंत वाटते
जेव्हा दादा तू सीमेवर लढत असतो
खूप रडूही कोसळेत
श्वासच मनाला आवरत आधार देतो
खूप विचार केल्यावर खूप खूप अभिमान वाटतो
अतिरेक्यांनो चाल तुमची किती दिवसांची आहे
सर्व दिवसांतील एक दिवस
आमचा आहे.
मनगटात जोपर्यंत ताकद आहे
जिवन जगण्याचा एक नवा ध्यास आहे
उमेद आहे
रक्षाबंधनं आजची नाही आमच्यासाठी
रोजच आहे
आशीर्वाद देण्याइतके मोठे नाही आम्ही
तरीही दादा तुला आयुष्यभराची साथ आहे
आनंदाचा वर्षाव आहे
सलाम माझा तुला
सलाम माझा देशाला...

**आवारे वैष्णवी बाळासाहेब**
- तृतीय वर्ष (बी.कॉम.)

## सावली

फिरत असतेस मागे माझ्या
नाही का येत तुला कंटाळा
नाही का वाटत तुला असावं कुणी आपल्याला
मी म्हणते घे सुट्टी कधीतरी आराम मिळेल तुला
फिरत असतेस मागे माझ्या
येत नाही का तुला कंटाळा ॥१॥
ऐकतेस गप्पा चोरुन माझ्या पण असतेस
गप्प तू
नाही का वाटत तुला
असावं कुणी आपल्याशी बोलायला
फिरुन फिरुन मागे माझ्या
येत नाही का तुला कंटाळा ॥२॥
मैत्रीण तशी आहेस नावाला
पण मदतीला धावतांना
असतेस माझ्या मागे धावायला
मुली म्हणतात, कोण तुझी मैत्रिण
नाव सांग आम्हाला
आवडेल मला सांगायला
सावलीच ती आवडेल
मुलींना ऐकायला ॥३॥

**कोतवाल गौरव निलेश**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## जीवन....

जे होत ते फक्त सहन करायचं
बदलत्या जगाबरोबर आपणही बदलायचं
आयुष्य असंच जागयचं
कुठून सुरु झालयं ते माहित नसल तरीही
कुठ थांबवायच ते ठरवायचं
कुणासाठी काहीतरी निस्वार्थ मनाने करायचे असते
स्वत:चे सुख पाहण्यापेक्षा इतरांचे सुख पाहायचे
दु:ख आणि अश्रूंना फक्त
आपल्या मनात कोंडायचे
हसता नाही आले तरीही
दुसऱ्यांना तरी हसवायचे
आकाशात झेप घेवूनही
मातीला विसरायचे नाही
मरणाने समोर येवून जीव जरी मागितला
तरीही मागून मागून काय मागितले
असे म्हणायचे
असं जीवन जगायचे,
असं जीवन जगायचे......

**आवारे वैष्णवी बाळासाहेब**
- तृतीय वर्ष (बी.कॉम.)

## कर्म माणसाचे दोष कर्माला...!

माणसाची देवाला विनंती
असून दे रणरणत्या
उन्हाची वेळ.
का चालवलास तू
पावसाचा खेळ ?
बिघडलाय सगळा
ऋतुंचा मेळ
सांग नेमकी कधी आहे
पेरणीची वेळ ?
देवाचे सडेतोड उत्तर
माणसा तू वृक्षतोड करताना
बघितलास नाही काळ वेळ !
सिमेंट चे जंगल उभारतांना
तू ठेवला नाही कसलाच ताळमेळ !!
आलाय तुझ्या अंगाशी
तुझाच हा खेळ !
बंद कर मला दोष देण्याचा
तुझा हा पोरखेळ !!

**वक्टे रोहिणी विष्णू**
- तृतीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## जीवलग....

जेव्हा परकी माणसं दगा देतात
तेव्हा वाईट वाटून घ्यायचं नसतं,
आपलेच आपला विश्वासघात करतात
तेव्हा मात्र गप्प रहायचं नसतं...
अर्ध्यावर का सोडून दिलं
याचा विचार करायचा नसतो,
त्यांनी एकटं का सोडलं याचं
कारण मात्र शोधायचं असतं,
भावनांची वेलमैत्री असते
प्रेमाचं पाणी तिला द्यायचं असतं
वेल ही सुकणार,तर नाही ना ?
म्हणून खूप जपायचं असतं ...
एक विचार असणारी आपली नाती
क्षणात विखुरली जातात,
ती विखुरण्याच्या अगोदर ती
नीट पक्की झालेली नसतात...
जीवनाच्या वाटेवर जोडीदार अनेक भेटतात
पण साथ मात्र थोडेचे देतात,
जे आपली नेहमी आठवण काढतात
तेच आपले खरे 'जीवलग' असतात....

**आहेर प्रियंका विष्णुपंत**
**- द्वितीय वर्ष (बी.कॉम.)**

## आयुष्य...

नशिबाची चाकरी करण्यापेक्षा
कर्तृत्वाला आपल्या हाताखाली बाळगावं
आयुष्य जास्त सुंदर वाटतं.....
भविष्याचे चित्र काढण्यापेक्षा
वर्तमानातलं चित्र पूर्ण करावं
आयुष्य जास्त सुंदर वाटतं....
कायमच मागण्या करण्यापेक्षा
कधीतरी काहीतरी देऊन पहावं
आयुष्य जास्त सुंदर वाटतं...
आपल्याला कोण हवंय यापेक्षा
आपण कोणाला हवे आहोत
हे सुद्धा कधीतरी पहावं
आयुष्य जास्त सुंदर वाटतं...
आकाशातले तारे कधीच मोजून होत नाहीत,
माणसाच्या गरजा कधीच संपत नाहीत.
शक्य तेवढे तारे मोजून समाधानी रहावं
आयुष्य जास्त सुंदर वाटतं...!!

**बिन्नर कविता बाळू**
**- १२ वी (सायन्स)**



Scanned with CamScanner

## बाप....



आईचं गुणगान खूप झालं
पण बिचाऱ्या बापाने काय केलं ?
निकट प्रसंगी बापच सदा सोडवी
आपण फक्त गावी आईची थोरवी !!
आईकडे असतील अश्रूंचे पाट
तर बाप म्हणजे संयमाचा घाट
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई
त्या शिदोरीची सोय बापचं पाही !!
देवकी यशोदेचे प्रेम मनात साठवा
टोपलीतून बाळास नेणारा वासूदेव आठवा
रामासाठी कौशल्येची जाहली असेल कसरत
पूत्रवियोगाने मरण पावला दशरथ !!
काटकसर करुन मुलास देतो पॉकेटमनी
आपण मात्र वापरावी शर्ट, पॅन्ट जुनी
मुलीला हवे ब्युटी पार्लर मेकअपसाठी
घरी बाप आटपतो बिना साबणाची दाढी !!
जीवनभर मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा
त्यांनी समजून घ्याव हीच माफक 'इच्छा'

**वाढवणे दिपाली सुरेश**
- द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## मैत्रीचा अर्थ...

एक प्रेमळ मन जे
कधी तिरस्कार नाही करत
एक गोड हास्य जे कधी
फिक नाही पडत
एक जाणीव जी कधी
दु:ख नाही देत
आणि एक नात
जे कधीच नाही संपत.

**पठाण उजमा रीयाज**
- तृतीय वर्ष (बी.कॉम.)

## जीवन....

जीवन सुंदर व यशस्वी होण्यासाठी
तीन गुणांची जरुरी असते.
पहिला गुण म्हणजे मनात सर्वांविषयी प्रेम पाहिजे ...
दुसरा गुण म्हणजे ज्ञान पाहिजे.. आणि
तिसरा गुण म्हणजे काम करण्यासाठी शक्ती पाहिजे..
विचार ही एक विलक्षण शक्ती असून
तुमचे भले करण्याचे सामर्थ्य
तुमच्या विचारात आहे....म्हणून विचार बदला....
म्हणजे नशीब बदलेल....

**चौरे अश्विनी दत्तू**
तृतीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

# मांडली थट्टा बळीराजाची...



खूप झाली आता आमची फसवूक
प्रत्येक सरकार निवडुका आल्या की,
दारात उभे राहतात
पण शेतकऱ्याने आत्महत्या केली की,
सरकार आमच्या शेतकऱ्यांकडे डोकून
सुद्धा बघत नाही
खूप झाली आता आमची थट्टा
नका आता कोणत्याच मदतीच्या आशा दाखवू
कारण बि-बीयाणे आणण्यासाठी पैसे नव्हते
म्हणून बायकोचे मंगळसूत्र पण गहाण ठेवलं.
पण आता गहाण ठेवण्यासाठी काहीच उरलं नाही
मायबाप सरकार म्हणून स्वत:लाच देवाकडे गहाण
ठेवण्याची वेळ आली.
पण निसर्गानी सुद्धा आमची फसवणूक केली,
नापिकेने तर तेव्हाच आमच्या तोंडात मारली
खूप सरकार आले, खूप सरकार गेले
पण शेतकऱ्याचे कोणी वाली नाही झाले
दुष्काळानं तर आधीच थैमान घातल होतं
कारण घासभर भाकरीसाठी आणि
घोटभर पाण्यासाठी लांब-लाबं भटकावं लागत होतं.
कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करतात
आमचे शेतकरी अन् सरकार म्हणते की,
प्रेम प्रकरणांमुळे आत्महत्या करतात आमचे शेतकरी
हो करतो ना प्रेम आम्ही, मायबाप सरकार
पण तुमच्या सारखं नाही करत प्रेम, आम्ही प्रेम केलं
ते 'काळ्या मातीवर, बायको-मुलांवर, वफादार-
बैलांवर आणि त्या काळ्या आईच्या कुशीत
पिकलेल्या सोन्यासारख्यां पिकांवर.''
असं आमचं प्रेम प्रकरण आहे, मायबाप सरकार
'नको आम्हाला कर्जमुक्ती
आता आम्ही आत्महत्याकरुन
कायमची घेतो मुक्ती.'
'नको आम्हाला कर्जमाफी
कारण एवढे बोलून मागतो सरकारची माफी'
जाता जाता एक सांगतो मायबाप सरकार तुम्हाला
या माझ्या काळ्या आईचे आणि तिच्या
लेकराचे पोट नका उपाशी ठेवू
नाही तर एक दिवस तुम्हाला उपाशी राहावे लागेल.

**सागर बाळासाहेब भालेराव**
- तृतीय वर्ष (बी.ए.)

## चारोळी

खूप काही सांगायचं होतं तुला
पण मनातलं मनातंच राहून गेलं
सुखाच घरटं बांधण्या आधीच
पाखरु रानात उडून गेला

**गचाले अर्चना बाळासाहेब**
- द्वितीय वर्ष (बी.ए.)

## विरह....

हलकेच बरसा सरींनो
चिंब चिंब भिजलो आहे.
हळूवार या स्वप्नांनो
आताच शांत निजलो आहे.
विश्राम घ्या पावलांनो
चालुनिया दूर दूर थकलो आहे...
दु:खांनो कोसळू नका क्षणभर
घेऊनिया भार हा उरी
सर्वथा मी झुकलो आहे...

**बिन्नर दिपक सुरेश**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

## जिद्द.....

चालण्यासाठी वाट असते
वाटेसाठी चालणं नसतं
उंच भरारी घेणाऱ्यांना
आभाळाचं भय नसतं
खूप-खूप ताकद लागते
आलेलं अपयश पचवायला
डोळ्यात आलेलं पाणी पुसून
ओठावर हसू खेळवायला
करण्यासारखं खूप आहे
उमेद मात्र हवी
मिळण्यासारखं ध्येय आहे
जिद्द मात्र हवी.... !

**वाढवणे दिपाली सुरेश**
– द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## बदलतयं जग....

बदलतय जग
म्हणून बदलल्या काही कृती,
आता तरी जपा
आपल्या महाराष्ट्राची संस्कृती ...
पूर्वी होते काही संस्कार
मुलगी सातच्या आत घरात,
पण आता रात्र झालीया पार
अजून मुलगी नाही घरात ...
पूर्वी होते काही संगोपन
मातीत खेळून गेले बालपण
मोबाईल गेम मुळे
आता न दिसे शहाणपण ...
विसरुन गेले मातीतले कण कण
पूर्वी होते विचार सगुण,
पदर पडे न खांद्यावरुन
आता उरलेत कुठे गुण ...
वेड फॅशनचे लागून
म्हणून बदलतय जग
पण बदलून देऊ नका अशा गोष्टी,
चांगली ठेवा दृष्टी
तर दिसले सुंदर सृष्टी.. !!

**तिडके श्वेता अरुण**
– तृतीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## अस्तित्व....

आज काही बोलावसं वाटत
कधीच न बोललेल्या गोष्टी सांगायच्या
जाणीवेत आलेल्या काही भावना ओठांवर
आणायच्या...
आज ही आई डॉमीनोस्तच्या पिझ्झा ऐवजी तुझ्या
हातची खिचडीची चव भावते, त्यांना कितीही दात
असले तरी का कुणास ठाऊक तुझी स्तूती करायला
लाज वाटते.
बाबा...!! बाबा आपले जुने फोटो पाहून आजही
चेहऱ्यांवर हसू येतं, प्रत्येक फोटोत तर अगदी
चिटकून आहे. तुम्हाला पण आज का कुणास ठाऊक
एक मिठी मारायला लाजच वाटते.
तुम्ही केलेले लाड बाबा कधीच विसरु शकणार नाही.
नेहमीच जाणवते...
मैत्रिनींणी सोबत तर फार वेळ घालवते, पण तुमच्या
सोबत बसून निवांत गप्पा मारायला लाजच वाटते.
खरंच...!! ह्या गोष्टीसाठी लाजावं इतकी मोठी झाली
असेल तर पुन्हा लहानगं व्हायचं, रांगत रांगत
बोबड्या बोलात तुमच्या सोबत रमायचं.
पाठीवरती बसून आई पुन्हा आंघोळ घालून देशील
का ? भूक लागली असेल ना सोन्या, म्हणून जेवण
भरवून देशील का ?
बाबा..... !! बाबा पुन्हा बोट धरुन चालयला
शिकवाल का ?
किती उशीर गं कराटे म्हणून मला शाळेत सोडायला
याल कां ?
मांडीवर डोकं घेऊन आई कुरवळत पुन्हा झोपवशील
का ?
झोप लागत नाही का बाळा म्हणून अंगाई गाऊन
थोपटशील का ?
दाखवत नसले जरी, आई बाबा तुमच्यावरचं प्रेम
काही कमी होणार नाही,
कारण झाड कितीही वाढले तरी त्याला मातीविना
अस्तित्व नाही....!

**बिन्नर योगिता सुरेश**
– १२ वी (सायन्स)

## वेळ....

जेव्हा वेळ आपल्यासाठी थांबत नाही
मग आपण योग्य वेळेची वाट का पाहतो
प्रत्येक क्षण हा योग्यच असतो
चुकतो तो फक्त आपला निर्णय....

**बेंडके बापू संजय**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

### चारोळी

प्रेमासाठी जगतात सगळे
प्रेमासाठी मरतात सगळे
एक दिवस गेल्यानंतर
दुसरीला शोधतात सगळे

**गचाले अर्चना बाळासाहेब**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

## आंगण....

पहाट झाली आईने अंगण सारविले
जाई-जुईने ते सजविले
जसे की, आंगण फुलवून दिसते
जसी फुललेली फुलबाग
आणि या आंगणातील सड्यांमध्ये रंग भरणारा
तो पारिजातक आहे महान
आंगण जसे दिसू लागले
आता वृंदावन बाग
जरी येत असला
सारवलेल्या शेणाचा वास
त्यास लपविण्याचे काम करतो
तो आहे मोगरा खास
आता झाले सर्वत्र प्रसन्न परिसर
त्यामुळे येतो खूप छान सुगंध
कारण या अंगणात आहे.
एक तुळशी वृंदावन...

**सागर भालेराव**
– तृतीय वर्ष (बी.ए.)

## किनारा....

कागदाची 'नाव' होती
पाण्याचा 'किनारा' होता
मित्रांचा 'सहारा' होता
खेळण्याची 'मस्ती' होती
मन हे वेडे होते
'कल्पनेच्या' दुनियेत जगत होते.
कुठे आलो या 'समजुतदारीच्या' जगात
या पेक्षा ते भोळे
'बालपणंच' सुंदर होते.

**बिन्नर दिपक सुरेश**
– तृतीय वर्ष (बी.ए.)

## ध्येय....

तुम्हाला तुमचे ध्येय गाठायचे असेल
तर तुमच्यावर भुंकणाऱ्या प्रत्येक कुत्र्यांवर
थांबून दगड मारण्यापेक्षा
नेहमी बिस्किट जवळ बाळगा आणि
पुढे चालत रहा...

**शिरसाट राणी कैलास**
– १२ वी (सायन्स)



Scanned with CamScanner

## रुप वसुंधरा....

वसंता आला बहरुन
नटली वसुंधरा हिरवागाल शालू
तिला बघून ते आकाश झाले निळसर
त्यामध्ये उमललय एक सूर्यफूल
तिला बघून रंगाचा खेळ करतो
तो आहे इंद्रधनुष्य छान
आणि हे सर्व बघून घन आले दाटून
हे वसुंधरा हे तुझे रुप आहे किती सुंदर
असे बोलते हे माझे मन..

**सागर भालेराव**
– तृतीय वर्ष (बी.ए.)

## आयुष्य

जीवन आहे एक रम्य पहाट,
संकटांनी गजबजलेली वादळ वाट...
सोनेररी क्षणांची एक आठवण,
सुखः–दुःखाची गोड साठवण...
प्रेमाच्या पाझरांची वाहती सरीता,
नात्यांच्या अतूट शब्दांची गुंफलेली...
कविता, जाणीवांच्या पलीकडचे
जगावेगळे गाव, यालाच तर आहे
आयुष्य हे नाव.

**शिरसाट राणी कैलास**
– १२ वी (सायन्स)

## माझा बाप...



रात दिस कष्टतो माझ्यासाठी माझा बाप.
खाई चटणी–भाकर माझा बाप.
उन्हातान्हात माती उपसतो माझा बाप.
अनवाणी पायाने चालत असतो माझा बाप.
हातावरच्या फोडाला नाही पाहत माझा बाप.
अन् मला फुलाप्रमाणे जपतो माझा बाप.
कामावरुन घरी येताना गोड – गोड
खाऊ आणतो माझ्यासाठी माझा बाप.
कितीही भुकेला असता मी जेवले की नाही
आधी विचारतो माझा बाप.
खिशातील उरलेले चार पैसेही
माझ्या हातात देतो माझा बाप.
माझ्यासाठीच जगतो माझा बाप...

**शिरसाट राणी कैलास**
– १२ वी (सायन्स)

# एक तरी बहिण असावी



मोठी लहान शांत, खोडक
कशीही असावी,
पण एक बहिण असावी.
मोठी असेल तर
आई-बाबांपासून
वाचवणारी.
लहान असेल तर
आपल्या पाठीमागे लपणारी.
मोठी असल्यास गुपचूप
आपल्या पॉकेटमध्ये पैसे ठेवणारी.
लहान असल्यास
चूपचाप काढून घेणारी.
लहान असो वा मोठी
छोट्या छोट्या गोष्टींसाठी भांडणारी.
एक बहिण प्रत्येकाला असावी.
मोठी असल्यास आपलं
चुकल्यावर कान ओढणारी.
लहान असल्यास
तिचं चुकल्यावर सॉरी दादा म्हणणारी.
लहान असो वा मोठी आपल्याला एक बहिण
असावी.
आपल्या एखाद्या मैत्रिणीला 'वहिनी'
म्हणून
हाक मारणारी
एक बहिण प्रत्येकाला असावी.
मोठी असल्यास प्रत्येक
महिन्याला नवा शर्ट
आणणारी,
लहान असल्यास
प्रत्येक पगारात
आपल्या खिशाला चंदन लावणारी,
एक बहिण प्रत्येकाला असावी.
ओवाळणी काय टाकायची
हे स्व:त ठरवतं
असली तरीही तितक्याच
ओढीने
राखी पसंत
करुन आणणारी
एक बहिण प्रत्येकाला असावी
आणि म्हणूनच मुलगी वाचवा.....
देश वाचवा.....'

**तिडके सुजित सुनिल**
– १२ वी (सायन्स)

# माय माऊली...



ठेवून माथा तुझ्या चरणी
करितो वंदन तुझला मी
देवाहूनी श्रेष्ठ आहेस
तू माझ्यासाठी
नाम घेतो मुखातूनी
'आई' तुचं आईस.
माझी माय माऊली

**सागर भालेराव**
– तृतीय वर्ष (बी.ए.)


## बैल पोळा की, ट्रॅक्टर पोळा.....!

सण आला पोळा
सर्वत्र मातीच्या बैलाचा सोहळा
दुष्काळनं बैल कुठेच दिसत नाही
हायब्रीड जेवण आलं आता
पुरण-पोळी कोणीच खात नाही
लोक झाले वेडे डिजीटल इंडियाच्या नादात
बैल कुठं राहिले आता
ट्रॅक्टर घरी आल्यानं
आता होईल का पोळा साजरा
तुमच्या डिजीटल इंडियाच्या तंत्रात
कारण आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात
असा हा पोळा झाला आता
पण या कृषीप्रधान देशात
ही अशीच अवस्था राहिली तर

२०२२ च्या 'न्यू इंडिया कॅलेंडेरमध्ये बैल पोळा ऐवजी ट्रॅक्टर पोळा' झाल्याशिवाय राहणार नाही.

**सागर भालेराव**
- तृतीय वर्ष (बी.ए.)

## विसरु नको रे आई - बापाला....



विसरु नको रे आई बापाला, झिजविली त्यांनी काया
काय झिजवून तुझ्या शिरावर धरली सुखाची छाया
मिळणार नाही पुन्हा आई-बापाची माया ॥१॥
तुला मिळेल बंगला-गाडी, शेती-वाडी, मोटारगाडी
आई-बाप मिळणार नाही, हे जाण राहू दे थोडी
म्हातारपणी त्या आईबापाला लावू नको भीक मागाया
काया झिजवून तुझ्या शिरावर धरली सुखाची छाया
मिळणार नाही पुन्हा आई बापाची माया ॥२॥
आई बाप जिवंतपणी असता, नाही केली त्याची सेवा
अरे मेल्यावरती कशाला म्हणतो देवा-देवा
बुंदी लाडूच्या पंगती बसवशील नंतर तू जेवाया
काया झिजवून तुझ्या शिरावर धरली सुखाची छाया
मिळणार नाही पुन्हा आई बापाची माया ॥३॥
स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी
अरे समजून उमजून घे ना, तू होऊ नको अविचारी
विश्वमाऊली ज्ञानराजा आशिर्वाद द्यावया
काया झिजवून तुझ्या शिरावर धरली सुखाची छाया
मिळणार नाही पुन्हा आई बापाची माया ॥४॥
पृथ्वीपेक्षा श्रेष्ठ आई असते...!
स्वर्गापेक्षा उंच वडील असतात...!!

**तिडके शुभांगी मोहन**
- प्रथम वर्ष (बी.ए.)

## मी बुद्धीमान

देवाने दिली मला इवलीशी चोचं,
तरी दाणा नाही राहत मागं
थोडी लाज ठेव माणसा
तुझ्यापेक्षा मी आहे बुद्धीमान.
मला नाही दिले देवाने हात
मला दिले देवाने फक्त दोन पाय.
पण माणसा तुला दिले देवाने
दोन हात, दोन पाय,
तरी आहे तुझं काम ओबड धोबड
माझ्यासारखा कधी करशील रे बारीक विचार
तेव्हा होशील तू या गगनात महान.
अरे माणसा झाला जरी तू मोठा इंजिनियर
तरी नाही बांधू शकत माझ्या सारखं घरटं
थोडी लाज ठेव माणसा
तुझ्यापेक्षा मी खरंच आहे बुद्धीमान

**सागर भालेराव**
– तृतीय वर्ष (बी.ए.)

## माघार घेऊ नकोस...

जेव्हा तुला अनंत अडचणी येतील,
तुला यशाचा मार्ग अत्यंत खडतर वाटेल,
तुझ्या अपेक्षा जास्त असेल,
पाहिजे तसे यश मिळत नसेल,
तुला चिंतेने ग्रासले असेल,
तेव्हा तू थोडासा विसावा घे,
परिस्थितीला भिऊ नकोस !!
जीवन चढ–उतारांनी भरले आहे.
येणाऱ्या आव्हानांसाठी सज्ज रहा,
त्यांना खंबीरपणे सामोरे जो,
ऐरण झालास तर घाव सोस,
हातोडा झालास तर घाव घाल,
गाठून घे प्रयत्नांचे उच्च शिखर
पण प्रयत्न मात्र सोडू नकोस !!!
यशाचे अग्निपंख लागतील तुला,
सोनेरी दिवस ते येतीलही, थकून झाले तरीही,
वाट बघ यशाची व्यर्थ तू बसू नकोस,
तू फक्त माघार घेऊ नकोस.

**डॉ. ए. पि. जे. अब्दुल कलाम**
संग्रहीत – **स्वाती थोरमिसे**– प्रथम वर्ष (बी.ए.)

### चारोळी

दु:खामध्ये सुद्धा हसतं रहावं
वेळ ही सर्वांचीच येते...
झालं तर आयुष्याच सोनं व्हावं
राख तर सर्वांचीच होते.

**गचाले अर्चना बाळासाहेब**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

### चारोळी

आईच्या पदरात झोपण्याचा आनंद
पुढची पिढी घेऊ शकत नाही
कारण जीन्स घातलेली आई
पदर घेऊ शकत नाही.

**पवार दिपाली नामदेव**, द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# भूतकाळ जागा होतो तेव्हा....!

भूतकाळात डोकावल्या शिवाय
मजा काही मिळत नाही,
मागे वळून पाहिल्यावर
हसावं का रडावं कळत नाही....

सार्‍याच गोष्टींमध्ये
खूप खूप बदल झाले,
पहिल्यापेक्षा प्रत्येकाला
नक्कीच बरे दिवस आले

खरं वाटणार नाही पण
एवढं सगळं बदललं,
निगरगट्ट माणूस सुद्धा
मुळा सकट हादरलं ....

शाळेतून घरी गेल्या गेल्या
दप्तर कोनाड्यात जायचं,
दुसर्‍या दिवशी शाळेत जाताना
बाहेर काढलं जायचं....

अहो, दप्तर म्हणजे काय ?
वायरची पिशवी असायची,
जुन्या फाटक्या पुस्तकासोबत
फुटकी पाटी दिसायची....

अभ्यास कर म्हणून कुणी
म्हंणलही नाही,
अन् मार्क कमी पडले म्हणून
हाणलंही नाही....

कोणताही ऋतू असो
काळपट चहा असायचा,
तडकलेल्या बशीवर
कान तुटका कप दिसायचा...

बारा महिने अनवानी पाय
चप्पल म्हणजे श्रीमंती,
पायाला चटके बसायचे
पण सगळ्या गावात हिंडायचे....

कुणाचं गुन्हाळ लागलं की
चला रस प्यायला,
खळे दळे लागले की
चालले शेतात झोपायला....

मरणाची गरिबी होती
पण मजा मात्र खूप,
लग्न कार्यात माणसं, नाती
व्हायची एकरुप....

अमावस्येच्या दिवशी पोरं
मारुतीच्या पारावर,
नारळाच्या तुकड्यासाठी
एकमेकांच्या अंगावर....

ओ मामा द्या नं, ओ मामा द्या नं
एकच गलका व्हायचा,
रेटारेटी केल्यामुळे
सदरा टरकून जायचा....

पाहुण्याला पाहुणचार म्हणून
खिचडी, भजे व्हायचे,
तेवढ्यातच सार्‍यांचे
डोळे भरुन जायचे....



Scanned with CamScanner

तेलच्या-गुळवणी आणि पापडांची
काय मामलात होती,
तरीही त्या माणसांमध्ये
माणूसकी होती....
रात्र रात्र गप्पा व्हायच्या
डोळ्यात यायचं पाणी,
आडपडदा न ठेवता
दुःखाची व्हायची गाणी....
कुठे गेला तो साधेपणा
कुठं गेल ते सुख ?
खरं सांगा पहिल्या सारखी
लागते का आत भूक ?
इतकुसाक पेढ्याचा तुकडा
मिडकू मिडकू खायचा,
कधी तरी कुणी तरी
प्रसाद म्हणून द्यायचा ....
सारं सारं संपून गेलं
आता पैसा बोलत असतो,
माणूस मात्र भ्रमिष्ठासारखा
खोट खोट डोलत असतो....
पेढ्याच्या बॉक्सकडे
आता ढूंकूनही कुणी पहात नाही,
एवढंच काय पहिल्या सारख्या
मुंग्याही लागत नाही ....
सुखाचं बोट कधी सुटलं
आपल्या लक्षात आलं नाही,
श्रीमंतीत सुख मिळेल वाटलं
तसं काही झालं नाही....
ते सुख आणि वैभव
पुन्हा घरात येईल का ?
चिरेंबदी वाड्यामधून
हसण्याचा आवाज येईल का ?

श्रध्दा सचिन तिडके
- १२ वी (सायन्स)

## शब्दांचे महत्त्व....

कशी सुचली ही कविता
कसा घातला हा मेळ...
काही शब्द शब्दांत गुंतले
सुरु झाला हा खेळ...
खेळ खेळताना शब्द मला सुचू लागले
मनात माझ्या काहीही येवू लागले ॥१॥
मग अक्षर अक्षर एकत्र आले
अक्षरांचे शब्दांत रुपांतर झाले
शब्द शब्दांनी ओळ लिहिली
मनात रचनेची निर्मिती झाली ॥२॥
त्या शब्दांमध्ये माझा जीव लई
पेनची संपत आली शाई
नाहीतर लिहायचे होते खूप काही... ॥३॥
जरी पेनची संपत आली शाई,
तरी मनात राहिले खूप काही
पुन्हा लिहिण्याची केली घाई
शब्द सांगून जातात खूप काही... ॥४॥

पवार पूजा राजेंद्र
- द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# कारण मी मुलगी झाले...

जन्माला आले, सारे जण नाराज झाले
मारता येईना म्हणून बघत राहिले
मनात मात्र जळत राहिले
कारटीच झाली सांगत सुटले
स्वागत माझे असेच झाले
कारण मी मुलगी झाले ॥१॥



स्वतःसाठी पुरणपोळी
मला मात्र भाकर शिळी
जगायचे म्हणून कष्ट केले
खात आले कशीबशी जगत आले
लहानपणीच घामाने न्हाले
एरंडागत वाढत गेले
कारण मी मुलगी झाले ॥२॥

कारटी मोठी झाली आता वाजवून टाकू
बापाचे शब्द ऊर चिरत गेले
सारे सारे निमूटपणे गिळले
कारण, मी मुलगी झाले ॥३॥

बापालाही हायसे वाटले
हुंड्याचे खूळ सासूने काढले
मला मात्र आभाळच फाटले
हुंड्याचे पैसे घेऊनच ये
घेऊनच ये नाहीतर तिकडेच रहा
नवऱ्याची धमकी, सासऱ्याचा छळ
सासूचा जाच, दिराचा त्रास
कारण मी मुलगी झाले ॥४॥



पैसे, पैसे, पैसे आणि पैसे
काय करु ? काय करु
करणार तरी काय ?
फक्त अश्रूच ढाळले
कारण, मी मुलगी झाले ॥५॥

एकदाचे तेही मिटले
नंतर मात्र माझे नशीबच फुटले
मुलबाळं नाही म्हणून वांझोटी ठरले
नवऱ्याने नाकारले, सासूने लाथाडले
नवस केले – उपवास केले
डॉक्टरांकडे गेले पैसे तरी कुठले ?
नशिबालाच दोष देत बसले
कारण, मी मुलगी झाले ॥६॥

अखेर मला सवत आली
दुःखाने माझ्या सीमाच गाठली
वेताच्या काठीने पाठ फुटली
नवऱ्याचा मार, दिराच्या शिव्या
सासू–सासऱ्याने लाथाच द्याव्या
कारण, मी मुलगी झाले ॥७॥

सारे सोसले, खूप सोसले
अशक्य झाले तेव्हा पेटवून घेतले
माझी मी स्वतःच जळले
हाय देवा ! किती हे झाले
जगाला अवघ्या कायमची मुकले
स्वतःच स्वतःला मारुन टाकले
खरंच का ? का ? मी पेटून घेतले
कारण मी मुलगी झाले ॥८॥

**शेळके सोनाली संपत** – द्वितीय वर्ष (बी.ए.)

## मैत्री म्हणजे काय ?...

मैत्री म्हणजे दोन जिवांना जोडणारा पुल
संकट काळी मदतीचा हात.
मैत्री म्हणजे मायेची साठवण
मनाने मनाला दिलेली प्रेमाची आठवण
हा धागा नीट जपायचा असतो तो
कधी विसरायचा नसतो. कारण
ही नाती तुटत नसतात
ती आपोआप मिटून जातात.
मैत्री एक मनाने मानलेलं स्वप्न असतं.
मैत्री जीवनाची आखणी असते.
मैत्री जीवनातल्या सुख: दुखा:च्या आठवणीचा सण
असतो, मैत्री एक अशीच सोबत असते की,
जी न मागता साथ देते.
मैत्री ही न संपणारे स्वप्न आहे न
बोलताही ऐकू येती असे शब्द आहे.
ग्रिष्मात पडणाऱ्या पावसासारखे ढग आहे.
मैत्री ही एक पावसाची सर आहे ती
हळूवार येते आणि सुंदरतेचे नाते जोडून जाते.
नात्यांचे अनेक अर्थ उलगडून सांगते ती मैत्री.
आयुष्यातले हळूवार क्षण अलगद जपते ती मैत्री.
कधी आपल्यावर रुसते तर कधी हसते ती मैत्री.
परंतु सदैव आपल्या ह्रुदयात असते ती मैत्री.
आपुलकीचे, जिव्हाळ्याचे क्षण
डोळ्यात साठवते ती मैत्री.
मैत्री असावी प्रेमाची, त्यागाची आणि आपुलकीची.
ज्याप्रमाणे शिंपल्यात पाणी घालून समुद्र दाखवता
येत नाही, हाताने काढलेल्या फुलाला सुगंध येत
नाही. निळ्याभोर गगनाचा अंत होत नाही. तसेच
मैत्रीचा उल्लेख शब्दात होत नाही.
मैत्री ही भावनांची शांत तर कधी उसळणारी वाट
आहे.

**सोनवणे सरला नवनाथ**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

## जीवन ध्येय...

बनायचे असेल तर सूर्य बनेल
आकाशात लुकलुकणारा तारा बनणार नाही
बनायचे असेल तर समुद्र बनेल
छोटासा तलाव बनणार नाही.
बनायचे असेल तर मोठा वृक्ष बनेल
साधे गवत बनणार नाही.
कारण :–
गवताची सावली कधी दिली नाही.
जगले तर वाघासारखे जगेल
शेवटी बनेल तर अशीच बनेल
त्यात दुसऱ्यांसाठी जास्त जगेल.

**कु. शेळके सोनाली संपत**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## बाबा....



आई, ताई, दादा यांच्या पुढेही एक
अतूट नातं असतं
त्या नात्याचं नाव
असतं बाबा....
हाताचे बोट धरुन
चालायला शिकवणारे, कामावरुन येताना रोज खाऊ
घेऊन येणारे, पाठ दुखत असली तरी आपल्या
मुलाला घोडा बननू खेळवणारे...
आजारी पडल्यावर काळजीपोटी उशाशी बसणारे...
आपल्याला हसवणारे आणि खेळवणारे,
आईने कधी मारले तर तिच्यावर रागवणारे,
आपली मुले मोठी व्हावीत म्हणून झटणारे,
आपल्या लेकरांसाठी उंच उंच अपेक्षा बाळगणारे...
वाईट वागल्यावर खूप ओरडणारे,
छोटी चूक झाल्यास ती पोटात घालून,
प्रोत्साहन देणारे, चांगले काम केल्यावर,
कौतुक करणारे, परीक्षेत कमी गुण मिळवल्यावर
तेवढेच रागावणारे..., सर्वांवर प्रेम करणारे व सर्वांना
समजून घेणारे, कधी वेळ आलीच तर, पाठिशी
खंबीरपणे उभे राहणारे, बालपणापासून खाल्ल्या
त्यांनी परिस्थितीमुळे खस्ता, कितीही संकटे आली,
तरी गाठला उज्वल यशाचा रस्ता.
आजपर्यंत आपल्या प्रेमळ वागण्याने किती मोठे कर्ज
दिले आम्हास मायेचे, कसे ऋण फेडू या
जन्मदात्याचे...

**पवार पूजा राजेंद्र**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)

## आई....



आई म्हणजे माझे
जीवन आहे ती
माझ्या जीवनाची
आधार आहे ती...
माझ्या मनात असे
सदा सर्वदा ती
दूर असूनही नेहमी
जवळ असते ती...
तिच्या कष्टात बघते
माझ्या आयुष्याची स्वप्ने ती
काम करुन थकते
पण विसरत नाही मला कधीही ती...
संस्कार अन् चारित्र्य
शिकवणारी शिक्षक आहे ती,
आयुष्यभर पुरणारी
संस्काराची शिदोरी आहे ती...
माझ्या जीवनाची खरी
शिल्पकार आहे ती,
कधी न उमगणारे
जीवनाचे कोडे आहे ती...
किती गावा महिमा
तिचा तो अपुराच आहे,
कारण आत्मा अन् ईश्वर
यांचा संगम आहे ती...

**शेळके सोनाली संपत**
– द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## What is Life

One Gentalman asked - What is life ?
One rich man said - Money is life
The lover said - Love is Life
The scholar said - Thought is life
The musician said - Music is life
The Comedian Said - Laughter is life
But I Say - Struggle is Life

**- Poonam Rajendra Aher**
S.Y. (B.Com)

## Friendship....

Everyone hears that you say, Friends listen to what you say. Best friends listen to what you don't say.
Friendship is golden ribbon that ties the world together
Friendship is talking to your best friend without words.
A true friend is the one who knows more about you than yourself and still loves you.
Love is blind, but Friendship closes its eyes
Friendship is the golden thread that ties all hearts together.
Friends, even on the road to hell a flowers, will make you smile.

**- Salade Priyanka Dnyaneshwar**
T.Y. (B.Com)

# लक्ष्य सुस्पष्ट हवे
## -- प्रेरणा --

स्वामी विवेकानंद अमेरिकेत असतांना एकदा नदीकिनारी बसले होते. त्यांची नजर काही मुलांवर गेली. ती मुले नदीत वाहत जाणाऱ्या अंड्यांच्या टरफलावर नेम धरण्याचा प्रयत्न करीत होती. वाहणाऱ्या टरफलावर नेम लावणे त्यांना कठीण वाटत होते. मात्र त्यांचा एकही नेम योग्य प्रकारे लागत नव्हता. स्वामींजी हे बघत होते. थोड्या वेळाने ते त्यांच्याकडे गेले आणि त्यांनी मुलांकडून एअरगन घेऊन नेम लावायला सुरुवात केली. विवेकानंदांचे सर्व नेम अचूक लागले. ते बघून मुले आश्चर्यचकीत झाली मुलांनी अतिशय उत्सूकतेने त्यांना विचारले की,'तुम्ही हे सगळं कसे केले ?'

त्यावर स्वामीजींनी उत्तर दिले की, 'कोणतेही काम करताना आपल संपूर्ण लक्ष त्यावर केंद्रीत कराव'. तुम्ही ज्या वेळी नेम लावत असाल तेव्हा संपूर्ण अवधान केवळ लक्ष्यावरच लावावे असे केल्यास तुमचा नेम कधीही चुकीचा लागणार नाही. अशा प्रकारे ज्यावेळी तुम्ही अभ्यास करत असाल तेव्हाही तुमचे पूर्ण लक्ष त्याकडेच असलेच पाहिजे. लक्ष्य अथवा ध्येय सुस्पष्ट असेल तर यश.. नेहमीच आपल्यासोबत राहते.

**चौरे स्नेहल रमेश**
– तृतीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

# शेत बांधावरचं दु:खं...

शेत बांधावरुन
तिच्या हातांना आधार देत
माझे पाय
शेताचं वळण न् वळण तुडवीत होती...
पण....
तिच्या थरथरणाऱ्या हातांच्या स्पर्शानं
हृदय ढवळून निघायचं...
आणि मन तिची समजूत घालायचं...
माय खूप दम लागलाय तुला
जरा इसावा घे... ?
पण... माझ्या बरबटलेल्या गालावरुन
तिचे थरथरणारे हात
फिरताना सांगायचे...
माझ्या वासरा... कसला रे इसावा...
आता तर शेवटचा इसावा घ्यायची वेळ आलीय
डोळ्यातलं एकच सपान जितं हाय,
माझ्या कुंकवाच्या धन्यानं
काबाडकष्टानं पिकवलेलं शिवार
डोळे भरुन पाहायचं...
अन् अचानक....
आगीनं तांडव घालावा
अगदीं तसाच मायच्या पोटात गोळा उठला...
मेरावरच्या बाभळीनं कोसळावं
तसंच मायनं धाडदिशी आंग
शेतबांधावर टाकलं...
नि:शब्द झालेल्या मायच्या ओठातून
शब्दांनी वाट साधली...
तिचा प्रत्येक शब्द
माझ्या आसवांची समजूत घालताना
सांगत होता....
'लेकरा.. आता शेवटची सोबत...
इथून पुढचं आयुष्य माझ्याविनाच जगायचं..'
मायचे शब्द हृदयाला चटके देऊन
जात होती..
आणि डोळ्यातली आसवं
मायच्या आसवांची समजूत घालत
तिच्या गालावर टपकत होती...
ती आसवं सांगत होती...
माय... या जगाच्या पाठीवर
मला अशी पोरकं करुन जावू नको माय...
माझा चेहरा हातात घेऊन
आसवांनी ओल्याचिंब झालेल्या गालावर
तिचे थरथरणारे ओठ
टेकता न् टेकता तोच...
तिच्या ओठांची स्तब्धता अन्...
पापण्याचा सुटलेला धीर पाहून,
एखाद्या वासरानं
मायच्या दुरावल्यानं हंबरडा फोडावा..
तस्साच मायच्या जाण्यानं मी हंबरडा फोडला...
क्षणभर... आभाळाकडं डोळे लावून बसलो
अन्... मनात इचार आला...
सतीसावित्रीपरमानं जावं
आणि यमाची वाट अडवून
मायचा जीव परत आणावा.... !
पण....

डबडबलेल्या डोळ्यातील आसवांखेरीज
दुसरं कशांचच भान राहिलं नव्हतं...
दोस्ता,
मायला जावून एक वरीस झालंय...
पण त्या बांधावरचं हिरमुसलेलं गवत
जेव्हा काळजाला बोचतं...
तेव्हा काळजातलं मायचं दुःख
डोळे भरुन वाहतं....
अगदी श्रावणातल्या सरीसारखं...!!

**प्रा. एस. डी. फुगट**
(मराठी विभाग प्रमुख)

## आई.....

सोबत असतेस तेव्हा आधार तुझा वाटतो,
एकटी असले की कंठ माझा दाटतो,
माझ्या चुकांवर ओरडणे तुझे आवडते,
मन पण वेडे कधी कधी मुद्दाम चुका करते
तुला सगळे सांगते, माझी मैत्रीण मानते,
इतके जवळून मला दुसरे कुणी का जाणते
दृष्टीआड तुझे होणे शिक्षा मला वाटते
तेव्हा तुला शोधताना नजर ओली होते.
तुझ्याशी अबोला ठेवायचा मी टाळते,
म्हणून लहान-सहान गोष्टी पण तुला सांगते
माझ्याकडून झालेल्या त्रासाबद्दल
माफी देवाकडे मागते
तुला कळू न देता कधी कधी
एकटीच मी रडते
आयुष्यभर तुझ्यासोबत राहचय मला,
मरणोपरांत तुझ्यासोबत जगायचं मला.

**प्राध्यापिका - श्रीमती आर. एन. पाटील**

## मेस...

शिक्षणासाठी बाहेरगावी रुम घेऊन राहणाऱ्या मुलाचे आईला पत्र)
प्रिय आई,
अगदी घरच्यासारखं जेवण मिळावं
म्हणून लावली एक मेस...
पण ताटात एकतरी रोज असतो केस
वरणाच्या वाटीत तर सरळ दिसतो बेस
कारण त्यात डाळीचा लागत नाही ट्रेस
रोज त्याच पांचट भाज्या
खाऊन तोंडाची गेलीय टेस्ट
म्हणून हल्ली माझं जेवण झालय लेस
तू नेहमी सांगते, भरपूर खा-पी, घे नीट रेस्ट
तब्येतीला जप, ती ठेव एकदम बेस्ट
पण खरं सांगू आई...
राहील जर माझ्या मेसची अशीच केस
पन्नास किलो वजनात टारगेट देखील
कधी माझ्याच्यानं वहायचं नाही लेस
घरच्या सारखा निवारा मिळाला बेस्ट
म्हणून मी येथे राहतो पेईंग पेस्ट
माझी तेव्हा खूप इच्छा असते
करावा पाहुणचार एकदम बेस्ट
पण नि:सत्व बेचव आहे माझी मेस
आणि रुमवाल्या काकुंनी ठणकावून
सांगितलय. नॉट अलाऊड गेस्ट...
एकंदरीत आई....
अशी आहे माझी रुम आणि माझी मेस...

**लगड निकिता संजय**
**- द्वितीय वर्ष (बी.कॉम.)**



Scanned with CamScanner

# * मराठी विभाग *

**प्रा. सोमनाथ दत्तात्रेय फुगट**

(एम.ए.बी.एड.सेट)

मराठी विभाग प्रमुख – अध्यापन अनुभव – ७ वर्षे

– चर्चासत्र सहभाग – राष्ट्रीय – ५,

राज्यस्तरी – ७

– सांस्कृतिक कला मंडळ प्रमुख

– बहि:शाल शिक्षण मंडळ प्रमुख

सा. फुले पुणे विद्यापीठ व बहि:शाल शिक्षण मंडळ या उपक्रमांतर्गत डॉ बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला व यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला याद्वारा विद्यापीठाने नियुक्त केलेल्या तज्ञ वक्ते (व्याख्याते) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

' मराठी' हा विषय महाविद्यालयाच्या स्थापनेपासून विशेषस्तरावर शिकविला जातो. कला शाखेतील ३० विद्यार्थी मराठी हा विषय विशेषस्तरावर घेवून पदवीचे शिक्षण घेत आहेत.

वाणिज्य शाखेत 'प्रथम वर्ष वाणिज्य' या वर्गासाठी 'व्यवहारिक व उपयोजित मराठी' या अनिवार्य विषयाद्वारे विद्यार्थी मराठी भाषेचे अध्ययन करत आहेत.

मराठी विभागांतर्गत 'मराठी वाङ्:मय मंडळ उद्घाटन प्रख्यात साहित्यिकाच्या हस्ते करुन वर्षभर विद्यार्थ्यांच्या साहित्य गुणांची जोपासना करण्यासाठी भित्तीपत्रके, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, काव्य वाचन स्पर्धा यांचे आयोजन केले जाते.

कविवर्य कुसूमाग्रज यांचा जन्मदिन दि. २७ फेब्रुवारी 'मराठी दिन' म्हणून मराठी विभागाच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो.

विविध महाविद्यालय, जिल्हा, राज्य स्तरांवरील निबंध व वक्तृत्व स्पर्धांत मराठी विभागातील विद्यार्थी सक्रिय सहभाग नोंदवतात.

----***----



Scanned with CamScanner

# The Department of English

Prof. K. L. Shinde
M.A.B.Ed., Set

Research - 12 research papers are published.

2 Research papers published in International Journals. Participated and presented papers in 10 seminars.

1) Our department organised The Soft Skill Development programme. Some lectures have been organising for effective communication skill.

2) Remedial course have been organising for slow learners or poor students in English.

3) In specail guidance lecture scheme some lectures were arranged on The Personality Development and Interview skills.

4) Optional English subject has been starting for F.Y.B.A. This subject has started for the purpose to develope English Competence among rural students. The knowledge of English language and communication skill is the need of present hour.

----***----



Scanned with CamScanner

# * अर्थशास्त्र विभाग *

**प्रा. डी. डी. गव्हाणे**
(विभागप्रमुख व सहा. प्राध्यापक)
M.A., Net, SET, Ph.D (ongoing)
राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन, १३ शोधनिबंध. विविध नियतकालिकांत प्रकाशित ''महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास'' (नाशिक जिल्ह्याचा विशेष अभ्यास) या विषयावर पुणे विद्यापीठात पी.एचडी. चे कार्य चालू आहे.

**प्रा. एम. एम. भोसले**
(सहा. प्राध्यापक)
M.A., B.Ed.
राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून अर्थशास्त्र हा विषय विशेषस्तरावर शिकविला जातो. कला शाखेतील ३० विद्यार्थी अर्थशास्त्राचा विशेषस्तरावर अभ्यास करीत आहे. वाणिज्य विभागासाठी अर्थशास्त्र हा विषय अनिवार्य असल्याने सर्वच विद्यार्थी अर्थशास्त्राचे अध्ययन करतात.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून प्रथमच अर्थशास्त्र विभागाच्या वतीने राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. 'ब्रेक्झीटचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम' या विषयावरील चर्चासत्र ३ डिसेंबर २०१६ रोजी झाले. यात ३२ संशोधकांनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले, तर ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शोधनिबंधाचे संकलन करुन एक पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'इंटरनेट बँकिंग व कॅशलेश व्यवहार' या विषयावर ९ डिसेंबर २०१६ रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ११ जुलै २०१७ रोजी ''जागतिक लोकसंख्या दिन'' या निमित्ताने लोकसंख्येविषयक माहिती व प्रवृत्ती यांवर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. पठारे यांनी या संदर्भात मार्गदर्शन केले.

----***----



Scanned with CamScanner

# * भूगोल विभाग *

**प्रा. ए. एल. भगत**

एम.ए./एम.एस्सी, नेट.

– सेवेचा अनुभव ३.९ वर्षे, सहा. प्राध्यापक एम.व्ही.पी. समाज नाशिक.

– ३.३ वर्षे प्रभारी प्राचार्य, वडनेर भैरव महाविद्यालय.

– विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग. एक राज्यस्तरीय रिसर्च पेपर प्रकाशित.

– जी. आय. एस. व आर. एस. मध्ये २१ दिवसाचा कोर्स वर्क व ८ दिवसाचा ॲडव्हान्स सर्व्हिंग कोर्स वर्क पूर्ण.

– "Climatic variabitity and It's impact in Agriculture in Nasik and Jalgaon District of Maharashtra" या विषयावर पी.एचडी. सुरु आहे.

महाविद्यालयात भूगोल हा विषय एफ. वाय./एस.वाय/टी.वाय बी.ए. या वर्गांना सामान्य स्तरावर शिकविला जातो. एफ.वाय. बी.ए.साठी भुरुपशास्त्राची मुलत्त्वे, एस.वाय.बी.ए. साठी. 'वातावरण व सागरशास्त्र, तर टी.वाय.बी.ए.साठी 'भारताचा प्रादेशिक भूगोल' हे विषय शिकवले जातात. शिकवितांना पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन वापर केला जातो. भूगोल विभागांतर्गत 'भूगोल दिन, पर्यावरण दिन, ओझोन दिन' जागतिक लोकसंख्या दिन या सारखे कार्यक्रम घेतले जातात. भूगोल विषयामध्ये विद्यार्थ्यांची मार्क परंपरा देखील चांगली आहे. भविष्यात हा विषय स्पेशल स्तरावर शिकवण्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असते व विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असते.

----***----



Scanned with CamScanner

# * राज्यशास्त्र विभाग *

**प्रा. भिमराज पी. गायकवाड**

सहा. प्राध्यापक

एम.ए., सेट.

- राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
- अभ्यासक्रम बदलासंदर्भातील कार्यशाळेतील सहभाग.
- जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन.
- महाविद्यालयीन स्तरावर 'मतदार दिन, संविधान दिन, मानवी हक्क दिन' या कार्यक्रमाचे आयोजन.

**प्रा. एस. व्ही. कोल्हे**

सहा. प्राध्यापक

एम.ए., बी.एड.

- राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
- महाविद्यालयीन अनेक उपक्रमांमध्ये सहभाग.

वडनेर भैरव महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ अंतर्गत महाविद्यालयात राज्यशास्त्रांतर्गत अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यात मतदार दिन, संविधान दिन, मानवी हक्क दिन साजरा केला जातो. वडनेरभैरव गावामध्ये विद्यार्थ्यांची रॅली काढून मतदारांमध्ये जनजागृती घडविण्याचे काम करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ए. एल. भगत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाने या सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले.

----***----



Scanned with CamScanner

# * वाणिज्य विभाग *

**प्रा. एन. डी. वडघुले**

एम. कॉम, नेट, सेट

सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग प्रमुख

विद्यार्थी विकास अधिकारी (एसडीओ)

– राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंध सादर.

सहभाग – २ राष्ट्रीय, शोधनिंबध सादर – ३ राज्यस्तरीय

**प्रा. एम. आर. धेबडे**

एम.कॉम., बी.एड., सेट

सहाय्यक प्राध्यापक

– राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग

सहभाग – ४ राज्यस्तरीय, २ राष्ट्रीय,

शोधनिबंध –२ राज्यस्तरीय

– मतदार नोंदणी अधिकारी

**प्रा. डी. एच. भगुरे**

एम.कॉम, नेट, सेट, जी.डी.सी.अॅण्ड ए.

सहाय्यक प्राध्यापक

- राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग
  शोधनिबंध वाचन (सहभाग – १० राज्यस्तरीय, ६ राष्ट्रीय, शोधनिबंध – ९, राज्यस्तरीय, ६ राष्ट्रीय)
- शिवजयंती तसेच विविध उत्सवप्रसंगी विविध गावात सामाजिक विषयांवर व्याख्याने.
- महाविद्यालयात 'वाणिज्य मंडळ' अंतर्गत विविध व्याख्यानांचे आयोजन.
- औद्योगिक सहलींचे आयोजन.
- महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कार्यक्रम अधिकारी.

## - Departmet of Commerce -

We offerce quality education in commerce from the opening of college (200g). Now in 2016. 10g. students are geting education in B.Com course. We have mainfained the departmental result from last 7 years.

First Three Students

| No. | Name of Student | % (persentage) |
|---|---|---|
| 01. | Hinge Bharati Dattatary | 79% |
| 02. | Dhanait Yogita Kailas | 74.71% |
| 03. | Aher Mohini Dattatray | 68.71% |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 01. | Salade Varsha Subhash | 73.667% |
| 02. | Aher Priyanka Arun | 72.83% |
| 03. | Pachorkar Shital Vasant | 71.00% |

| | | |
|---|---|---|
| 01. | Shirsat Gulab Vishwanath | 70.92% |
| 02. | Nikam Nilam Subhas | 66.83% |
| 03. | Aher Madhuri Prakash | 65.92% |

**OTHER**

**Industrial Visit :-**

1) Commerce Association

We have an active sell named as commerce association which organizes various usefull programs relating to commercial education. Marketing research & economical development of society.

----***----



Scanned with CamScanner

# * मानसशास्त्र विभाग *

**प्रा. सारिका रावसाहेब दौंड**

(एम.ए.बी.एड. सेट)

मानसशास्त्र विभाग प्रमुख

अध्यापन अनुभव - ५ वर्षे

चर्चासत्र सहभाग -

आंतराष्ट्रीय १, राष्ट्रीय -२, राज्यस्तरीय - ३.

गांधी विचारी परिक्षा समन्वयक

सामाजिकशास्त्र मंडळ प्रमुख

समुपदेशक व मार्गदर्शक समिती प्रमुख

मानसशास्त्र विभागामार्फत विद्यार्थी समुपदेशन व मागदर्शन केले जाते. वेळोवेळी अनेक प्रख्यात समुप्रदेशकांमार्फत विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले जाते.

'मानसशास्त्र' विषय सामान्यस्तरावर शिकविला जात असून महाविद्यालयीन कला शाखेतील १४० विद्यार्थी हा विषय घेवून पदवी शिक्षण घेत आहे.



Scanned with CamScanner

# * जिमखाना विभाग *

**प्रा. डॉ. सारिका जगताप**
शारीरिक शिक्षण संचालक
बी.कॉम., बी.पी.एड., एम.पी.एडी, सेट, पी.एच.डी.

– चर्चासत्र –

आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
शोधनिबंधाचे वाचन – ६ शोधनिबंधक प्रकाशित.

मविप्र मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग (मुले/मुली) आंतरवर्गीय
खो–खो (मुली) क्रिकेट व मैदानी स्पर्धेचे आयोजन.

विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग. योगा, मैदानी स्पर्धा, क्रिकेट.

विशेष प्राविण्य :–

१) कु. राहूल टेकनर, मविप्र मॅरेथॉन स्पर्धेत पाचवा क्रमांक प्राप्त (प्रथम वर्ष – बी.ए.)
२) मविप्र आयोजित राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन २०१६ स्पर्धेत कु. राहूल टेकनर (प्रथम वर्ष – बी.ए.) या विद्यार्थ्याने वरिष्ठ गट मुले (१२ कि.मी.) या गटात पाचवा क्रमांक प्राप्त केला.

----***----



Scanned with CamScanner

# ✻ Department of Science ✻

Shri. R. R. Shinde
Junior College Teacher
M.Sc.,B.Ed Mathematics
Head of the Department

Smt. M. B. Deshmukh
Junior College Teacher
M.Sc., B.Ed. Biology
Participated in State Level Seminars-2

Smt. S. G. Gore
Junior College Teacher
M.Sc., B.Ed. Chemistry

Smt. R. N. Patil
Junior College Teacher
M.Sc., B.Ed. Physics

Science and Commerce department of Junior College statred at 1st August 2016 Remedial Teaching Classes have been arranged for poor students.

The first three students of XIth Science 2016-17

1) Aher Tejashri Shivaji
2) Pachorkar Rutuja Shamrao
3) Tidke Shraddha Sachin



Scanned with CamScanner

# * ग्रंथालय विभाग *

**प्रा. संदीप लोखंडे**

ग्रंथपाल

एम.कॉम, एमलीप, इन्फरमेशन ॲण्ड सायन्स, नेट ॲण्ड सेट, पीजीडी लॅन.

**श्री. गंगाधर रमेश आहेर**

ग्रंथालय सहाय्यक

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीद वाक्याप्रमाणे ग्रामीण भागात शिक्षणाचे पवित्र कार्य करतांना म.वि.प्र. समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव स्थापना २००९ साली झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात ग्रंथालय, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विविध पुस्तकांद्वारे माहिती व सेवा पुरविण्याचे कार्य करत आहे.

**ग्रंथालय संग्रह :-**

महाविद्यालयीन ग्रंथ संग्रहालयाचा ग्रंथ संग्रह हा उत्तमरित्या विविध ज्ञानशाखांनी विकसित केलेला आहे. ग्रंथालयात मोठ्या प्रमाणावर विद्यापीठांच्या अभ्यासक्रमावर आधारित ग्रंथांबरोबरच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ तसेच जीवन विषयक विविध शास्त्रीय ग्रंथांचा सहभाग आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१,५०,०००, क्रमीक ग्रंथ – २५००, नियतकालिके – १०, सीडी व डिव्हीडी – १०५,
नकाशे – १०, वर्तमान पत्रे – ७.

**ग्रंथालय सभासद :-**

महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये विद्यार्थी वर्ग, सभासद संख्या ३५० तसेच महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्थानिक व्यवस्थापन समिती. त्याचबरोबर संस्थेचे पदाधिकारी हे ग्रंथालयाचे सभासद आहेत.

**ग्रंथालय सेवा :-**

१) ग्रंथालयातून ग्रंथ देवघेव सेवा, २) संदर्भ सेवा
३) निवडक माहिती प्रसारण सेवा, ४) झेरॉक्स सेवा
५) इंटरनेट सेवा, ६) वर्तमानपत्र कात्रण सेवा इ. सेवा पुरविल्या जातात.

----***----



Scanned with CamScanner

# * महाविद्यालयीन कर्मचारी *

| कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|
| श्री. राजेंद्र प्रभाकर कुशारे | ज्यु. क्लार्क |
| श्री. संदीप भास्कर शिंदे | ज्यु. क्लार्क |
| श्री. शरद कारभारी शिंदे | ज्यु. क्लार्क |
| श्री. बाला दादा गांगुर्डे | शिपाई |
| श्री. संदीप अशोक बच्छाव | शिपाई |
| श्री. गंगाधर रमेश आहेर | शिपाई |
| श्री. शशिकांत शंकर वाटपाडे | शिपाई |
| श्री. राजेंद्रा माधवराव डोखळे | बस चालक |



Scanned with CamScanner

# भैरव २०१७-१८

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२.

## * संस्था दृष्टीक्षेपात *

| | | |
|---|---|---|
| स्थापना | : | सन १९१४ |
| सार्वजनिक ट्रस्ट | : | रजि. नं. ए - ४३६/१९५४ |
| आजीव सभासद संख्या (जनरल) | : | १०१४७ |
| आजीव सभासद संख्या (सेवक) | : | ४६४ |
| शाखांची संख्या | : | ४५१ |
| विद्यार्थ्यांची संख्या | : | २०६५५३ |
| सेवक संख्या | : | ८६४७ |
| अंदाजपत्रक | : | सुमारे रु. ५८६ कोटी ९२ लाख (२०१६-१७) |

## * शाखा विस्तार *

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्व प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ६२ | प्रिंटींग प्रेस | ०१ |
| पूर्व प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १५ | आय. टी. आय. | ०८ |
| प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ५५ | मेडिकल कॉलेज | ०१ |
| प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १६ | मेडिकल कॉलेज हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर | ०१ |
| आश्रमशाळा (प्राथमिक) | ०३ | विद्यार्थी वसतिगृहे | २४ |
| आश्रमशाळा (माध्यमिक) | ०२ | शेतकी शाळा | ०१ |
| माध्यमिक शाळा (मराठी माध्यम) | १५८ | ललित कला महाविद्यालय | ०१ |
| माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | ०३ | जनशिक्षण संस्थान | ०१ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | ५४ | पदविका फार्मसी महाविद्यालय (डी.फार्म) | ०१ |
| अध्यापक विद्यालये | ०५ | पारिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय | ०१ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०२ | अभियांत्रिकी महाविद्यालय | ०१ |
| कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये | २२ | कृषी महाविद्यालय | ०१ |
| फार्मसी कॉलेज | ०१ | भौतिकोपचार महाविद्यालय | ०१ |
| आर्किटेक्चर कॉलेज | ०१ | विधी महाविद्यालय | ०१ |
| बॅचलर ऑफ डिझाईन | ०१ | कॉलेज ऑफ सोशल वर्क | ०१ |
| नर्सिंग कॉलेज | ०१ | पॉलिटेक्निक कॉलेज | ०१ |
| व्यवस्थापक संस्था (आय.एम.आर.टी.) | ०१ | नागरी आरोग्य केंद्र | ०१ |
| मविप्रचे प्रशिक्षण व विकास केंद्र | ०१ | ग्रामीण आरोग्य केंद्र | ०१ |

Scanned with CamScanner

## महाविद्यालयीन इतिहासातील एक सुवर्ण पान....



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. श्री. नितीन करमळकर, के. टी. एच. एम. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य श्री. व्ही. बी. गायकवाड व महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. ए. एल. भगत, श्री. शिवाजी पवार (सर), प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी

Scanned with CamScanner